सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, २५ जानेवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ७९ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# जवाहरनगर आयुध निर्माणीत भीषण स्फोट; आठ ठार

- पाच कर्मचारी जखमी
- स्फोटाने भंडारा हादरला

◆ **भंडारा, २४ जानेवारी**

बहुआयामी उत्पादने आणि आरडीएक्ससारख्या उच्च स्फोटकांच्या उत्पादनासाठी ओळखल्या जाणाऱ्या जवाहनरनगरातील आयुध निर्माणीत शुक्रवारी झालेल्या भीषण स्फोटामुळे भंडारा जिल्हा हादरला. जवाहरनगर आयुध निर्माणीच्या इतिहासातील हा सर्वांत मोठा स्फोट आहे. या स्फोटात आठ जणांचा मृत्यू, तर पाच गंभीर जखमी झाले. या स्फोटामुळे २५ किलोमीटरपर्यंतच्या गावांना हादरे बसले.

जवाहरनगर येथे उच्च स्फोटकांचे उत्पादन केले जाते. येथे तयार होणारे आरडीएक्स संरक्षण व्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जाते. आज आयुध निर्माणीतील लो टेंपरेचर प्लॅस्टिक इक्विपमेंट प्लांट अर्थात् एलटीपीईमध्ये सकाळी पावणेअकराच्या सुमारास प्रचंड स्फोट झाला. फाईन आरडीएक्स तयार केल्या जाणाऱ्या प्रकल्पात त्यावेळी पहिली शिफ्ट सुरू होती. जवळपास १५ ते १७ कर्मचारी तिथे होते. स्फोटाच्या तीव्रतेमुळे घटनास्थळी प्रचंड मोठा खड्डा पडला व इमारत पूर्णपणे उद्ध्वस्त होऊन कर्मचारी मलब्याखाली दबले.

मलब्यातून जखमी कर्मचाऱ्यांना काढण्याचे काम सुरू झाले. जखमींना भंडारा येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सायंकाळपर्यंत जवळपास १२ जणांना बचाव पथकाने बाहेर काढले.

आयुध निर्माणीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते, पोलिस अधीक्षक नुरूल हसन, आ. नरेंद्र भोंडेकर यांनी घटनास्थळी धाव घेतली. नागपूर विभागाच्या पोलिस महानिरीक्षकांनीही आयुध निर्माणीला भेट दिली.


स्फोटामुळे उद्ध्वस्त झालेली इमारत

| रुग्णवाहिका | |
|---|---|
| १०२ क्रमांकाच्या | १५ |
| १०८ क्रमांकाच्या | ५ |
| खाजगी | ४ |

### मृत्युमुखी पडलेले व जखमी कर्मचारी

मृतांमध्ये ज्युनिअर वर्क्स मॅनेजर चंद्रशेखर गोस्वामी, मनोज मेश्राम, अजय नागदेवे, अंकित बारई, अभिषेक चौरसिया, लक्ष्मण केळवदे, धर्मा रंगारी, संजय कारेमोरे यांचा समावेश आहे. जखमींमध्ये एन. पी. वंजारी, संजय राऊत, सुनीलकुमार यादव, राजेश बडवाईक, जगदीश बॅनर्जी यांचा समावेश आहे.

**बचाव कार्यात सहभागी**

बचाव कार्यात आयुध निर्माणीसह सनफ्लॅग वरठी, भंडारा अग्निशमन दल, एनडीआरएफ आणि एसडीआरएफची पथके सहभागी झाली तसेच मलबा उचलण्यासाठी चार मोठाले क्रेन व जेसीबी होते.

**दूरवर उडाले तुकडे**

या स्फोटानंतर जवळपास एक किलोमीटर अंतरापर्यंत विविध उपकरणांचे तुकडे उडाले. प्रकल्पातील उपकरणे आणि अन्य साधनांचे तुकडे रस्त्यावर येऊन पडले होते. सुदैवाने नागरिकांना दुखापत झाली नाही. ◂(तभा वृत्तसेवा)

> जवाहरनगर येथील ऑर्डिनन्स फॅक्टरीत झालेल्या स्फोटात छत कोसळून आठ कामगार मृत्युमुखी पडले, तर पाच जखमी झाले. जिल्हाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांनी घटनास्थळी सर्व प्रकारची मदत पुरवली. अपघातात मृत्यू झालेल्या कामगारांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना करतो.
> **देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

> भंडारा जिल्ह्यातील ऑर्डिनन्स फॅक्टरीमध्ये स्फोट होऊन छत कोसळल्यामुळे आठ कामगारांचा मृत्यू झाल्याची, तसेच काही जण जखमी झाल्याची घटना दुर्दैवी आहे. मृत्युमुखी पडलेल्या कामगारांना श्रद्धांजली. माझ्या संवेदना त्यांच्या कुटुंबीयांसमवेत आहेत. जखमींना लवकरात लवकर स्वास्थ्य मिळावे अशी प्रार्थना करतो.
> **नितीन गडकरी**, केंद्रीय मंत्री

**मी इकडे आहे, मला बाहेर काढा!** (वृत्त शेवटच्या पानावर) ▸

# एसटीचा प्रवास महागला!



## तिकिटात १४.९५ टक्के दरवाढ

◆ **मुंबई, २४ जानेवारी**

मागील तीन वर्षांपासून प्रस्तावित असलेल्या प्रलंबित एसटी प्रवासाच्या भाडेवाडीला परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या राज्य परिवहन प्राधिकरणाने अखेर शुक्रवारी मंजुरी दिली आहे. त्यामुळे एसटीच्या तिकीटात १४.९५ टक्के दरवाढ होणार असून, मुंबईतील रिक्षा आणि टॅक्सीचीदेखील भाडेवाढ होणार आहे.


राज्यातील परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच राज्य परिवहन प्राधिकरणाची बैठक झाली. या बैठकीत एसटी बसच्या तिकीट दरवाढीला मंजुरी देण्यात आली. या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार एसटीच्या तिकीटात १४.९५ टक्के दरवाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्रासह मुंबईमधील प्रवाशांसाठी हे नवे दर शुक्रवारी मध्यरात्रीपासून लागू होणार आहेत.

दुसरीकडे राज्य परिवहन खात्याने एसटी दरवाढ केल्यानंतर मुंबईतील टॅक्सी आणि रिक्षा भाडेवाढही होणार आहे. गेल्या काही वर्षांपासून टॅक्सी आणि रिक्षा यांची भाडे वाढले नसल्यामुने तीन रुपयांनी भाडेवाढ करण्याची मागणी होती. त्यांच्या या मागणीचा विचार करता टॅक्सी आणि रिक्षामध्ये भाडेवाढ करण्यात आली आहे. टॅक्सीचे सध्याचे दर हे २८ रुपये आहेत, तर आता नव्या दरवाढीनुसार ते ३१ रुपये होतील. रिक्षाचे सध्याचे दर हे २३ रुपये असून, नव्या दरवाढीनुसार २६ रुपये मोजावे लागणार आहेत. दोन फेब्रुवारीपासून ही भाडेवाढ होईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. ते म्हणाले, गेल्या तीन वर्षांपासून दरवर्षी अपेक्षित असलेली नियमित वाढ झाली नाही. मात्र, त्याचवेळी कर्मचाऱ्यांच्या वेतनात नियमित वाढ झाली. इंधनाच्या किमतीत झालेली वृद्धी आणि इतर नियमित खर्चांमध्ये झालेली वाढ, यामुळे महामंडळावर आर्थिक भार वाढला होता. त्यामुळे सदर दरवाढ होणे हे क्रमप्राप्त झाले होते. नियमानुसार सदर दरवाढ झाली पाहिजे. तेव्हाच आर्थिक समतोल साधला जाऊ शकतो. ◂(तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### आठवड्याचा शेवट घसरणीने

**मुंबई** : आठवड्याच्या शेवटच्या दिवशी शुक्रवारी देशांतर्गत शेअर बाजारात जोरदार चढ-उतार पाहायला मिळाले.



बाजाराची सुरुवात शांत झाली आणि नंतर निदेशांकही वर गेला, पण नंतर बाजारात घसरण झाली. दिवसअखेर निफ्टी ११३ अंकांनी, तर निर्देशांक ३२९ अंकांनी खाली आला. निर्देशांक ७६,१९० वर बंद झाला. निर्देशांकातील ३० पैकी केवळ ११ शेअर्स तेजीत होते. उर्वरित १९ कंपन्यांचे शेअर्स घसरणीच्या सावटाखाली होते. निफ्टीतही ५० पैकी १९ कंपन्यांचे शेअर्स वाढले उर्वरित ३१ कंपन्यांचे शेअर्स लाल रंगात बंद झाले. सर्वाधिक वाढ हिंदुस्थान युनिलिव्हर, तर सर्वाधिक घसरण महिंद्राच्या शेअर्समध्ये पाहायला मिळाली.

### भारताच्या विदेशी चलनसाठ्यात घट

**नवी दिल्ली** : भारताचा विदेशी चलनसाठा १.८८ अब्ज डॉलर्सने घसरून ६२३.९८३ अब्ज डॉलर्सवर आला, अशी माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेने दिली. यापूर्वी हा साठा ८.७१४ अब्ज डॉलर्सवरून घसरून ६२५.८७१ अब्ज डॉलर्सवर आल्याचे रिझर्व्ह बँकेनेसांगितले. मागील काही आठवड्यांपासून विदेशी चलनसाठ्यात घसरण होत आहे. रुपयातील अस्थिरता कमी करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने विदेशी चलन बाजारात केलेल्या हस्तक्षेपासह पुनर्मूल्यांकनामुळे ही घट झाली आहे.

### ईव्हीएमच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालय करणार सुनावणी

**नवी दिल्ली** : ईव्हीएमच्या पडताळणीचे धोरण तयार केले जावे, अशी मागणी करीत हरयाणाचे माजी मंत्री आणि पाच वेळचे आमदार करणसिंह दलाल यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सरन्यायाधीश संजीव खन्ना प्रमुख असलेले न्यायासन सुनावणी करणार आहे. शुक्रवारी हे प्रकरण न्या. दीपांकर दत्ता आणि न्या. मनमोहन यांच्या न्यायासनासमोर सुनावणीसाठी आले. त्यावेळी अशाच प्रकारच्या याचिकांसह ते सरन्यायाधीशांसमोर सादर केले जाईल, असे न्यायासनाने स्पष्ट केले. ÷ईव्हीएमच्या पडताळणीसाठी धोरण तयार करण्यात यावे, या मागणीसाठी दलाल यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

### घरगुती विजेचे दर २३ टक्क्यांनी कमी होणार

**मुंबई** : मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.0 योजनेमुळे पुढील दोन वर्षांत कार्यरत होणाऱ्या सौरऊर्जा प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा होणार असून, घरगुती ग्राहक, औद्योगिक ग्राहकांनाही मोठा फायदा होणार आहे. सौरऊर्जा प्रकल्पांमुळे आगामी पाच वर्षांत १०० युनिटपर्यंत वीजवापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठीचे वीज दर ५ रुपये ८७ प्रति युनिटपर्यंत, तर १०१ ते ३०० युनिट वापर असणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठीचे दर ११.८२ रुपये प्रतियुनिटपर्यंत टप्प्याटप्प्याने कमी होतील. १ एप्रिलपासून महावितरणच्या घरगुती ग्राहकांना दर कपातीचे लाभ टप्प्याटप्प्याने मिळू लागतील, अशी माहिती महावितरणचे स्वतंत्र संचालक व भाजपा प्रदेश सह मुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी शुक्रवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत पाठक बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सौरऊर्जा निर्मितीच्या धडाकेबाज कार्यक्रमामुळेच शेतकरी, घरगुती व औद्योगिक ग्राहकांचा फायदा होणार असल्याचे पाठक यांनी स्पष्ट केले.

## मुंबई उच्च न्यायालयाला मिळणार न्यायमूर्ती

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने शुक्रवारी राजस्थान, अलाहाबाद आणि मुंबई उच्च न्यायालयात पाच न्यायमूर्तींच्या नियुक्तीची अधिसूचना जारी केली. वरिष्ठ वकील प्रवीण शेषराव पाटील यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायमूर्तीपदी नियुक्ती करण्यात आली. राजस्थान उच्च न्यायालयात न्या. चंद्रशेखर शर्मा, न्या. प्रमिलकुमार माथूर आणि न्या. चंद्रप्रकाश श्रीमाली यांची नियुक्ती केली.

# 'मार्केटिंग' नेता होऊन फिरणे सोपे

- अमित शाह यांची शरद पवारांवर टीका
- सहकार मंत्रालय स्थापन करण्यासाठी लागली ७५ वर्षे

◆ **मालेगाव, २४ जानेवारी**

शरद पवार यांनी दहा वर्षे केंद्रीय कृषिमंत्री असताना महाराष्ट्रातील सहकार क्षेत्र, साखर कारखान्यांसाठी काय केले, याचा हिशेब द्यावा. मार्केटिंग नेता होऊन फिरणे सोपे आहे, जमिनीवर राहून काम करणे गरजेचे असते, अशी टीका केंद्रीय गृहमंत्री व सहकारमंत्री अमित शाह यांनी शुक्रवारी केला.

नाशिकच्या मालेगाव तालुक्यातील अजंग गाव येथे शुक्रवारी व्यंकटेश्वर को-ऑपरेटिव्ह पॉवर ॲण्ड ॲग्रो प्रोसेसिंग लि.च्या वतीने आयोजित सहकार परिषदेला संबोधित करताना शाह म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून देशभरातील



सहकार क्षेत्रातील लोक, सहकार मंत्रालय स्थापन करण्याची मागणी करायचे. त्यांचे कोणीही ऐकले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर सहकार मंत्रालयाची स्थापना केली. यामुळे देशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत झाली. आत्मनिर्भरतेची सर्वांत सुंदर कुठली व्याख्या असेल, तर ती सहकार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सहकारी साखर कारखान्यांच्या करावरून वाद व्हायचे. पण, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली भाजपा सरकारने हा प्रश्न निकाली काढला.

**४६ हजार कोटींचा कर कमी केला**

महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांवरील ४६ हजार कोटी रुपयांचा कर कमी करण्याचे काम आमच्या सरकारने केले, असे अमित शाह म्हणाले.

**शेतीत तंत्रज्ञानाचा वापर व्हावा**

शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करावी. राज्य सरकारने अत्याधुनिक भूमी परीक्षण प्रयोगशाळा, सेंद्रिय प्रयोगशाळा प्रत्येक जिल्ह्यात सुरू करावी यासाठी केंद्र सरकार सर्व प्रकारे मदत करेल. मोदींनी सहकार ते समृद्धी असा नारा दिला आहे, या माध्यमातून शेतकऱ्यांना सहकार क्षेत्राशी जोडून त्यांचा आर्थिक विकास करण्याचे लक्ष्य असल्याचे शाह म्हणाले.

**त्र्यंबकेश्वर मंदिरात घेतले दर्शन**

अमित शाह सुरुवातील नाशिकला पोहोचले. त्यानंतर त्यांनी त्र्यंबकेश्वर मंदिरात जाऊन त्र्यंबक राजाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी आरतीत सहभागी होत पूजा व अभिषेक केला. यावेळी त्यांच्यासोबत केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहळ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ उपस्थित होते. ◂(वृत्तसंस्था)

## गुजरातमध्ये १०७ कोटींचे अल्प्राझोलम जप्त

◆ **अहमदाबाद, २४ जानेवारी**

गुजरात दहशतवाद विरोधी पथक अर्थात् एटीएसने आनंद जिल्ह्यातील खंभात भागात एका औषध उत्पादन ठिकाणावर छापा टाकून १०७ कोटींचे अल्प्राझोलम नावाचे औषध जप्त केले, या कारवाईनंतर पाच जणांना अटक केली.

एटीएसचे उपमहानिरीक्षक सुनील जोशी यांनी सांगितले की, गुरुवारी रात्री अल्प्राझोलमची निर्मिती करणाऱ्या कारखान्यावर छापा टाकला. तेथून १०७ कोटी रुपये किमतीचे बंदी असलेले औषध जप्त करण्यात आले. अल्प्राझोलमचा नशेसाठी वापर केला जात असल्याने ते एनडीपीएस कायद्याच्या कक्षेत येते.

कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे अल्प्राझोलम उत्पादनासाठीचा परवाना नसल्याचे अधिकाऱ्यांना आढळले. यावेळी कंपनीच्या पाच अधिकाऱ्यांना अटक केली. प्राथमिक तपासात आढळले की, पाचही आरोपींनी सायकोट्रॉपिक पदार्थ तयार करण्यासाठी कारखाना भाड्याने घेतला होता. ◂(वृत्तसंस्था)

## संसदीय संयुक्त समितीतील १० विरोधी सदस्य निलंबित

**नवी दिल्ली, २४ जानेवारी**

वक्फ दुरुस्ती विधेयकावरील संसदीय समितीतील (जेपीसी) सर्व विरोधी सदस्यांना शुक्रवारी एका दिवसासाठी निलंबित करण्यात आले. समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांच्याविरोधात सततच्या निदर्शनांमुळे आणि कामकाजात गोंधळ घातलेल्या आरोपांमुळे हे विधेयक पारित झाले.

निलंबित सदस्यांमध्ये कल्याण बॅनर्जी, मोहम्मद जावेद, ए. राजा, असदुद्दीन ओवैसी, नासीर हुसैन, मोहिबुल्लाह, मोहम्मद अब्दुल्लाह, अरविंद सावंत, नदीम-उल-हक, इम्रान मसूद यांचा समावेश आले. विरोधी सदस्यांना निलंबित करण्याबाबत भाजपाचे सदस्य निशिकांत दुबे यांनी मांडलेला प्रस्ताव समितीने स्वीकारला.

विरोधी सदस्यांचे वर्तन घृणास्पद होते. ते सातत्याने बैठकीत गोंधळ घालत होते आणि पाल यांच्याविरोधात असंदीय भाषा वापरत होते, असा दावा भाजपाच्या सदस्य अपराजिता सारंगी यांनी केला. संसदीय समितीच्या बैठकीची सुरुवात वादळी चर्चेने झाली. मसुदा कायद्यातील प्रस्तावित बदलांचा अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ दिला जात नसल्याचा दावा विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केला.

काश्मीरचे धार्मिक प्रमुख मिरवाईज उमर फारूख यांना बोलवण्यापूर्वी, समितीच्या सदस्यांनी आपापसात चर्चा केली. या चर्चा वादळी ठरल्या आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांनी दावा केला की, दिल्ली विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून भाजपा वक्फ दुरुस्ती विधेयकावरील अहवाल लवकरात लवकर स्वीकारण्याचा प्रयत्न करीत आहे. बैठकीदरम्यान झालेल्या जोरदार वादविवादामुळे कामकाज काही काळासाठी तहकूब करावे लागले. समितीची बैठक पुन्हा सुरू झाल्यानंतर मिरवाईज यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ समितीसमोर हजर झाले.

## अमूलचे दूध एक रुपयाने स्वस्त

◆ **नवी दिल्ली, २४ जानेवारी**

अमूलने आपल्या दुग्धजन्य पदार्थांच्या किमती कमी करण्याची घोषणा केली आहे. देशातील जनतेसाठी हा मोठा दिलासा मानला जात आहे.

कंपनीने आपल्या तीन प्रकारच्या दुधाच्या किमती कमी केल्या आहेत. यामध्ये अमूल गोल्ड, अमूल टी स्पेशल आणि अमूल फ्रेश यांचा समावेश आहे. यांच्या किमती एक रुपयाने कमी झाल्या आहेत. यापूर्वी अमूल गोल्डची किंमत ६६ रुपये होती आता ती ६५ रुपये करण्यात येणार आहे.

अमूल टी स्पेशलची किंमत ६३ रुपयांवरून ६२ रुपये करण्यात आली आहे. अमूल फ्रेश ५४ रुपयांना मिळत होते त्याची किंमत आता ५३ रुपये राहणार आहे. ◂(वृत्तसंस्था)




## छत्तीसगडमध्ये १४ नक्षलवाद्यांना अटक

**बिजापूर, २४ जानेवारी,**

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यातील उसूर पोलिस ठाण्याच्या परिसरातील विविध भागांतून शुक्रवारी सुरक्षा दलाने १४ नक्षलवाद्यांना अटक केली. यातील आठ नक्षल्यांच्या शिरावर ३५ लाखांचे बक्षीस होते. स्थानिक पोलिस आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या (सीआरपीएफ) संयुक्त पथकाने ही कारवाई केली.

पोलिस अधीक्षक प्रभातकुमार यांनी सांगितले की, बिजापूर जिल्ह्यात उसूर पोलिस ठाण्याच्या परिसरात स्थानिक पोलिस व सीआरपीएफचे पथक नियमित गस्तीवर होते. यावेळी टेकमेटला, नाडपल्ली, आणि मल्लेम्पेंटा गावातील जंगलात नक्षलवादी दिसून आले. सुरक्षा दलाने त्यांना इशारा देत शस्त्रे खाली ठेवण्याचा आवाहन केले. सुरक्षा दलाच्या आवाहनाला प्रतिसाद दिल्यानंतर १४ नक्षलवाद्यांना ताब्यात घेण्यात आले. यामध्ये पाच महिलांचा समावेश आहे.

# मनोज जरांगे-पाटील उद्यापासून आंतरवाली सराटीत करणार उपोषण

**जालना, २४ जानेवारी**

मनोज जरांगे पाटील शनिवारपासून पुन्हा एकदा मराठा आरक्षणासाठी राज्यातील महायुती सरकारविरोधात दोनहात करणार आहेत. त्यांनी शुक्रवारी या प्रकरणी सरकारवर टीकेची झोड उठवत सरकार गरीब मराठा समाजाचा नाहक छळवाद करत असल्याचा आरोप केला. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा दंड थोपटलेत. ते उद्यापासून म्हणजे प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येपासून जालन्याच्या आंतरवाली सराटीत बेमुदत उपोषण करणार आहेत. त्यांनी आपल्या आंदोलनाची दशा आणि दिशा अजून स्पष्ट केली नाही. पण आज पत्रकारांशी बोलताना त्यांनी राज्यातील महायुती सरकारवर टीकेची झोड उठवली.



मनोज जरांगे पत्रकारांशी बोलताना म्हणाले, आमचे आंदोलन मागील दीड वर्षांपासून सुरू आहे. पण सरकार गोरगरीब मराठा समाजाचा का छळ का करत आहे हे आम्हाला समजले नाही. मी आमच्या मूळ मागणीसह इतर मागण्यांसाठी उद्यापासून उपोषणाला बसणार आहे. मराठा समाजातील मागेल त्या व्यक्तीला कुणबी ओबीसी प्रमाणपत्र देणे, कुणबी नोंदी शोधणे, शिंदे समितीला मुदतवाढ देणे, सगेसोयरेच्या अधिसूचनेची अंमलबजावणी करणे, एथड आरक्षण पुन्हा लागू करणे या आमच्या मुख्य मागण्या आहेत. या मागण्या मान्य करून मराठा सम ाजाची मने जिंकण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मोठी संधी आहे. मी समाजाच्या लेकराबाळांसाठी जीवाची बाजी लावण्यास तयार आहे. त्यामुळे मराठा समाज मला उघडे पडू देणार नाही. मराठा समाजाच्या लेकरांसाठी हे सरकार काय करणार हे आता महायुतीमधील मराठे पाहणार आहेत. मराठा बांधवांनी नव्या दमाने पुन्हा एकदा एकजूट झाले पाहिजे. सामूहिक उपोषणासाठी आम्ही खूप ताकद लावणार होतो. पण आता ज्यांना शक्य आहे त्यांनी व ज्यांच्या कुटुंबीयांचा विरोध नाही त्यांनी उपोषणाला बसावे. आपल्या जातीसाठी कुणी शहीद झाले तर काही होत नाही. त्यामुळे ज्यांची मनाने तयारी आहे त्यांनीच उपोषणाला बसावे, असे ते म्हणाले.

**संतोष देशमुख प्रकरणात इंचभरही मागे हटणार नाही**

मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी सरपंच संतोष देशमुख प्रकरणात आम्ही एक इंचही मागे हटणार नसल्याचेही यावेळी जोर देऊन स्पष्ट केले. संतोष देशमुख प्रकरणात आम्ही एक इंचही मागे हटणार नाही. कुणाचाही बाप आला तरी आम्ही हे प्रकरण दाबू देणार नाही, असे ते म्हणालेत. मनोज जरांगे यांनी यावेळी वाल्मीक कराडला रुग्णालयात दाखल करण्यावरही संशय व्यक्त केला. डॉक्टर या प्रकरणी कोणत्या तपासण्या करत आहेत. काय ऑपरेशन सुरू आहे का? पोलिस अधिकारी व डॉक्टरांमध्ये नेमके काय सुरू आहे? आरोग्य मंत्र्यांनी या विषयात लक्ष घालावे. असे मनोज जरांगे म्हणाले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### प्रकाश यलगुलवार यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिर

**सोलापूर, दि.२४ जानेवारी-**

नॅब संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आमदार प्रकाश यलगुलवार यांच्या वाढदिवसानिमित्त एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळेत आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार शिबीर आयोजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे जिजामाता नागरी उपचार सेवा केंद्र, फिजिशियन डॉ. जेलर होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यशाळेचे अधिक्षक रामचंद्र कुलकर्णी होते. शिबिरास अमोल बर्गे, दर्शन परब, रेशमा घोडके, नागेश्वरी घोडके व सरस्वती पांचाळ या टीमने विद्यार्थ्यांची तपासणी केली. यामध्ये विद्यार्थ्यांची उइउ टेस्ट, बी.पी. तपासणी, आरोग्य तपासणी व मोफत औषधे देण्यात आली. कार्यक्रमाला रियाज मुल्ला, आकांक्षा भंडारे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी श्रीनिवास समदुर्ले, शुभम वांझरे व संदेश कांबळे यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन शिवकुमार पाटील तर आभार आकांक्षा भंडारे यांनी मानले.

### श्रीमार्कडेय मंदिरात आजपासून सामुदायिक श्री दुर्गा सप्तशती पारायण

**सालापूर, दि. २४ जानेवारी-**

पद्मशाली समाजाचे कुलदैवत श्री मार्कडेय जयंतीनिमित्त पद्मशाली ज्ञाती संस्थेच्यावतीने शनिवार, २५ जानेवारी ते शुक्रवार, ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत सकाळी ६.३० ते ८.३० यावेळेत सिध्देश्वर पेठेतील श्रीमार्कडेय मंदिर येथे सामुदायिक श्री दुर्गा सप्तशती पारायणचे आयोजन करण्यात आली आहे, अशी माहिती ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश पलमारी, सरचिटणीस संतोष सोमा यांनी दिली. हभप अंजय्या दुस्सा यांच्या मार्गदर्शनाखाली व हभप गिरीष वासी यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या सामुदायिक श्री दुर्गा सप्तशती पारायणमध्ये नामदेव पुलगम, किरण श्रीचिप्पा, अंबादास उदगिरी, ज्ञानेश्वर एककदेवी, प्रभाकर कुरापाटी, गोपाळ सोमा, श्रीनिवास कनकुंटला, अशोक नुकल, नरसिंग बिरकुल, राजू पुलगम, गणेश मुलका, व्यंकटेश श्रीगादी, दत्तात्रय कोळा, रमाकांत राहुळ आदी सहभाग नोंदविणार आहेत. शनिवार, १ फेब्रुवारी रोजी श्रीमार्कडेय जयंती आहे. यादिवशी श्रीमार्कडेय मंदिरात रोहन बुधारम व नरेंद्र पलमारी यांच्या हस्ते रुद्राभिषेक, महेश आडम व जयेश संगा यांच्या हस्ते होमहवन होणार आहे. तसेच पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. श्रीक्षेत्र तुळजापूर येथील श्रीतुळजाभवानी मंदिराच्या आवारात असलेल्या श्रीमार्कडेय मुर्तीस प्रसाद कोंडा व राहुल द्यावरकोंडा यांच्या हस्ते 'श्रीं' च्या मूर्तीस अभिषेक करण्यात येणार आहे. श्री गणेश जन्मोत्सवनिमित्त शनिवार, १ फेब्रुवारी रोजी पांडुरंग बिटला व अंबादास वल्लाकाटी यांच्या हस्ते मद्दा मंगल कार्यालय येथील श्रीगणपती मुर्तीस अभिषेक तसेच श्री गणेश मंदिर व श्री भृगुमहर्षी मंदिर वर्धापन दिननिमित्त सोमवार, ३ फेब्रुवारी रोजी नरेंद्र चिटमिल व जयेश संगा यांच्या हस्ते अनुक्रमे गणपती व भृगुमहर्षी मुर्तीस अभिषेक करण्यात येणार आहे. श्रीमार्कडेय जनजागृती संघाच्या वतीने श्रीमार्कडेय दीक्षा कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला.





### राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांना सोलापुरी वॉल हँगिंग भेट

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांना भाजपा सोलापूर शहर उपाध्यक्ष श्रीनिवास दायमा यांनी सोलापूरचे वैशिष्ट्य असलेले वॉल हँगिंग भेट दिले. विशेष म्हणजे या वॉल हँगिंगवर मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांची प्रतिकृती बनविण्यात आली होती. राजस्थानची राजधानी जयपूर येथे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांची भेट घेऊन श्रीनिवास दायमा यांनी त्यांची प्रतिकृती असलेले वॉल हँगिंग, सोलापूरचे चार हुतात्मे यांची माहिती असलेले पुस्तक देऊन सत्कार केला. विधानसभा निवडणुक काळात राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी सोलापुरात राजस्थानी आणि उत्तर भारतीय समाजाचा मेळावा घेऊन सोलापुरातील राजस्थानी आणि उत्तर भारतीयांना भाजपाला निवडून आणण्याचे आवाहन केले होते. यावेळी श्रीनिवास धर्म यांनी मुख्यमंत्री शर्मा यांना सोलापूरच्या चार हुतात्म्यांविषयी माहितीही दिली.याप्रसंगी मारवाडी युवा मंचाचे महाराष्ट्र प्रदेश संस्थापक सदस्य वीरेंद्रकुमार धोका यांची उपस्थिती होती.

## निधन वृत्त...

### निर्मला कासेगाव



**सोलापूर, दि.२४ जानेवारी-**

मड्डी वस्ती येथील निर्मला नागनाथ कासेगाव (वय ६५) यांचे अल्प आजाराने निधन झाले. शनिवारी २५ जानेवा रोजी सकाळी ११ वाजता त्यांच्या निवासस्थानापासून अंतयात्रा निघून रुपाभवानीजवळील सहस्त्रार्जुन वैंकुठभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात मुलगा, सून व नातवंडे असा परिवार आहे.

# मिळकत कर थकबाकीपोटी गाळा सील

**पाच नळ केले बंद**

**१२ दिवसात जमा केला ५ कोटी मिळकत कर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ जानेवारी-**

थकीत मिळकत कर वसुलीसाठी महापालिका मालमत्ता कर विभागाच्या पथकांकडून शहर आणि हद्दवाढ भागात जोरदार मोहीम सुरू आहे. मिळकत कर थकबाकीपोटी गाळा सील तर ५ नळ बंद करण्यात आले आहेत.

दरम्यान, महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजनपूर्वक ही मोहीम सुरू आहे. ही मोहीम सुरू असतानाच गेल्या १२ दिवसातील मोहिमेत थकबाकी मिळकतदारांनी ५ कोटी रुपयांपेक्षा अधिक कर जमा केला आहे. यामध्ये धनादेशाचा समावेश आहे. चालू आर्थिक वर्षासह मागील मिळकतकराची तब्बल ५०० कोटीहून अधिकची थकबाकी मिळकतदारांकडे आहे. चालू आर्थिक वर्ष मार्च अखेरपर्यंत म



हापालिका प्रशासनाने मालमत्ता कर विभागाला ५० टक्केहून अधिकच्या वसुलीचे उद्दिष्ट दिले आहेत. यावरून विभागाने शहरातील ५० पेठांमध्ये विशेष पथकाद्वारे वसुली आणि कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली आहे.

दरम्यान, गेल्या १२ दिवसातील मोहिमेत या पथकांच्या कारवाईला टाळून थकबाकी मिळकतदारांनी सुमारे ५ कोटी रुपयांहून अधिकचे कर जमा केला आहे. दररोज थकबाकीदारांकडून ४० ते ५० लाखाची वसुली होत असल्याची माहिती विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांनी दिली.

गुरुवारी शहरातील पश्चिम मंगळवार पेठ, दक्षिण सदर बाजार आणि विजापूर रोड येथे मोठ्या प्रमाणात वसुली आणि कारवाई मोहीम राबविण्यात आली. या परिसरातून देखील मोठ्या प्रमाणात थकबाकी वसूल करण्यात आली आहे. तर थकीत कर न भरणाऱ्या पश्चिम मंगळवार पेठेतील मनोहर नेहमीचंद गुळेचा वगैरे यांच्या ४ लाख ६१ हजार ५१५ रुपयांच्या थकबाकी पोटी त्यांची मालमत्ता सील करण्यात आली आहे. याचबरोबर दक्षिण सदर बाजार परिसरातील मधुमती गोविंद बिराळकर यांच्या १ लाख ३३ हजार ४५४ रुपये, गुणवंत महादेव बनसोडे यांच्या ९६ हजार ९३१ रुपये आणि जाफर मक्तुम पटेल यांच्या १ लाख ५२ हजार ८८७ रुपयांच्या थकबाकी पोटी त्यांच्या मिळकतीतील नळजोड तोडण्यात येऊन त्यांचा पाणीपुरवठा खंडित करण्यात आला आहे. याचबरोबर विजापूर रोड येथील तात्या मशाबा भोरे यांच्या १ लाख ६६ हजार ३८७ रुपये आणि देविदास सत्वजी थोरे यांच्या २ लाख २१ हजार १८७ रुपयांच्या थकबाकीपोटी त्यांच्या मिळकतींमधील नळजोड तोडण्यात आला.



## गोविंदराज नगर येथे दिपोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ जानेवारी-**

अयोध्या येथील प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापनानिमित्त रामलल्लांचं प्रतिकृती व गांभाऱ्याचे सजावट गोविंदराज नगर गणेशोत्सव मंडळ विडी घरकुलच्यावतीने दिपोत्सवाचे आयोजन केले होते.

याचे उद्घाटन आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने झाले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष बाळकृष्ण अवधूत यांच्या हस्ते आमदारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सचिव व्यंकटेश दोंता यांनी गोविंदराज नगर व भाग्यनगर मधील मुख्य रस्ते आणि अंतर्गत रस्त्यांची व्यथा मांडली. यावेळी तात्काळ आमदार देशमुख यांनी या भागातील रस्त्यांचे प्रश्न मार्गी लावण्याचे वचन दिले. या दिपोत्सव कार्यक्रमासाठी डॉ. माकम ग्रस्ट्रो क्लिनिकचे संचालक डॉ.श्रीकांत माकम यांची उपस्थिती होती.

याचवेळी गोविंदराज नगर गणेशोत्सव मंडळाच्या महिला मंडळाच्या वतीने हळदी कुंकूचा कार्यक्रम आयोजित केला. प्रभू श्रीरामाच्या सजावटीसाठी उमेश गायकवाड, रोहित संगा, आदित्य दुडम यांनी परिश्रम घेतले.



## नेताजी सुभाषचंद्र बोस यांना संभाजी आरमारची मानवंदना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

आझाद हिंद सेनेचे निर्माते थोर भारतीय सेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त संभाजी आरमारच्यावतीने नेताजी सुभाषचंद्र बोस उद्यान येथील पूर्णाकृती पुतळयास संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे व वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सुरज मुलाणी यांच्या हस्ते पुष्पहार व पुष्पचक्र अर्पण करण्यात आले.

याप्रसंगी संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, सरचिटणीस गजानन जमदाडे, शहरप्रमुख सागर ढगे, उपशहरप्रमुख रेवण कोळी, वाहतूक संघटनेचे अविनाश विटकर, महेश घोडके, प्रभागप्रमुख मल्लिकार्जुन पोतदार, द्वारकेश बबलादीकर, विकी ठेंगले, सागर दासी, स्वप्नील इराबत्ती, सोमनाथ मस्के, सुधाकर करणकोट आदींसह उपस्थित होते.

## डॉ.आंबेडकर उद्यानातील सुशोभीकरण कामाची आनंद चंदनशिवे यांनी केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

न्यू बुधवार पेठेतील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानातील सुशोभीकरणअंतर्गत सुरू असलेल्या विविध कामांची राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे व नगरअभियंता सारिका आकुलवार यांच्यासमवेत पाहणी केली.

यावेळी पाहणीवेळी आढळलेल्या विविध समस्यांच्या निराकरणाचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले. ही पाहणी करत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान मध्ये



विविध समस्या दिसून आल्या. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या पाठीमागील दोन्ही बाजूस सुरक्षा भिंत पडलेल्या अवस्थेत आढळून आले. उद्यानमधील सार्वजनिक स्वच्छतागृह स्वच्छ न केल्याने दुर्गंधी अवस्थेत आढळून आले. उद्यानमधील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या पाठीमागील बाजूस सुरक्षा भिंतीस चिटकून अनेक लोकांनी अनेक नागरिकांनी बांधकाम केल्याचे आढळून आले. उद्यानमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावणे अत्यंत गरजेचे असल्याचे आढळून आले. या पाहणीनंतर घडलेल्या विविध समस्यांचे तातडीने निराकरण करण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे नगरअभियंता आकुलवार यांनी संबंधित विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी उपअभियंता अविनाश वाघमारे, उद्यान अधीक्षक जगदाळे, विभागीय अधिकारी विजय लोखंडे, मुख्य सफाई अधीक्षक नागेश बिराजदार, मुख्य आरोग्य निरीक्षक सूर्यकांत लोखंडे, लाईट विभागाचे इंजिनीयर भाऊसाहेब गेजगे, इंजिनीयर कोणे आरोग्य निरीक्षक कुरले, सर्वेअर आकाश कोकरे, पीएचइ इलेक्ट्रिकल इंजिनीयर आरोग्य निरीक्षक कुरले होटगी, चंद्रकांत सोनवणे, गौतम नागटिळक, विलास उपळेकर, अक्षय मस्के, श्रीकांत सातपुते, देविदास चिंचोळकर आदी उपस्थित होते.

## सेवासदन शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ जानेवारी-**

येथील सेवासदन प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते चौथी मधील विद्यार्थिनींचे वार्षिक स्नेहसंमेलन हुतात्मा स्मृती मंदिर येथे झाले. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन संस्थेच्या सचिवा वीणा पतकी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सदस्य पद्माकर कुलकर्णी, मुख्याध्यापिका राजश्री रणपिसे, मुख्याध्यापिका संजीवनी नगरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शाळेतील मुलींनी मराठी भाषा संवर्धन पधंरवडा निमित्ताने सेवासदन प्राथमिक शाळेच्या स्नेहसंमेलनाची सुरुवात इयत्ता दुसरीच्या विद्यार्थिनींनी-'लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी' या मराठी भाषेचा महिमा वर्णन करणाऱ्या बहारदार गीताने सुरुवात करण्यात आली. नटराज नमन गीत, मावळे गीत, जागर गीत, शेतकरी गीत, आदिवासी नृत्य गीत, देशभक्ती गीत, व बालगीत इत्यादी गीतांनी सादर करण्यात आले. यासाठी प्राथमिक विभागाच्या कविता शिंगे, प्रमोदिनी खजुरकर, सुमन दोरकर, सुरेखा घाटेकर, दिपाली पुजारी, अश्विनी मोटगी, रश्मी




कुलकर्णी, सुविद्या काळेल, वंदना ताटे, रेश्मा सावंत, सोनाली काशीद, सोनाली माने मनीषा भोसले या शिक्षकांचे तसेच अनिल उडचणकर, राणी कोकरे यांचे सहकार्य लाभले.

# मातीशी नातं सांगणारा साहित्य जागर

आज मंगळवेढा तालुक्यातील शरद नगर येथे भरत आहे. त्यानिमित्ताने हा लेखन प्रपंच. आजच्या काळात मोठ्या संमेलनांची गरज हा वादाचा मुद्दा असू शकतो. मात्र जिल्हा पातळीवर भरणारी छोटी छोटी साहित्य संमेलनं ही नक्कीच काळाची गरज आहे. कारण स्थानिक पातळीवरची प्रतिभा सामावून घेण्यासाठी ही संमेलनं उपयोगी पडत असतात. शेवटी कुठल्याही गोष्टीला व्यासपीठ मिळणं गरजेचं असतं. ते मिळालं नाही, तर कधीकधी चांगली अभिव्यक्तीही कोमेजून जाण्याची शक्यता असते. म्हणूनच गेल्या काही वर्षांत राज्यपातळीवर सुरू झालेली छोटी-छोटी संमेलनं म्हणजे साहित्यक्षेत्राला नव्यानं उभारी देणारी सांस्कृतिक केंद्रच ठरत आहेत. किंबहुना तळपातळीवर सुरू असलेली ती साहित्यिक चळवळच आहे. ही चळवळ अनेकांना व्यक्त होण्याचं बळ पुरवत आहे. महत्त्वाचं म्हणजे त्यामुळे शहर,गावपातळीवरची संमेलनं आता शेतातही व्हायला लागली आहेत, थेट मातीशी नातं सांगत. गेली काही वर्षं २५ जानेवारीला शेवटच्या आठवड्यात मंगळवेढ्यातील शरद नगर येथे भरणारं शिवार संमेलन हे त्याचं उत्तम उदाहरण.

शिवार साहित्य संमेलन सुरू होण्यामागचं हकीकतही खूप मजेशीर आहे. सन २०१९ च्या डिसेंबर महिन्यात महाराष्ट्र साहित्य परिषद दामाजी नगर शाखेचे अध्यक्ष प्रा. प्रकाश जडे, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी, दिगंबर भगरे, संभाजी सलगर, लहु ढगे, अँड.नंदकुमार पवार. आणि इतरांच्या चर्चेमधून प्रत्यक्ष शिवारात जाऊन साहित्य-संस्कृतीचा जागर घडवून आणण्याची अभिनव कल्पना समोर आली आणि आणि मंगळवेढ्यातील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या दामाजी नगर शाखेने 'शिवार' साहित्य संमेलनाला सुरुवात केली. नुकताच शाखा मेळावा ही झाला होता त्याच्यातून ही संकल्पना पुढे आली. आणि शिवार' संमेलनाची कल्पना सुचली पण ते प्रत्यक्ष भरण्यासाठी जानेवारी २०२० साल उजाडावं लागलं. त्या वर्षी पहिलं 'शिवार' साहित्य संमेलन मंगळवेढा तालुक्यातील डोंगरगाव (चारा-छावणी) येथे झाले. त्या पहिल्या संमेलनाचे अध्यक्ष प्रा. प्रकाश जडे होते तर स्वागताध्यक्ष म्हणून शेतकरी सुखदेव मोरे होते. त्यानंतर मंगळवेढा तालुक्यातच मंगल फार्महाऊस, विजापुर रोड येथे झाले त्याचे अध्यक्ष होते कृषिनिष्ठ शेतकरी-भिमाशंकर भांजे, तर स्वागताध्यक्ष अँड.रमेश जोशी, त्यानंतर धर्मगाव येथे संमेलन झाले त्यावेळी अध्यक्ष डॉ. महेश खरात होते तर स्वागताध्यक्ष तायप्पा टकले होते. डॉ. शिर्के फार्महाऊस सोलापूर रोड येथे शिवार संमेलन झाले त्याचे अध्यक्ष डॉ. अरुण शिंदे होते तर डॉ. प्रीती शिर्के स्वागत अध्यक्षपदी होत्या. दामाजी नगर येथे संमेलन झाले त्यावेळी अध्यक्षपदी डॉ. शिवाजी शिंदे यांची निवड करण्यात आली होती. तर स्वागतअध्यक्षपदी अँड. विनायक नागणे होते. आणि यंदाच्या वर्षी हे संमेलन मंगळवेढा ते पंढरपूर रस्त्यावर असलेल्या शरद नगर येथे येत्या २५ जानेवारी रोजी दिवसभर होणार आहे या संमेलनाचे अध्यक्षपदी ज्येष्ठ लेखिका वासंती मेरू यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून स्वागत अध्यक्षपदी प्रा. दौलतसिंह रजपूत असतील. कुठलाही अभिनिवेष नसलेलं हे संमेलन असल्यामुळे ते साधेपणाने साजरं होतं. परंतु त्यामुळेच त्याची लोकप्रियता वाढत आहे आणि कुठल्याही प्रकारची जाहिरात न करताही स्थानिकांबरोबरच मान्यवर लेखकमंडळीही या संमेलनाबद्दल उत्सुकता दाखवतात. साधारणतः दरवर्षी जानेवारी ते फेब्रुवारीच्या आसपासच्या रविवारी किंवा इतर सुट्टीच्या दिवशी तालुक्यातीलच एखाद्या गावाला यजमानपद देऊन 'शिवार' साहित्य संमेलनाचं आयोजन करण्यात येतं आणि मग गावकरी अगदी घरचं कार्य असल्यासारखे राबतात. सर्व व्यवस्था करतात. पाणी उपलब्ध आहे, अशा शेतात मंडप टाकला जातो. सोलापूर जिल्ह्यातील आणि आजूबाजूच्या परिसरातील तसेच इतर जिल्ह्यातील मसापचे सर्व पदाधिकारी व कथा-कविता लिहिणारी सर्व साहित्यिक मंडळी सकाळी आठ-साडेआठपर्यंत संमेलनस्थळी येऊन पोहोचली की, संयोजक गावातील ग्रामदेवतेच्या मंदिरापासून बैलगाडी सह ग्रंथदिंडी काढतात. या दिंडीत संमेलनाध्यक्ष, मसापचे पदाधिकारी, सरपंच, स्वागताध्यक्ष, उद्घाटक, ग्रामस्थ आणि शाळकरी विद्यार्थी सहभागी होतात. ही सगळी मंडळी साहित्या विषयी आस्था असलेली असतात. ग्रंथदिंडी संमेलनस्थळी आली की सर्वांची न्याहारी होते. न्याहारीला कांदा, पिठलं, भाकरी, या सारखे अस्सल ग्रामीण भागातील जेवणाची मेजवानी असते. मग उद्घाटनसत्र संपन्न होतं. हे सत्र संपलं की कथाकथन सत्र असतं. शेतकरी-कष्टकरी यांच्या जीवनाचं वास्तव कथन करणाऱ्या कथा प्रामुख्याने असतात. एखादा कथाकार शृंगारिक कथादेखील सांगतो. पण त्यामुळे कुणी बुजून जात नाही. कारण ग्रामीण धर्तीवरचा मोकळा शृंगार असला, तरी कथाकथनकाराचं मर्यादेचं भान सुटलेलं नसतं. दुपारी एकच्या दरम्यान भोजनासाठी सर्व अतिथी व विद्यार्थी एकत्र बसतात. जेवण झाल्यावर अंदाजे तीनच्या दरम्यान कवी-संमेलनाला सुरुवात होते. सुमारे ऐंशी ते नव्वद कवी-कवयित्री आपल्या रचना शिवारच्या व्यासपीठावर सादर करतात. या सत्राला सर्वाधिक रसिकांची उपस्थिती असते. महत्त्वाचं म्हणजे या सत्रात सादर होणाऱ्या कविता बहुशः गाव-शिवाराशी नातं सांगणाऱ्या असतात. भौतिक विकासापेक्षा माणूस आणि मातीच्या नात्याचा वेध घेणाऱ्या असतात. तर शेवटचं सत्र समारोपाचं असतं. या सत्रात विविध सामाजिक-सांस्कृतिक प्रश्नांवर भूमिका घेऊन ती मांडली जाते. याच सत्रात पुढील वर्षीच्या 'शिवार' संमेलनस्थळाचीही घोषणा केली जाते. या संमेलनाची खासियत म्हणजे संमेलनानिमित्ताने प्रतिवर्षी स्मरणिकाही काढली जाते.

हे एक दिवसाचं साहित्य संमेलन म्हणजे खऱ्या अर्थाने मातीतल्या साहित्य-संस्कृतीचा जागर असतो. कारण यात स्थानिक प्रतिभेला सामावून घेतानाच त्या-त्या गावातील कलावंतांनाही व्यासपीठ मिळवून दिलं जातं. संमेलन फक्त एक दिवसाचं असलं तरी आयोजकांची आत्मीयता आणि रसिकांचा मिळणारा प्रतिसाद बघून दरवर्षी थेट अनेक जिल्ह्यातून लेखक, कवी, साहित्यिक, प्रकाशक या संमेलनाला हजेरी लावतात.

थोडक्यात काय तर मसाप दामाजी नगर शाखेने, वाचन-लेखन संस्कृतीची जोपासना-उपासना होऊन ती प्रत्यक्ष शिवारात रुजावी या निर्मळ उद्देशाने 'शिवार' साहित्य संमेलनाची पाच वर्षांपूर्वी सुरुवात केली आणि आज या वाङ्मयव्यवहाराची उत्सवाची फळं दिसू लागली आहेत. कष्टकरी वर्गातील तरुण मुलं कथा-कवितांच्या माध्यमातून आपल्या अनुभवांना वाट करून देत आहेत. हे तरुण-तरुणी मसाप दामाजी नगरच्या प्रत्येक कार्यक्रमाला उपस्थित राहत आहेत. आपल्या ओबड-धोबड लेखनाचं आविष्करण करीत आहेत. मसापचे पदाधिकारी दिगंबर भगरे, लहू ढगे, संभाजी सलगर, बालाजी शिंदे, अँड. नंदकुमार पवार आदी मंडळी माजी मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, मसाप पुणे सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी, कल्याणराव शिंदे आदींच्या मार्गदर्शनाखाली निःस्पृहपणे कार्य करून मंगळवेढा तालुक्यात मराठी राजभाषा दिनाचं औचित्य साधत आहेत आणि सर्वांना सोबत घेऊन प्रत्यक्ष शिवारात साहित्य-जागर घडवून आणत आहेत. या प्रयत्नांमधूनच या मातीतला एखादा भूमिपत्र मराठी वाङ्मयामध्ये नक्कीच नाममुद्रा उमटवेल, अशी आशा शिवारवासी बाळगून आहेत.

**- पद्माकर कुलकर्णी**
सोलापूर जिल्हा प्रतिनिधी
महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


प्रयागराज येथील महाकुंभात आतापर्यंत कोट्यवधी भाविकांनी पवित्र स्नान केले आहे. येथे येणाऱ्या हिंदू भाविकांची संख्या वाढतीच आहे. पवित्र संगम तसेच तिथे गोळा झालेल्या लाखो लोकांचे शुक्रवारी टिपलेले हे विहंगम हवाई छायाचित्र

# अमेरिकेतील नागरिकत्वाचा आदेश असंवैधानिक

## ट्रम्प यांना फेडरल न्यायालयाचा धक्का

◆ **वॉशिंग्टन, २४ जानेवारी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जारी केलेल्या नागरिकत्व कायद्यासंदर्भातील आदेशाला फेडरल न्यायालयाने स्थगिती देत मोठा धक्का दिला. हा आदेश असंवैधानिक असून, नागरिकांच्या अधिकारांवर गदा आणणारा असल्याचे निर्णय देताना म्हटले आहे. अमेरिकेतील हजारो भारतीयांना दिलासा देणारा हा निर्णय आहे.

स्थलांतरित दाम्पत्याच्या मुलांना जन्माच्या आधारे नागरिकत्व नाकारणारा ट्रम्प यांचा निर्णय न्यायालयाने असंवैधानिक ठरविला. न्या. जॉन कफनॉर यांनी दिलेल्या



आदेशामुळे अमेरिकेत जन्मलेल्या सर्व नवजात बालकांना तूर्तास अमेरिकेचे नागरिकत्व मिळणार आहे. इलिनॉय, ओरेगॉन, वॉशिंग्टन, ॲरिझोना या चार डेमोक्रॅटिक राज्यांनी ट्रम्प यांनी जारी केलेल्या त्वासंदर्भातील आदेशाविरोधात स्थानिक फेडरल न्यायालयात याचिका दाखल केली होती. यात ट्रम्प यांचा आदेश रोखण्यात यावा, अशी मागणी केली होती. न्यायालयाने सुनावणीवेळी डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेला आदेश पूर्णपणे असंवैधानिक ठरविला तसेच पुढील आदेशापर्यंत निर्णयाला स्थगिती दिली. न्यायालयाच्या निर्णयामुळे अमेरिकेत राहणाऱ्या हजारो भारतीयांना दिलासा मिळाला.

### काय होते प्रकरण

डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतल्यानंतर दुसऱ्याच अमेरिकेत जन्माला आलेल्या इतर देशातील दाम्पत्याच्या मुलांना जन्मसिद्ध नागरिकत्व (अमेरिका बर्थराइट सिटीझनशिप) मिळण्याचा निर्णय रद्द केला होता. आदेशावर स्वाक्षरी केल्यानंतर जन्मसिद्ध नागरिकत्व संपुष्टात आले होते. याला अमेरिकेतील भारतीय खासदारांनी विरोध केला होता, तर २२ राज्यांच्या सरकारने याविरोधात न्यायालयात धाव घेतली होती. परंतु, न्यायालयाच्या निर्णयाने ट्रम्प यांना धक्का बसला आहे.

**न्यायालयाने काय म्हटले निर्णयात?**

फेडरल न्यायालयाचे न्या. जॉन कफनॉर यांनी निर्णयात म्हटले की, अमेरिकेत राहत असूनही देशाचे नागरिक नसलेल्यांना अमेरिकेच्या भूमीवर अपत्यप्राप्ती झाल्यास, आपोआप अमेरिकी नागरिकत्व मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. त्यांना हा अधिकार संविधानाने दिला असून, तो कुणीही हिरावून घेऊ शकत नाही. नागरिकत्व कायद्यासंदर्भात दिलेला आदेश असंवैधानिक असल्याने त्याला स्थगिती देण्यात येत आहे.

*(वृत्तसंस्था)*

# जॉन एफ. केनेडी यांच्या हत्येचा अहवाल होणार सार्वजनिक

## डोनाल्ड ट्रम्प यांची आदेशावर स्वाक्षरी

◆ **वॉशिंग्टन, २४ जानेवारी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी, सिनेटर रॉबर्ट एफ. केनेडी आणि मार्टिन ल्यूथर किंग ज्युनियर यांच्या हत्यासंदर्भातील अहवाल व दस्तावेज सार्वजनिक करण्याच्या आदेशावर स्वाक्षरी केली आहे.

पीडितांचे कुटुंबीय आणि अमेरिकेतील लोकांना या हत्येबद्दल सत्य माहिती व्हायला हवे असे आदेश देताना ट्रम्प यांनी म्हटले. अहवाल सार्वजनिक केल्यामुळे हत्येसंदर्भातील गूढ नागरिकांच्या समोर येईल, त्यामुळे अफवेला पूर्णविराम लागेल. ट्रम्प यांनी दिलेल्या आदेशात राष्ट्रीय गुप्तचर विभागाच्या संचालकांना १५ दिवसांत अहवाल सार्वजनिक करण्याची योजना सादर करण्याचे, तर ४५ दिवसांच्या आत हत्येतील नोंदीची पडताळणी करून अहवाल सार्वजनिक करण्याचा निर्देश दिला. अमेरिकेच्या संसदेतील सभागृह काँग्रेसचा कोणताही कायदा तिघांच्या हत्येशी संबंधित माहिती प्रसिद्ध करण्याची परवानगी देत नसला तरी, मी ठरविले की, हत्येशी संबंधित प्रत्येक अहवालाची पडताळणी करून तो नागरिकांच्या हितासाठी सार्वजनिक व्हायला हवा. जॉन एफ. केनेडी यांच्या हत्येचा अहवाल सार्वजनिक करणे हा ट्रम्प यांच्या निवडणूक प्रचारातील आश्वासनाचा भाग होता. *(वृत्तसंस्था)*

# तुम्ही, आम्ही दिल्लीत केव्हाही जाऊ शकतो

## अमित शहांसोबतच्या चर्चेनंतर भुजबळांचे विधान चर्चेत

**नाशिक, २४ जानेवारी -**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व राष्ट्रवादी काँग्रेसचे नाराज नेते छगन भुजबळ आज नाशिकमध्ये एका व्यासपीठावर आले होते. यावेळी शहांनी स्वतःहून भुजबळांना जवळ येऊन बसण्याचे सांगितले. त्यामुळे भुजबळ लवकरच भाजपत जाणार अशी चर्चा रंगली आहे. पण आता भुजबळांनी स्वतःच पुढे येत आपली अमित शहांशी कोणतीही राजकीय चर्चा झाली नसल्याचे स्पष्ट केले. पण याचवेळी त्यांनी तुम्ही, आम्ही केव्हाही दिल्लीत जाऊ शकतो, असे सूचक विधान केले. आता त्यांच्या या विधानाची चर्चा रंगली आहे.

गृहमंत्री अमित शहा आज नाशिकच्या दौऱ्यावर आले होते. त्यांनी मालेगावातील माजी सैनिक व शेतकऱ्यांनी अजंग येथे उभारलेल्या ५३८ एकरांवरील व्यंकटेश्वरा कृषी फार्मला भेट दिली. तसेच शेतकऱ्यांसाठीच्या माती परीक्षण केंद्र व अगरबत्ती कारखान्याचेही उद्घाटन केले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळही उपस्थित होते. अमित शहा कार्यक्रमासाठी व्यासपीठावर दाखल होताच त्यांची नजर भुजबळांवर पडली. त्यांनी त्यांना आपल्याजवळ बोलवत आपल्या जवळच्या खुर्चीवर बसवले. यावेळी दोन्ही नेत्यांत काहीवेळ संवादही झाला. शहांनी स्वतःहून भुजबळांना जवळ बोलावल्याने भुजबळांची भाजपशी जवळीक वाढल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. विशेषतः ते लवकरच भाजपच्या गोटात जातील असा दावाही केला जात आहे. या पार्श्वभूमीवर छगन भुजबळांनी शहांसोबत आपली काय चर्चा झाली? हे स्पष्ट केले. भुजबळ म्हणाले, अमित शहा साहेबांनी मला जवळ बसवले हा त्यांचा मोठेपणा आहे. मी त्यांच्यापासून लांब बसलो होतो. ते पाहून त्यांनी मला जवळच्या खुर्चीवर बसण्याची सूचना केली. यावेळी आमच्यात संक्षिप्त संवाद साधला. त्यात मी सांगितले की हे लोक ३ वर्षांपूर्वी माझ्याकडे आले होते. तेव्हा असे काही होऊ शकते असे मला वाटले नव्हते असे मी सांगितले. त्यावर अमित शहा यांनी या लोकांनी खरोखरच किमया करून दाखवल्याचे सांगितले. आम्हा दोघांत एवढीच चर्चा झाली. राजकारणावर कोणतीही चर्चा झाली नाही. अमित शहा यांनी मला तुम्ही भाषण करा अशी विनंतीही केली. पण मी त्यांना सांगितले की, तुम्ही येण्याअगोदरच माझे भाषण सांगितले आहे. पत्रकारांनी यावेळी भुजबळांना अमित शहांनी तुम्हाला दिल्लीत भेटण्यास बोलावले आहे का? असा प्रश्न केला. त्यावर त्यांनी दिल्ली ही देशाची राजधानी आहे... तुम्ही, आम्ही केव्हाही दिल्लीत जाऊ शकतो, असे सूचक विधान केले.

### मालेगावातील बॅनर्सवरून राष्ट्रवादीचे नाव चिन्ह गायब

दुसरीकडे, मालेगावात ठिकठिकाणी अमित शहा व छगन भुजबळ यांच्या स्वागताचे बॅनर्स लावण्यात आलेत. भुजबळ समर्थक आणि समीर भुजबळ युथ फाऊंडेशनच्या माध्यमातून हे बॅनर्स लावण्यात आलेत. त्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाव आणि पक्ष चिन्ह दिसत नाही. बॅनर्सवर केवळ अमित शहा, समीर भुजबळ व छगन भुजबळ यांचेच फोटो आहेत. त्यामुळे कार्यक्रमस्थळी याचीही जोरात चर्चा सुरू होती. उल्लेखनीय बाब म्हणजे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नुकतेच शिर्डीत २ दिवसीय अधिवेशन झाले. छगन भुजबळ यांनी या शिबिराला नाममात्र हजेरी लावली. त्यांनी अवघ्या २ तासांतच अधिवेशन स्थळाहून काढता पाय घेतला. छगन भुजबळ हे राज्य मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्यामुळे पक्ष नेतृत्वावर नाराज आहेत.

# संजय रॉयच्या विरोधातील याचिकेवर सोमवारी सुनावणी

◆ **कोलकाता, २४ जानेवारी**

आर. जी. कार रुग्णालयातील बलात्कार-हत्येप्रकरणी दोषी संजय रॉयला मृत्युदंडाची शिक्षा देण्याची मागणी करीत दाखल केलेल्या याचिकेवर लवकर सुनावणी घ्यावी, अशी विनंती सीबीआयने शुक्रवारी कलकत्ता उच्च न्यायालयाकडे केली. न्यायालय सोमवारी सुनावणी करणार आहे.

न्या. देबांग्सू बसक प्रमुख असलेल्या विभागीय खंडपीठासमोर डेप्युटी सॉलिसिटर जनरल राजदीप मजुमदार यांनी प्रकरण दाखल करीत यावर लवकर सुनावणी घेतली जावी, अशी मागणी केली. शिक्षा अपुरी असल्याच्या आधारावर सीबीआयला कनिष्ठ न्यायालयात आव्हान देण्याचा अधिकार आहे, असे मजुमदार यांनी न्यायालयात सांगितले. *(वृत्तसंस्था)*




# कुंभमेळ्यात अनोख्या शंखाची चर्चा

उत्तरप्रदेशातील प्रयागराजमध्ये आयोजित महाकुंभाची जगभरात चर्चा सुरू आहे. देशातील कानाकोपऱ्यातून शेकडो साधू-संतांसह देश-विदेशातून लाखो भाविक कुंभमेळ्यात आले आहेत. यंदाच्या कुंभमेळ्यात एका खास शंखाची सध्या चर्चा सुरू झाली आहे. शंखाच्या आवाजाने मन प्रसन्न होते. शंखाच्या आवाजाने नकारात्मक शक्ती दूर होतात, असे मानले जाते. साधारतः ४००-५०० रुपयांना शंख मिळतो. यंदाच्या कुंभमेळ्यात चक्क सहा लाख रुपये किमतीचा शंख आला आहे.

महाराष्ट्रातील नाशिकहून आलेल्या इंद्रा पवार यांनी महाकुंभमेळ्यात शंखाचे दुकान टाकले आहे.

त्यांच्याकडे विविध प्रकारचे शंख आहेत, त्यांच्या किमतीदेखील भिन्न




आहेत. पण, त्यांच्याकडे सुमारे दोन फूट लांब आणि १० इंच गोल आहे, ज्याची किंमत तब्बल ६ लाख रुपये आहे. पवार यांच्या दुकानासमोरून जाताना अनेकजण हा शंख पाहून थांबतात, पण किंमत ऐकून त्यांना धक्का बसतो.

दुकानदार इंद्र पवार यांनी सांगितले की, ज्जैनहून हा शंख विक्रीसाठी घेऊन आलो आहे. असे म्हटले जाते की, हा विष्णू शंख आहे. याचा लक्ष्मी पूजनात वापर केल्याने धनप्राप्ती होते. हा शंख गुजरातमधील जामनगर येथील बेट द्वारिका नावाच्या ठिकाणी समुद्रात सापडतो. या शंखाद्वारे मंदिरांमध्ये जल अर्पण केले जाते. समुद्रात या प्रकारचा शंख मिळणे खूप दुर्मिळ आहे. दरम्यान, कुंभमेळ्यात अनेक श्रीमंत भाविक आले आहेत, त्यांच्यापैकी कुणीतरी हा शंख विकत घेईल, अशी इंद्रा पवार यांना आशा आहे.

# आयआयटी बाबांनी बदलला 'लूक'

महाकुंभात आयआयटीवाले बाबा म्हणून प्रसिद्धी मिळालेले अभयसिंह पुन्हा एकदा चर्चेत आलेत, त्यामागचे कारण म्हणजे त्यांनी बदललेला त्यांचा लूक. दाढी कापली, आता क्लीन शेव्ह करून ते आले आहेत. लांब केस तसेच ठेवले. दोन-तीन महिन्यांतून मी लूक बदलतो, जेव्हा दाढी वाढते तेव्हा कापतो, मी रात्री महादेवाला सांगितले, उद्या दाढी करेल, रूप बदलेल. सांगितल्यानुसार केले, असेही अभयसिंह यांनी एका मुलाखतीत सांगितले आहे.



अभयसिंह जेव्हा महाकुंभात पोहचले तेव्हा त्यांची दाढी वाढली होती, लांब केस होते. जेव्हा एका चॅनेलने त्यांची मुलाखत घेतली, त्यात ते आयआयटी पदवीधर असल्याचे समोर आले. त्यानंतर सोशल मीडियात अभयसिंह यांच्या नावाची चर्चा सुरू झाली. रातोरात अभयसिंह प्रसिद्धीझोतात आले. आता लूक बदलल्यामुळे ते चर्चेत आहेत. मी याआधीही असे केले आहे, असे त्यांनी सांगितले.

जेव्हा मी या कुंभमेळ्यात आलो, तेव्हा महादेवाने मला दोन गोष्टी सांगितल्या. एका ठिकाणी एकच रात्र थांबायचे आणि पुढे निघून जायचे. १ किमी, २ किमी...चालतच राहायचे. २-३ महिने झाले दाढी वाढली होती त्यामुळे मी कापून टाकली. त्याशिवाय कानातील कुंडल घालण्यावरूनही त्यांनी मी या गोष्ट यासाठी करत नाही, कारण ते साधू करतात. मी केवळ अध्यात्मात ज्या वस्तूंचा वापर केला जातो, मग ती माळ घालणे असेल, टिळा लावणे असेल अथवा धोती घालणे. हे सर्व मला आवडते म्हणून मी घालतो, असे ते म्हणाले. विशेष म्हणजे, आयआयटीवाले बाबाचा हा लूक ओळखणे अनेकांसाठी कठीण झाले आहे. सध्या हा लूक सोशल मीडियात चर्चेत आला आहे.

मी दाढी-मिशा ठेवल्या तर हे मला आयआयटीवाले बाबा बोलत होते. भगवान शंकर, भगवान श्रीकृष्ण यांनीही दाढी ठेवली नव्हती. परंतु, त्यांना कुणी श्रीकृष्ण बाबा बोलत नाही. त्यासाठी मीदेखील क्लीन शेव्ह केले आहे. तसे तर सर्वांच्या आत देव असतो, अहम् ब्रह्मास्मि हे तर शंकराचार्याने म्हटले होते, असे अभयसिंह यांनी सांगितले.

# मुलाला धुनीवर अर्पण करून गेले आई-वडील

## संतांकडून तीन वर्षाच्या मुलाचे संगोपन

संतोष पुरीजी महाराज त्यांच्या छावणीत धुनीजवळ बसले होते. अचानक एक जोडपे तीन महिन्यांच्या मुलाला घेऊन आले. त्यांनी प्रथम आपल्या काळजाचा तुकडा महाराजांच्या चरणी ठेवला, नंतर तो धुनीला अर्पण केला. संतोष पुरीजी महाराजांनी मुलाच्या कपाळावर तिलक लावला. पालकांना प्रसाद देऊन निरोप दिला. महाराजांनी या तीन महिन्यांच्या बाळाचे नाव श्रवणपुरी ठेवले.

आता श्रवण पुरी तीन वर्षांचा आहे. आपल्या पहिल्या महाकुंभात सहभागी होण्यासाठी तो आपले गुरु भाई अष्टकौशल महंत संत पुरी महाराज यांच्यासोबत कुंभ परिसरात आला आहे. अष्टकौशल महंत संत पुरी महाराज यांचा संपूर्ण दिवस देवाच्या भक्तीमध्ये आणि श्रवण पुरीच्या संगोपनात जातो. श्रवण पुरीचा निरागसपणा पाहून त्याच्या शिबिरासमोर भाविकांची गर्दी जमते. तो संतांचा लाडका बनला आहे.



महंत सांगतात की, त्याला फळे खायला आवडतात. तो चॉकलेट किंवा टॉफीऐवजी फळे खाणे पसंत करतो. इतकेच नाही तर या तीन वर्षाच्या मुलाला आपल्या गुरू आणि गुरुबंधूंचा लळा आहे. त्याला त्यांच्यासोबत राहायला आवडते. श्रवण पुरीच्या आई-वडिलांची इच्छा असेल तेव्हा ते भेटायला येतात. त्याच्या संगोपनावर ते समाधानी आहेत. त्यांची आर्थिक स्थिती अतिशय चांगली असून, घरी सर्व प्रकारची संपन्नता आहे, हे विशेष.

## आखाडा परिषद मुलाला अर्पण करण्याच्या विरोधात

मंदिरात मुलांना अर्पण करण्याच्या प्रथेवर आखाडा परिषदेचे अध्यक्ष रवींद्र पुरी म्हणाले की, ही परंपरा योग्य नाही. केवळ गरीब कुटुंबातील मुलेच या परंपरेचा भाग बनतात, तर श्रीमंत कुटुंबातील मुले या प्रथेपासून दूर राहतात. मात्र, श्रवण पुरीसाठी तो एका श्रीमंत कुटुंबातून आल्याचे बोलले जात आहे. अशा मुलांचे पालक, ज्यांच्याकडे खाण्यापिण्याचे साधनही नाही, ते आपल्या मुलांना मंदिरात अर्पण करतात. अशा मुलांची काळजी घेऊन त्यांना शिक्षण देण्याचा आमचा नेहमीच प्रयत्न असतो. महाराजांनी सांगितले की मुले मोठी झाल्यावर त्यांना संत बनण्याची इच्छा असेल त्यांना दीक्षा दिली जाते. जेव्हा पालक आपल्या मुलांना त्यांच्या इच्छेनुसार मंदिरात पाठवायचे ठरवतात, तेव्हा ते त्यांना थांबवू शकत नाहीत. अशा परिस्थितीत आखाडा परिषद या प्रथेच्या विरोधात असल्याचे स्पष्ट होत असले तरी मुलांच्या पालकांच्या इच्छेचाही आदर करते.

# ममता कुलकर्णी बनली महामंडलेश्वर

कुंभमेळ्यात आलेली अभिनेत्री ममता कुलकर्णी किन्नर आखाड्याची महामंडलेश्वर बनली आहे. शुक्रवारी तिने प्रयागराजमधील संगम तटावर पिंडदान केले. आता तिला यमाई ममता नंद गिरी असे संबोधले जाईल. फक्त तिचा पट्टाभिषेक बाकी आहे.

ममता आज सकाळीच महाकुंभातील किन्नर आखाड्यात पोहोचली होती. तिने किन्नर आखाड्याचे आचार्य महामंडलेश्वर लक्ष्मीनारायण त्रिपाठी यांची भेट घेतली आणि त्यांचे आशीर्वाद घेतले. महामंडलेश्वर होण्याबाबत दोघांमध्ये सुमारे एक तास चर्चा झाली. यानंतर किन्नर आखाड्याने तिला महामंडलेश्वर ही पदवी देण्याची घोषणा केली.

यानंतर महामंडलेश्वर लक्ष्मीनारायण त्रिपाठी या ममतासोबत अखिल भारतीय आखाड्याचे अध्यक्ष रवींद्र पुरी यांच्याकडे पोहोचले. ममता आणि पुरी यांच्यात बराच वेळ संवाद झाला. यावेळी किन्नर आखाड्याचे अधिकारीही उपस्थित होते. मग तिची महामंडलेश्वर बनण्याची प्रक्रिया सुरू झाली. किन्नर आखाड्याने ममताच्या महामंडलेश्वर म्हणून नियुक्तीबाबत पूर्ण गुप्तता पाळली आहे.




# चित्रपट वार्ता

## जान्हवीची विवाह आणि विवाहनंतरची योजना तयार!

**मुंबई :** श्रीदेवीची कन्या जान्हवी कपूरचे नाव शिखर पहाडियासोबत जोडले जाते. आता त्यांचे नाते लपून राहिलेले नाही. जान्हवी बरेचदा तिरुपती मंदिरात दर्शनाला जात असते. एका मुलाखतीत तिने सांगितले की, मला नवरा आणि तीन मुलांसह तिरुपतीतच वास्तव्य करायचे आहे. मला एक साधारण आयुष्य जगायचे आहे. केळीच्या पानावर जेवणे, केसात मोगऱ्याचा गजरा, मणिरत्नम्‌चे संगीत ऐकणे हे सारे काही करायचे आहे. लग्नही तिरुपतीमध्ये होईल. मेहंदी आणि संगीत हे कार्यक्रम मात्र श्रीदेवीच्या चेन्नईतील घरात होतील. लग्नात मोगरा आणि मेणबत्त्यांची सजावट असेल, अशी सर्व योजनाही जान्हवीने सांगितली.



## 'मिशन अयोध्या' चित्रपटगृहात प्रदर्शित




**मुंबई :** अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिराच्या लोकार्पण वर्षपूर्तीचे औचित्य साधत शुक्रवारपासून 'मिशन अयोध्या' देशभरातील चित्रपटगृहांत प्रदर्शित झाला आहे. महाराष्ट्रातील १०० पेक्षा जास्त चित्रपटगृहांमध्ये हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. मिशन अयोध्या हा केवळ चित्रपट नाही, तर राष्ट्र मंदिराच्या संरक्षणाची आणि त्याच्या महत्त्वाची जाणीव जागवणारी प्रेरणादायी कलाकृती आहे, असे लेखक-दिग्दर्शक समीर सुर्वे यांनी सांगितले. कृष्णा दादाराव शिंदे, योगिता शिंदे यांच्या आर. के. योगिनी फिल्म्सने या चित्रपटाची निर्मिती केली आहे.

## शिल्पा शिंदेचा लग्नास स्पष्ट नकार

**मुंबई :** सध्याच्या काळात लग्नाच्या बाबतीत सगळ्यांचे विचार बदलले आहेत. अनेक अभिनेत्री तर एकट्या राहताना दिसतात. अभिनेत्री शिल्पा शिंदेने तर लग्नासाठी स्पष्ट नकार दिला. ती म्हणते, नात्यात कमी-जास्त होतच असते. माझे जीवन तसेही फार सामाजिक नाही. त्यामुळे मला कोणी आवडतच नाही. माझ्यासारखे लोक एकटेच खूश असतात. भूतकाळात जे काही घडले, त्यानंतर आता आपल्याला कोणीच नको, असे वाटते. एकटे राहणे आता सवयीचेही होत आहे. उद्या कोणी आयुष्यात आले आणि जे चाललेय् ते बिघडले तर काय करायचे. म्हणून जे आहे ते उत्तम आहे, असे शिल्पा म्हणते.



## अग्रलेख...

# आयुध निर्माणीतील शक्तिशाली स्फोट

नागपूरजवळ असलेल्या भंडारानजीकच्या जवाहरनगर आयुध निर्माणीत शुक्रवारी सकाळी झालेल्या शक्तिशाली स्फोटात आठ जण ठार झाले तर पाच जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी अनेकांची प्रकृती चिंताजनक आहे. या स्फोटाची तीव्रता पाहता मृतांचा आकडा आणखी वाढू शकतो. हा स्फोट इतका शक्तिशाली होता की, त्यात मृत्युमखी पडलेल्यांच्या शरीराचे तुकडे तुकडे झाले आणि दूरपर्यंत ते उडून पडले होते. जवळपास १० किमी परिसरात स्फोटाचा आवाज येत होता, हादरे जाणवले होते. अनेक घरांच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या तर काही घरांना तडेही गेले. देशाचा ७६ वा प्रजासत्ताक दिन रविवारी मोठ्या उत्साहात साजरा होत असताना आयुध निर्माणीतील या स्फोटाने सगळ्यांच्या उत्साह आणि आनंदावर काही प्रमाणात विरजण पडणे स्वाभाविक आहे. या स्फोटाचे कारण तत्काळ समजू शकले नसले, तरी शॉर्टसर्किटने हा स्फोट झाला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे. जवाहरनगरच्या या आयुध निर्माणीत लष्करासाठी दारूगोळा तयार केला जातो. याठिकाणी कडेकोट सुरक्षा व्यवस्था असते. बाहेरच्या लोकांना आत प्रवेश नसतो. अतिशय संवेदनशील अशा या परिसराची डोळ्यात तेल घालून काळजी घेतली जाते; तरीही अशी गंभीर घटना व्हावी, ही चिंतेची बाब म्हटली पाहिजे. कारण हा देशाच्या सुरक्षेशी संबंधित असा प्रश्न आहे. आयुध निर्माणी या संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत येत असतात, त्यामुळे संरक्षण मंत्रालयाच्या पातळीवर याची दखल घेतली जाईल तसेच स्फोटामागच्या कारणांचीही चौकशी केली जाईल, यात शंका नाही. २०२५ ची सुरुवात होत नाही, तोच देशात एकामागे एक अशा चिंता वाढवणाऱ्या घटना घडत आहेत. त्यामुळे नवीन वर्षात हे काय सुरू आहे, एकामागोमाग एक अशा घटना का घडत आहेत, असा प्रश्न पडणे स्वाभाविक म्हटले पाहिजे. काही दिवसांपूर्वीच प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभ मेळ्याच्या एका नगरातील काही तंबूंना गॅस सिलेंडरमुळे आग लागली. सुदैवाने या आगीत प्राणहानी झाली नाही. दोन-तीन दिवसांपूर्वीच लखनौवरून मुंबईला जाणाऱ्या पुष्पक एक्स्प्रेसमध्ये आग लागल्याच्या अफवेने घाबरलेल्या प्रवाशांनी आपला जीव वाचवण्यासाठी चालत्या गाडीतून रुळावर उड्या मारल्या. तोच विरुद्ध दिशेने येणाऱ्या बंगळुरू एक्स्प्रेसखाली हे प्रवासी चिरडले गेले. यात १३ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले. जीव वाचवण्याच्या प्रयत्नात या सर्व निरपराधांना काही दोष नसताना आपले प्राण गमवावे लागले. या महिन्याच्या सुरुवातीला छत्तीसगडच्या बिजापूरजवळ नक्षलवाद्यांनी सुरुंगाचा शक्तिशाली स्फोट घडवत निमलष्करी दलाचे वाहन उडवून दिले. यात ९ जवान हुतात्मा झाले तर आणखी काही जण जखमी झाले आहेत. एकामागोमाग होत असलेल्या या सर्व घटना या निव्वळ योगायोग की आणखी काही, अशी शंका कोणाच्याही मनात येऊ शकते. या सर्व घटनांमागे एखादा समान दुवा आणि समानसूत्र तर नाही ना, अशीही शंका कोणाच्या मनात आली तर त्याला दोष कसा द्यायचा?

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील भाजपा सरकारचा तिसरा यशस्वी कार्यकाळ सुरू आहे. मोदींच्या नेतृत्वात देशाने सर्व क्षेत्रात जेवढी प्रगती केली, तेवढी आतापर्यंत काँग्रेसी सरकारच्या जवळपास ६० वर्षांच्या कार्यकाळात झाली नाही. देशातील दुसरे पोलादी पुरुष म्हणवणाऱ्या मोदींच्या नेतृत्वात जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम रद्द करण्यात आले. २०२४ च्या २२ जानेवारीला अयोध्येतील राम जन्मभूमीवर उभारण्यात आलेल्या भव्य आणि दिव्य मंदिरात रामललाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली. आतापर्यंत देशातील कोट्यवधी हिंदू लोकांनी जी जी स्वप्न पाहिली, त्यातील बहुतांश मोदी यांनी पूर्ण केली; प्रत्यक्षात आणली. देशवासीयांची जी स्वप्ने प्रलंबित आहे, ती पूर्ण करण्यासाठी मोदी कामाला लागले आहेत. देशात कधी नव्हते तो हिंदू माणूस ताठ मानेने चालू लागला आहे. 'गर्व से कहो हम हिंदू है' म्हणू लागला आहे. त्यामुळे देशातील एक वर्ग दुखावल्या गेल्यासारखा दिसत आहे. आतापर्यंत काँग्रेसी सरकारने आपल्या गठ्ठा मतांच्या राजकारणासाठी या वर्गाला डोक्यावर बसवले होते. या वर्गाच्या तुष्टीकरणाची मोहीम हाती घेतली होती. देशात बहुसंख्यक असलेला हिंदू समाज आपले सत्त्व आणि स्वाभिमान गमावून बसला होता. मोदींनी या वर्गाला त्यांच्या क्षात्रतेजाची जाणीव करून दिली. त्याच्यात विझत चाललेल्या आत्मविश्वासाची ज्योत पुन्हा प्रज्वलित केली. ही ज्योत नुसती प्रज्वलितच केली नाही तर ती तेजाने तळपू लागली. यामुळे अल्पसंख्यक असूनही बहुसंख्यकांना डोळे दाखवणाऱ्या या वर्गाचे डोळे पडू लागले. या वर्गाने कधीच आपल्या निष्ठा भारतमातेच्या चरणी वाहिल्या नव्हत्या. मूठ उंचावून 'भारत माता की जय' म्हणताना या वर्गाच्या तोंडातून कधीच शब्द निघत नाही; हात मात्र थरथरत असत. त्यामुळे देशात ज्या काही अतिरेकी आणि दहशतवादी घटना घडतात, त्यात सर्वात पहिले संशयाची सुई या वर्गावर वळत असते. कारण या वर्गाला या देशाची प्रगती कधीच सहन होत नाही. त्यामुळे जिथे जिथे शक्य आहे, तिथे तिथे हा पूर्ण वर्ग म्हणता येणार नसला, तरी या वर्गातील काही असंतुष्ट आत्मे आपले उपद्रमूल्य सिद्ध करीत असतात. देशाच्या सुरळीत चालत असलेल्या गाड्याला खीळ घालण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यामुळे रेल्वेतील अपघाताची गोष्ट असो की आयुध निर्माणीत झालेला शक्तिशाली असा स्फोट असो, देशवासीयांच्या मनात नको त्या शंका उद्भवत असतात. मुळात अशा शंका उद्भवण्यासाठी या वर्गाचा भूतकाळातील काळा इतिहास कारणीभूत आहे. याचा अर्थ या वर्गातील सगळेच लोक असे आहेत असे नाही. यात काही चांगले आणि या देशावर प्रेम करणारे, देशाला आपली मातृभूमी समजणारे लोकही आहेत. पण या अल्पसंख्यकात असे लोक आणखी अल्पसंख्य आहेत. त्यामुळे या उपद्रवी लोकांना आवर घालण्याची कदाचित इच्छाशक्ती असली, तरी त्यांची मानसिक आणि शारीरिक ताकद नाही, हे या लोकांचे दुर्दैव आणि त्या लोकांचे सुदैव म्हटले पाहिजे. त्यामुळे भंडाऱ्याजवळच्या आयुध निर्माणीत झालेला शक्तिशाली स्फोट अशा देशविरोधी शक्तींनी घडवून आणला असेल तर तो सर्वांची झोप उडवणारा विषय ठरू शकतो. याबाबत आताच कोणती प्रतिक्रिया व्यक्त करणे घाईगर्दीचे ठरू शकते. मात्र, असे होणे पूर्णपणे अशक्य आहे, असेही नाही.

भंडारा आयुध निर्माणीतील या स्फोटात झालेली प्राणहानी तसेच वित्तहानी हा अतिशय चिंतेचा विषय म्हटला पाहिजे; त्याहीपेक्षा महत्त्वाचा मुद्दा या स्फोटात लष्करासाठी तयार केला जाणारा दारूगोळा पूर्णपणे नष्ट झाल्यामुळे लष्करासमोर नवीन संकट उभे राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही. आयुध निर्माणीतील हा स्फोट एक अपघात असला, तरी त्याची तीव्रता आणि गांभीर्य कमी होत नाही आणि यामागे घातपात असेल तर त्याचे गांभीर्य आणखी वाढल्याशिवाय राहात नाही. त्यामुळे याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. मात्र, पहिल्या दिवसाची प्राथमिकता ही मदत आणि बचाव कार्यांची असते. स्फोटात जे जखमी झाले, त्यांना तातडीने चांगले उपचार मिळाले पाहिजे. स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबांना नियमाप्रमाणे नुकसान भरपाई मिळेलच. मात्र अशा आर्थिक मदतीने कोणाच्याही घरातील गेलेला माणूस परत येऊ शकत नाही. घरातील कर्ता पुरुष गमावल्यामुळे त्या घराचे जे नुकसान होते, ते कधीच भरून न निघणारे असते. आर्थिक मदतीने भविष्यकाळातील दैनंदिन गरजा सुटत असल्या, तरी ज्या महिलांनी आपला पती, ज्या मुला-मुलींनी आपले वडील गमावले असतात, त्याची भरपाई कोणीच करू शकत नाही. त्यामुळे या स्फोटामागच्या कारणांचा अभ्यास करून अशा घटना भविष्यात होणार नाही, याची काळजी घेणे हाच यावरचा सर्वोत्तम उपाय आहे.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# महाकुंभ आणि रिकामे कुंभ

भारत देशाला समजून घ्यायचे असेल तर भारतीय दृष्टिकोनातूनच समजून घेता येईल. भारत आज कितीही आधुनिक झाला असला, तरी पाश्चात्त्य दृष्टिकोनातून या देशाकडे पाहता येत नाही. रिलिजनच्या दृष्टिकोनातून धर्म समजून घेता येणार नाही. कारण भारताचे आधुनिकीकरण हे वरवरचे आहे. म्हणजेच भारताचे शरीर मॉडर्न असले, तरी भारताचा आत्मा आध्यात्मिक आहे. महान तत्त्वज्ञानी ओशो यांनी खूप सुंदर कथा सांगितली आहे. जपानमध्ये एक संत कवी होते आणि एक आधुनिक तरुण कवी राहत होता. त्या तरुण कवीला नेहमी असं वाटायचं की, आपल्याकडे कितीही पैसे आणि प्रसिद्धी आली तरी संत कवींची प्रसिद्धी आपल्यापेक्षा जास्त आहे. त्याला प्रश्न पडायचा की, त्यांच्या कवितांमध्ये असं काय आहे जे माझ्या कवितेत नाही. या प्रश्नाचं उत्तर मिळविण्यासाठी तो संत कवींच्या आश्रमात गेला. संत कवीने त्याचे चांगले स्वागत केले, पाहुणचार केला. पण तरुण कवी त्यांना एकच प्रश्न विचारत होता,

''तुमच्या कवितेत असं काय आहे जे माझ्या कवितेत नाही. तुम्ही इतके प्रसिद्ध का? तुम्ही तर पब्लिसिटीसुद्धा करीत नाही. मी मात्र माझ्या कामाची पब्लिसिटी करतो, जाहिरात करतो. तरीदेखील लोक तुम्हाला जास्त मानतात.'' संत कवी त्याचं बोलणं शांतपणे ऐकत होते. ते म्हणाले की,

''आपण या विषयावर नंतर बोलू. आधी भोजन उरकून घेऊ.'' भोजन झालं, पण संत कवी काहीच बोलेना. त्यानंतर ते बाहेर फेरफटका मारायला गेले. फिरतानाही संत कवी मूळ विषयावर चर्चा न करता,

''हा निसर्ग किती सुंदर आहे नै, किती छान वारा सुटलाय, चंद्राच्या प्रकाशात चालण्याचा आनंदच काही निराळा असतो...'' अशी अवांतर चर्चा करीत होते. मात्र, तरुण कवीला ही बडबड ऐकायची नव्हती. तो वैतागून म्हणाला,

''हे पाहा महाराज, मी तुमचा आदर करतो. पण तुम्ही माझ्या प्रश्नाचं उत्तर न देता नको ती बडबड करत आहात. तुम्हाला जर उत्तर नसेल द्यायचं तर सांगा. मी निघून जातो.'' त्यावर संत कवी स्मितहास्य करीत म्हणाले,

''बघ, तलावसुद्धा किती सुंदर आहे. चंद्राचं प्रतिबिंब या तलावात किती अप्रतिम दिसतंय. एक काम कर, हा दगड उचल आणि या प्रतिबिंबाच्या दिशेने भिरकावून दे.'' त्यावर तरुण कवी त्यांच्याकडे विचित्र नजरेने पाहू लागला. पण ते म्हणाले,

''मी तुझ्या प्रश्नाचंच उत्तर देतोय.'' मग त्याने दगड घेतला आणि पाण्यात चंद्राच्या प्रतिबिंबावर फेकला. तसा तो पाण्यातला चंद्र अस्थिर झाला. तरंग उठल्यामुळे चंद्राचं प्रतिबिंब काही वेळ थरथरलं. मग संत म्हणाले,

''आता दुसरा दगड घे आणि आकाशातल्या चंद्राच्या दिशेने भिरकावून दे.'' तरुण म्हणाला की,

''हे कसं शक्य आहे? हा दगड तिथपर्यंत पोहोचणारंच नाही.'' संत कवी म्हणाले,

''हाच फरक आहे, तुझ्या कवितांमध्ये आणि माझ्या कवितांमध्ये. तुझ्या कविता म्हणजे पाण्यातला चंद्र आणि माझ्या कविता म्हणजे आभाळातला चंद्र... कुणी कितीही ठरवलं तरी चंद्राचं अस्तित्व पुसून टाकू शकत नाही आणि चंद्राला जाहिरातीची गरज नाही. चंद्र इतका दिव्य आहे की कोणतीही जाहिरात न करता त्याचं अस्तित्व सर्वांना जाणवतं, त्याचं आकर्षण सर्वांना वाटतं.''

वाचकहो, सध्या कुंभमेळ्यातही हेच घडत आहे. मुख्य मीडिया आणि सोशल मीडिया इन्फ्लुएंसर साध्वींच्या वेशात फिरणाऱ्या तरुणींचं सौंदर्य दाखवत आहेत, मोनालिसाच्या सुंदर डोळ्यांची चर्चा होत आहे. आयआयटी बाबा प्रसिद्ध झाले आहेत. लक्षात ठेवा, भारत हा असा देश आहे जिथे स्त्रीच्या सौंदर्याची व्यवस्थित चर्चा केली गेली आहे; त्याचबरोबर स्त्रीच्या शक्तितत्त्वाची उपासनाही इथे होत आहे. आजच्या युगात काही लोक इतके स्वैर वागू लागले आहेत की, यांना कशाचंही बंधन राहिलेलं नाही. देवळात गेल्यावर उपासना करायची असते आणि शयन कक्षात शृंगार हा भेद जर कुणाला कळत नसेल तर त्याची सद्सद्विवेक बुद्धी मृतावस्थेत गेलेली आहे, असेच मानावे लागेल. कुंभमेळा हे पवित्र आध्यात्मिक स्थळ आहे. मग इथलं पावित्र्य, इथली आध्यात्मिक महिमा जगाला दाखवायची की नुकतीच वयात आलेल्या जपमाळ विकून पोट भरणाऱ्या मुलीचे सुंदर डोळे दाखवायचे? साधू-साध्वींचं सौंदर्य महत्त्वाचं नसतं तर त्यांची ईश्वराप्रती असलेली समर्पण वृत्ती महत्त्वाची असते आणि एखाद्या शिष्येला साध्वी म्हणणं कितपत योग्य आहे? याचं भान या लोकांनी नको का ठेवायला? महाकुंभ हे अद्भुत आहे. या ४५ दिवसांत ४० कोटी लोक इथे पवित्र स्नान करायला येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. म्हणजे दिवसाला सुमारे ९० लाख भाविक ईश्वराच्या तत्त्वात लीन होणार आहेत. ही किती अनोखी आणि अद्भुत गोष्ट आहे. जगात कुणालाही आमंत्रण न देता फक्त ४५ दिवसांच्या कालावधीत इतके लोक शिस्तबद्ध पद्धतीने एकत्र येऊ शकतात का? आणि इतकं सुंदर आयोजन कुठे पाहायला मिळतं का? सुमारे दोन लाख कोटींचा खर्च या सर्व भाविकांकडून होणार आहे. म्हणजे महाकुंभ केवळ आध्यात्मिक पर्व नसून आर्थिक पर्वदेखील आहे. कितीतरी लोकांना यामुळे रोजगार मिळत आहे. ही आहे हिंदू धर्माची ताकद. मग या गोष्टी न दाखवता स्त्रियांच्या सौंदर्याच्या मागे का पडले आहेत हे इन्फ्लुएंसर?

वरील गोष्टीत सांगितल्याप्रमाणे, हे इन्फ्लुएंसर चंद्राच्या प्रतिबिंबाकडे पाहून आनंद व्यक्त करीत आहेत. पण परम सुंदर चंद्राकडे पाहायला कुणाचीच तयारी नाही. साध्वी आणि तिथे फिरणाऱ्या मुलींचं सौंदर्य पाहण्यापेक्षा मूलतत्त्व असलेल्या शिवाची सुंदरता अनुभवायला हवी. कारण शिव सत्य आणि सुंदरही आहे. त्याच्या त्या अद्भुत सुंदरतेची तुलना कशाशीच करता येत नाही. ही सुंदरता अनुभवण्यासाठी इन्फ्लुएंसरची नव्हे तर इंट्युशनची आवश्यकता आहे. अर्थात अध्यात्मातला हा खूप मोठा टप्पा आहे. तिथपर्यंत पोहोचण्यासाठी खूप साधना करावी लागेल. पण सुरुवात तर करायला हवी ना... त्यामुळेच सर्वांनी सद्सद्विवेकबुद्धीचा वापर करून महाकुंभाचं पावित्र्य राखलं पाहिजे. खरं तर या आभाळातल्या चंद्राला जाहिरातीची आवश्यकता नाही. महाकुंभाचे महत्त्व आज जगाला कळले आहे. भारत हा देश जगाचे आध्यात्मिक आणि सांस्कृतिक नेतृत्व करू शकतो, यावर शिक्कामोर्तब झालेला आहे; पण कुंभमेळ्यात येणाऱ्या 'रिकामे कुंभ' असलेल्या इन्फ्लुएंसर्सना आवरायला हवं...

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# दावोस करारावर महाराष्ट्राची छाप!

दावोस येथे आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या भारताच्या पॅव्हेलियनमध्ये महाराष्ट्राचीच छाप दिसून आली. यामध्ये जगातील विविध उद्योग क्षेत्रातील दिग्गज समजल्या जाणाऱ्या कंपन्यांशी १५ लाख ७५ हजार कोटी रुपये एवढ्या विक्रमी गुंतवणुकीचे सामंजस्य करार करता आले. या माध्यमातून महाराष्ट्रात १५ लाख ९८ हजार रोजगार निर्मिती होण्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

वास्तविक यावेळी भारतातील तामिळनाडू, आंध्रप्रदेश इत्यादी राज्याचे प्रतिनिधीदेखील दावोस वर्ल्ड फोरममध्ये गेले होते. त्यावरून एका वृत्तवाहिनीच्या मुलाखतीत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, यावेळी भारताच्या सर्वच राज्यांमध्ये प्रचंड चुरस आहे. ती स्पर्धात्मक आणि सहकार्यात्मक असल्याचे त्यांनी सांगितले. कारण भारताला ५ ट्रिलियन इकॉनॉमी व्हायचे आहे किंवा आम्ही जगातली तिसरी अर्थव्यवस्था होण्याकडे वाटचाल करीत आहेत, त्यासाठी सर्वांनाच विकास साधावा लागेल. त्यासाठी देशातील सर्वच राज्यांना विकास करावा लागणार आहे. तसेच, याबाबत झालेल्या पत्रकार परिषदेत भारतातील या राज्यांचे व विविध पक्षांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. जवळपास विविध ७ ते ८ पक्ष, विविध भाषिक असूनही त्या सर्वांचा एकच मुख्य अजेंडा होता, तो म्हणजे राष्ट्र प्रथम! याचे दर्शन या फोरमच्या निमित्ताने पाहायला मिळाले. यामध्ये विविध भारतीय कंपन्यांचे स्टॉल लावण्यात आले होते. त्यात विशेषत: माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील स्टॉल विशेष आकर्षणाचे केंद्र होते. दावोस येथून मुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी



दृकश्राव्य प्रणालीने संवाद साधला. राज्याचे उद्योगमंत्री यात मुंबईतून सहभागी झाले होते. जल सुरक्षित भविष्यासाठी जागतिक सहकार्य हा विषय मुख्यमंत्र्यांनी मांडला. राज्यात त्यांच्या संकल्पनेतून अंमलात आलेल्या जलयुक्तशिवाय योजनेचे सादरीकरण त्यांनी केले.

या कराराच्या माध्यमातून एमएमआयमध्ये ६ लाख कोटींची गुंतवणूक राज्यात येत आहे. विदर्भालाही त्याचा मोठा फायदा होणार आहे. विदर्भात ५ लाख कोटी, उत्तर महाराष्ट्र ३० हजार कोटी आणि मराठवाडा हे मॅन्युफॅक्चरिंग हब म्हणून भविष्यातील शक्तिस्थळ ठरत आहे. मला आठवते की, यापूर्वी मुख्यमंत्र्यांना वृत्तवाहिनीच्या एका प्रतिनिधीने उद्धव ठाकरे यांनी राज्यातील उद्योग गुजरातमध्ये पळविल्याचा आरोप केल्याचा प्रश्न विचारला होता. त्याच्या उत्तरात मुख्यमंत्री म्हणाले होते की, महाराष्ट्रातील उद्योग कोणीही पळविलेले नाही. तर, आता मुंबई, पुणे सोडून उद्योजक संभाजीनगर व जालना जिल्ह्याकडे लक्ष केंद्रित करीत आहेत. त्यामुळे हे जिल्हे भविष्यातील नवीन मॅन्युफॅक्चरिंग हब होऊ शकतात. तसेच, महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) व माहिती तंत्रज्ञानात अग्रेसर राहण्यासाठी या वर्ल्ड फोरममध्ये करार करण्यात आले. त्यात गुगलशी झालेल्या कराराचा समावेश आहे. नवी मुंबईत इनोव्हेशन सिटी निर्माण करून एक परिसंस्था अभारण्याची मुख्यमंत्र्यांची योजना आहे. यशस्वी दावोस करारामुळे महाराष्ट्रात विदेशी गुंतवणूक होऊन मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे विरोधकांकडून महाराष्ट्रातील उद्योग गुजरातने पळविल्याच्या आरोपाला खणखणीत उत्तर मिळणार आहे. महाराष्ट्राने महायुतीला दिलेल्या प्रचंड बहुमताचे फायदे आता जनतेला नजीकच्या काळात मिळणार आहेत. राज्यात प्रचंड बहुमताचे स्थिर सरकार असल्यामुळे राज्याच्या हित व विकास साधण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुतीचे सरकार करणार असल्याची खात्री दावोस करारावरून मिळत आहे. ही तर सुरुवात आहे. पुढील पाच वर्षांत महाराष्ट्राचा औद्योगिक विकास झपाट्याने होईल, यात शंका नाही!

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# गडचिरोली आता थांबणार नाही!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्र्यांचा आझाद मैदानावर शपथविधी झाला तेव्हा तेथे 'महाराष्ट्र आता थांबणार नाही...' अशी टॅग लाईन या शपथविधी सोहळ्याला देण्यात आली होती. २०१४ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकासाचा धडाका लावला होता. मात्र, त्यानंतर गद्दारी करून उद्धव ठाकरेंनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत हातमिळवणी केली, मुख्यमंत्रिपदावर बसले. त्यांच्या नेतृत्वातील महाविकास आघाडी सरकारच्या काळात सर्व प्रकल्प आणि योजनांना केवळ स्थगिती देण्याचं काम अडीच वर्षांपेक्षा जास्त काळ झाले. मोठमोठे प्रकल्प थांबविल्यामुळे प्रकल्पांच्या किमतीत वाढ झाली आणि राज्याचे अर्थात जनतेच्या पैशाचे कोट्यवधींचे नुकसान झाले. त्यामुळे कदाचित थांबलेला महाराष्ट्र आता थांबणार नाही, असे ब्रीद आपल्या सरकारचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी यावेळी ठरविलेले दिसते. त्यांच्या या निश्चयाची सुरुवात ही गडचिरोलीपासून होताना झाल्याचे बघायला मिळत आहे. गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्राचा शेवटचा जिल्हा नसून पहिला जिल्हा आहे. त्याचा विकास आता थांबणार नाही, गडचिरोली आता थांबणार नाही! असा संदेश मुख्यमंत्र्यांनी आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरून दिला आहे.

गडचिरोली महाराष्ट्राचा शेवटचा नाही, तर पहिला जिल्हा आहे. महाराष्ट्राची सुरुवात इथून होते. म्हणूनच एकीकडे विकासाचा प्रवाह आणणं, तर दुसरीकडे शांतता प्रस्थापित करणं या दोन्ही मार्गांवर आम्ही यशस्वी वाटचाल करणार आहोत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं होतं. देशभरात सर्वत्र नवीन वर्षाचा जल्लोष सुरू असताना मुख्यमंत्री फडणवीस मात्र गडचिरोली दौऱ्यावर होते. नवीन वर्षाची सुरुवात त्यांनी गडचिरोलीच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवून केली. कोनसरी इथं विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमिपूजन झालं. गडचिरोलीत विकासाची गंगा आणेल, असा शब्द फडणवीसांनी दिला होता. शब्दाला खरे उतरत फडणवीसांनी 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'सारख्या जागतिक व्यासपीठावरून दाखवून दिले.

गडचिरोली इथं मोठं परिवर्तन होत आहे आणि होईल, याचा ट्रेलर



दावोस येथून मुख्यमंत्र्यांनी दाखविला आहे. दावोसला जाण्याआधी मुख्यमंत्र्यांनी किमान सात लाख कोटींची गुंतवणूक आपण महाराष्ट्रासाठी आणणार, असा विश्वास व्यक्त केला होता. मात्र, आत्मविश्वासाच्या बळावर दुप्पटहून अधिक, अर्थात रेकॉर्ड ब्रेक १५ लाख ७० हजार कोटींची गुंतवणूक राज्यात आणण्यात मुख्यमंत्री फडणवीस यशस्वी झाले आहेत. ७७ वर्षांच्या इतिहासातला हा सर्वाधिक आकडा आहे. त्यातल्या त्यात मुख्यमंत्र्यांनी ३ लाख कोटींहून अधिकची गुंतवणूक एकट्या गडचिरोली जिल्ह्यात आणली ती देखील पहिल्या क्रमांकावर करार करून, हे यावेळी विशेष आहे. बरं, हे करताना गडचिरोलीचा वसाहतीसारखा वापर होणार नाही तर खाणकामाचे फायदे स्थानिकांनाच मिळतील, हे देखील मुख्यमंत्र्यांनी सुनिश्चित केलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी गडचिरोली जिल्ह्यातील वढलापेठ येथे 'सुरजागड इस्पात प्रायव्हेट लिमिटेड' कंपनीच्या ग्रीन फिल्ड इंटिग्रेटेड स्टील प्रकल्पाचे उपमुख्यमंत्री असताना आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर भूमिपूजन केले होते. ज्या ठिकाणी हा कार्यक्रम पार पडला, याच भागात ४० वर्षांपूर्वी १९८४ साली माओवाद्यांचे सर्वात मोठे अधिवेशन झाले होते. प्रदीर्घ काळ नलक्षवादाने ग्रस्त राहिलेला हा जिल्हा विकासामध्ये मागे पडत राहिला आहे. नक्षलवादाचा बीमोड करण्यात अनेक वर्षे सरकारच्या हाती अपयशच आले. नक्षल्यांच्या प्रभावामुळे या भागात उद्योग यायला तयार नव्हते. रस्ते, पूल बांधायला पुढे येणाऱ्या कंत्राटदारांची वाहनं जाळून टाकणे, कामात अडथळा निर्माण करण्यासारख्या घटनांमुळे येथे कनेक्टिव्हिटीचीदेखील वाणवाच आहे. नक्षल्यांची भीती, दळणवळणाची अडचण, मोबाईल टॉवर जाळून टाकल्यामुळे संपर्क यंत्रणा नसणे यासारखी अनेक कारणं गडचिरोलीच्या विकासाला खीळ बसविणारी ठरली आहेत.

मात्र, २०१४ पासून फडणवीसांनी सुरू केलेली गडचिरोलीची विकासाच्या दिशेने झालेली वाटचाल ऐतिहासिक असून येत्या काळात ३ लाख कोटींहून अधिकची गुंतवणूक एकट्या गडचिरोलीत होणार आहे. त्यापूर्वी सुरजागड इस्पात प्रायव्हेट लिमिटेड सुमारे १० हजार कोटींची गुंतवणूक करत आहे. प्रकल्पाच्या माध्यमातून ७ हजार लोकांना रोजगार उपलब्ध होणार असून येत्या काळात या प्रकल्पाची 'तयार स्टील' उत्पादनाची क्षमता ८ दशलक्ष टन इतकी होणार आहे. यापूर्वी लॉईड्सने केलेल्या गुंतवणुकीतून ४ दशलक्ष टन इतकी क्षमता उभी राहिली होती. या दोन्ही प्रकल्पांमुळे महाराष्ट्राच्या एकूण फिनिश्ड स्टील उत्पादनात ३० टक्के वाटा हा एकट्या गडचिरोलीचा असणार आहे. चामोर्शीत वेगळ्याने ३५ हजार कोटींची गुंतवणूक होणार असून त्या माध्यमातून २० हजार तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांनी गडचिरोलीचे पालकमंत्रिपद आवर्जून स्वतःकडे ठेवून घेतल्याने आता गडचिरोली थांबणार नाही, हे काळ्या दगडावरची रेष म्हणायला हरकत नाही.

**औकात अपनी अपनी...**

यापूर्वी महाविकास आघाडीकडून आदित्य ठाकरेंनी दावोसमध्ये जाऊन ३० हजार कोटींचे सामंजस्य करार केले होते. त्यातदेखील महाराष्ट्रात झालेलेच करार पुन्हा दुसऱ्यांदा दावोसला जाऊन केल्याचे समोर आले होते. त्यानंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी ३ लाख १० हजार कोटींच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले होते. आता फडणवीसांनी तर इतिहासच रचला आहे. त्यामुळे कोण किती गुंतवणूक महाराष्ट्रासाठी आणली आणि कोणाची कुवत किती, हे या आकडेवारीवरून स्पष्ट होते.

९२७०३३३८८६

### भक्ती, शक्ती आणि व्यवस्थापनाचा सुंदर मिलाफ म्हणजे कुंभमेळा!

हिंदू धर्मातील सर्वात पवित्र आणि प्राचीन परंपरा म्हणजे कुंभमेळा! भक्ती, शक्ती आणि व्यवस्थापनाचा सुंदर मिलाफ अशी कुंभमेळ्याची जगभर ओळख आहे. कुंभमेळा हे साधू-संत आणि पवित्र व्यक्तींच्या भेटीचे ठिकाण आहे. विशेष म्हणजे भेटीचा हा योग १२ वर्षांतून एकदा कुंभमेळ्यातच येतो. या मेळ्यातील साधूंचे आखाडे हे विशेष आकर्षण ठरतात. या ठिकाणी सामान्य लोक या साधू-संतांना भेटू शकतात. कुंभपर्व सामान्य लोकांसाठी पुण्य प्राप्तीची संधी आहे. मकर संक्रांती, वसंत पंचमी यासारखे काही दिवस स्नानासाठी विशेष शुभ



मानले जातात. या दिवशी स्नानासाठी भारतवर्षातून लोक कुंभमेळ्यात हजेरी लावतात. हिंदूंचा हा धार्मिक उत्सव असला, तरी जगाच्या कानाकोपऱ्यातून पर्यटक भाविक स्नानासाठी येतात. यावर्षी अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, इटलीसह अनेक देशातून लोक शाहीस्नानासाठी कुंभमेळ्यात आले आहेत. श्रद्धा, व्यापार आणि आधुनिक व्यवस्थापनाचा हा संगम भारताच्या आर्थिक आणि सांस्कृतिक महत्त्वाला अधोरेखित करतो.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

●● ●●

### वाढीव ईपीएफ पेन्शन केव्हा मिळणार?

ईपीएफ पेन्शनधारकांना सध्या दरमहा १ हजार ते ३ हजार पेन्शन मिळत आहे. राज्यात ७० लाखांहून अधिक पेन्शनर आहेत. महागाईच्या तडाख्यात जीवन जगणे अशक्य झाले आहे. नुसत्या चर्चा सुरू आहे इतकी पेन्शन वाढली, वाढणार आहे. प्रत्यक्षात मात्र काही नाही. वाढीव पेन्शन मिळण्याच्या आशेने अनेकांनी श्वास सोडले. आता मात्र सरकारने फार अंत न पाहता या प्रश्नाकडे लक्ष घालावे ही विनंती. नवीन सरकार घेणारे नाही तर देणारे आहे अशी सरकारची प्रतिमा आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहावे, ही पुनश्च विनंती.

**विजय देशपांडे**/९०९६६५९४७०

## वाचक पत्रे

●● ●●

### दानाचे महत्त्व!

कुंभमेळा हिंदू धर्मातील सांस्कृतिक आणि आध्यात्मिक एकात्मतेचे प्रतीक असून जगातील सर्वात मोठ्या धार्मिक मेळाव्यांपैकी एक मानला जातो. करोडो साधू, संत, विद्वान आणि श्रद्धाळू स्नान, साधना, दानधर्म आणि सत्संगासाठी येथे एकत्र येतात. पद्म पुराणानुसार प्रयागराज सर्व तीर्थांमध्ये श्रेष्ठ असल्याचे सांगितले आहे. प्रयागराजच्या केवळ दर्शनाने पापक्षय होतो. महाप्रलयातही प्रयागराज शाश्वत राहील, अशी मान्यता आहे. कुंभ स्थानी केलेल्या स्नान आणि तर्पणाने पूर्वजांना मुक्ती मिळते. विविध पीठांचे संत, विद्वान आणि शंकराचार्यांचा सत्संग कुंभमेळ्यामुळे लाभतो. अशा या कुंभमेळ्यात विविध सामाजिक, आध्यात्मिक संस्था सेवाकार्य आणि धर्मजागृतीचे कार्य करत असतात. सगळ्यांना आर्थिक स्वरूपात अर्पण देऊन आपणही या धर्म जागृतीच्या कार्यात अप्रत्यक्ष सहभागी होऊ शकतो. पुराणानुसार तीर्थक्षेत्री, विशिष्ट काळात केलेल्या दानाचे १००० पट अधिक महत्त्व आहे.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

●● ●●

### राजयोगी स्नान नव्हे तर आध्यात्मिक स्नान!

देशातीलच नाही तर जगातील सगळ्यात मोठे असणारे हिंदूंचे धार्मिक एकत्रीकरण म्हणजे कुंभमेळा. प्रयागराज येथे सुरू असलेला कुंभमेळा सगळ्याच दृष्टीने विशेष असा आहे. हा कुंभमेळा तब्बल १४४ वर्षांनी आलेला आहे, म्हणूनच त्याला महाकुंभ संबोधण्यात आले. गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या सुंदर त्रिवेणी संगमावर प्रयागराज येथे या महाकुंभमेळ्याला सुरुवात झाली आहे. विविध आखाड्यांचे साधुसंत त्यांच्या शिष्यासह पवित्र स्नानासाठी दाखल झाले आहेत. त्याचबरोबर करोडोंच्या संख्येत देशातूनच नव्हे तर परदेशातूनदेखील भाविक पवित्र स्नानासाठी येत आहेत. पुण्यफलदायी, पापनाशक आणि मोक्षप्राप्ती करून देणारे त्रिवेणी संगमावरील हे अद्भुत जल आणखीनच पवित्र होते, जेव्हा विविध आखाड्यांचे साधुसंत यात स्नान करतात. महर्षी आध्यात्मिकविश्व विद्यालयाच्या वतीने नुकतीच एक चाचणी करण्यात आली; ज्यामध्ये संतांचे राजयोगी स्नान झाल्यानंतर पाण्याच्या आध्यात्मिक पातळीवर त्याचा काय परिणाम होतो, हे तपासण्यात आले. त्यासाठी युएएस (युनिवर्सल ऑरा स्कॅनर) या उपकरणाचा करण्यात आला. या उपकरणाने वस्तू, वास्तू आणि व्यक्ती यांमधील सकारात्मक आणि नकारात्मक ऊर्जा मोजता येतात. मुळातच कुठल्याही सात्त्विक नद्यांच्या संगमावरील पाणी तसेच आजूबाजूचे वातावरण हे सकारात्मक उर्जेने परिपूर्ण असते आणि साधुसंतांनी स्नान केल्यामुळे त्यांच्याकडून प्रक्षेपित होणाऱ्या चैतन्यदायी उर्जेमुळे तेथील पाण्यात सकारात्मक उर्जेची वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. यावरून राजयोगी स्नानाचे आध्यात्मिक महत्त्व लक्षात येते.

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### बोरामणीजवळ चारचाकीच्या धडकेत वृध्द दुचाकीस्वाराचा मृत्यू

**सोलापूर, दि. २४ जानेवारी -**

सोलापूर ते हैदराबाद रोडवरील बोरामणी जवळील हॉटेल यशराजजवळ पाठीमागून आलेल्या चारचाकी वाहनाने धडक दिल्याने वृध्द दुचाकीस्वाराचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. हा अपघात



२४ जानेवारी रोजी सकाळी ११ च्या सुमारास झाला. चाँद चमन मुजावर (वय ६५, रा. बोरामणी, ता. दक्षिण सोलापूर) असे मरण पावलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. २४ जानेवारी रोजी सकाळी ११ च्या सुमारास चाँद मुजावर हे त्यांच्या दुचाकीवरून बोरामणी येथून सोलापूरकडे येत होते. त्यावेळी बोरामणीजवळील यशराज हॉटेल ८ वा मैल येथे पाठीमागून आलेल्या टीएस ०७ यूए ५०१२ क्रमांकाच्या चारचाकी वाहनाने मुजावर यांच्या दुचाकीस जोरदार धडक दिली. यामध्ये मुजावर हे गंभीर जखमी होऊन बेशुध्द पडल्याने त्यांना भाऊ दाऊद मुजावर यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले असता चाँद यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. तुषार मेढे यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### चिंचोळी एमआयडीसीतील कंपनीत कामगाराचा मृत्यू

**सोलापूर, दि. २४ जानेवारी -**

चिंचोळी एमआयडीसीमधील एम जी व्ही या कंपनीत चक्कर येऊन पडून कामगाराचा मृत्यू झाला. नितीन हरिश्चंद्र मकवान (वय ४३, रा. पंडीत नगर, नाशिक सध्या रा. चिंचोळी एमआयडीसी, सोलापूर) असे मरण पावलेल्या कामगाराचे नाव आहे. २४ जानेवारी रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास नितीन मकवान हे एम जी व्ही कंपनीत काम ास असताना अचानक चक्कर येऊन बेशध्द पडले. त्यामुळे त्यांना बेशुध्दावस्थेत उपचारासाठी मित्र काशिनाथ पोतदार यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉ. तुषार मेढे यांनी नितीन मकवान यांस मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### घरगुती वादातून महिलेने विषारी औषध प्राशन केले

**सोलापूर, दि. २४ जानेवारी -**

घरगुती वादातून महिलेने सडा मारण्याचे विषारी औषध प्राशन केले.अंबिका उमाकांत रेगोरी (वय ४६, रा. घोंगडे वस्ती, सोलापूर सध्या रा. नविन विडी घरकुल, कुंभारी, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल झालेल्या महिलेचे नाव आहे. २४ जानेवारी रोजी सकाळी आठच्या सुमारा राहत्या घरी घरगुती वादातून अंबिका रेगोरी यांनी सडा मारण्याचे पिवळ्या रंगाचे औषध प्राशन केले. त्यामुळे त्यांना त्रास होऊ लागल्याने मुलगा महेश यांनी अंबिका यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### प्रजासत्ताक दिनाच्या परडेमध्ये पंढरपुरी म्हैस लक्ष वेधणार

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

भारताची ७६ वी प्रजासत्ताक दिनाची परेड २६ जानेवारी २०२५ रोजी होणार आहे, याप्रसंगी लष्करी सामर्थ्य आणि सांस्कृतिक वारसा दिसून येईल. भारत सरकारच्या पशुपालन मंत्रालयाच्या झाकी (प्रदर्शन) मध्ये महाराष्ट्राची शान असलेल्या



पंढरपुरी जातीच्या म्हशी दाखवल्या जाणार आहेत. परेडचा प्रारंभ सकाळी १०:३०वाजता सुरू होईल. परेडचे थेट प्रक्षेपण डीडी नॅशनल चॅनल आणि अधिकृत यू ट्यूब चॅनल ''दूरदर्शन नॅशनल'' वर केले जाणार आहे.

# विनाकारण चैन ओढणाऱ्या हुल्लडबाजांवर रेल्वे विभागाने उगारला कारवाईचा बडगा

## २५५ जणांना अटक करून १ लाख ७३ हजारांचा दंड वसुल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी -**



मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २०२४ मध्ये सतत जागरूकता मोहीम, कडक अंमलबजावणी उपाययोजना आणि सतर्क देखरेखीद्वारे अनधिकृत अलार्म चेन पुलिंग (एसीपी) घटनांना प्रभावीपणे हाताळले आहे. या सक्रिय प्रयत्नांमुळे रेल्वेच्या कामकाजात व्यत्यय कमी झाला असून वक्तशीरपणा सुधारला आहे. सोलापूर रेल्वे आरपीएफ विभाग एसीपी गुन्हेगारांविरुद्ध सक्रियपणे विशेष मोहिमा राबवत असून या मोहिमेत २५५ व्यक्तींना अटक करण्यात येऊन त्यांचयाकडून १ लाख ७३ हजार ७१५ रुपये दंड वसुल करण्यात आला आहे.

अलार्म चेन पुलिंग ही एक आपत्कालीन सुरक्षा सुविधा आहे ज्याचा उद्देश लोको पायलट आणि ट्रेन मॅनेजर (गार्ड) सारख्या रेल्वे कर्मचाऱ्यांना तात्काळ लक्ष देण्याची आवश्यकता असलेल्या परिस्थितीत सतर्क करणे आहे. प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आणि रेल्वे सेवा वेळेवर चालविण्यासाठी या सुविधेचा योग्य वापर करणे आवश्यक आहे.

तथापि, एसीपीचा गैरवापर हा चिंतेचा विषय आहे. प्रवाशांनी उशिरा पोहोचणे, अनधिकृत थांब्यांवर उतरणे किंवा चढणे यासारख्या क्षुल्लक कारणासाठी साखळी ओढल्याच्या घटना आढळून आल्या आहेत. रेल्वे कायद्याच्या कलम १४१ अंतर्गत अलार्म साखळीचा गैरवापर हा दंडनीय गुन्हा आहे, ज्यासाठी एक वर्षापर्यंत तुरुंगवास, १,०००/- रुपये दंड किंवा दोन्ही होऊ शकतात.

सोलापूर विभाग सर्व प्रवाशांना सुरक्षित, वक्तशीर आणि अखंड प्रवास अनुभव सुनिश्चित करण्यासाठी वचनबद्ध आहे. या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून, प्रवासी रेल्वे सेवा सुरक्षितता, वक्तशीरपणा आणि सुरळीत चालविण्यात सक्रिय भूमिका बजावू शकतात असे रेल्वेकडून सांगण्यात आले.

### गैरवापराचा परिणाम

गाड्यांमध्ये एसीपीच्या कृतीमुळे केवळ प्रभावित ट्रेनचे वेळापत्रकच बिघडत नाही तर इतर गाड्यांना विलंब होतो त्यामुळे ट्रेन उशिरा धावतात आणि त्यांच्या वेळेवर चालण्यास अडथळा येतो. शिवाय, एक किंवा काही प्रवाशांच्या सोयीसाठी एसीपीचा गैरवापर केल्याने वेळेवर ट्रेन सेवांवर अवलंबून असलेल्या इतर सर्व प्रवाशांना गैरसोय होते.

### प्रवाश्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे

✻ फक्त खऱ्या आपत्कालीन परिस्थितीत आणि आपत्कालीन परिस्थितीत एसीपी यंत्रणेचा वापर करावा असे आवाहन रेल्वेने केले आहे. ✻ ट्रॅव्हलिंग तिकीट परीक्षक (टीटीई) किंवा आरपीएफ कर्मचाऱ्यांसारख्या रेल्वे कर्मचाऱ्यांना संपर्क साधा ✻ मदतीसाठी १३९ वर रेल मददला कॉल करा ✻ सहप्रवाशांची मदत घ्या. ✻ याव्यतिरिक्त, प्रवाशांना त्यांच्या ट्रेनच्या नियोजित वेळेच्या किमान ३० मिनिटे आधी स्थानकांवर पोहोचून जबाबदारीने त्यांच्या प्रवासाचे नियोजन करण्यास प्रोत्साहित केले जाते. यामुळे बोर्डिंग प्रक्रिया सुरळीत होते आणि अनावश्यक एसीपी घटनांची आवश्यकता कमी होते.



# पुणे सहकारी बँकेवर सहकार खात्याकडून प्रशासक मंडळ नियुक्त

**पुणे, दि. २३ जानेवारी-**

पुणे सहकारी बँकेवर राज्याचे सहकार आयुक्त व निबंधकांनी अशासकीय पाच सदस्यांचे प्रशासक मंडळ नियुक्त केले असून यामध्ये पांडुरंग राऊत, ॲड. विकास रासकर, भालचंद्र कुलकर्णी, राहुल पारखे व नेहा केदारी यांचा समावेश आहे. सहकार खात्याच्या सहा. निबंधक प्रगती वाबळे यांची प्रशासक मंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या सभासदांच्या प्रयत्नातूनच गेल्या ४ महिन्यात नवीन सभासदांकडून सुमारे रु. २ कोटींचे भाग भांडवल जमा केल्याने बँकेचे भाग भांडवल आता रु. ४ कोटी ६३ लाख इतके झाले असल्याने बँकेचे नक्त मूल्य (नेट वर्थ) अधिक झाले आहे. या भरीव कामगिरीमुळे ही बँक लवकरच निर्बंधमुक्त होईल व सभासदांना दैनंदिन व्यवहार लवकरच सुरळीतपणे करता येतील असा विश्वास प्रशासक मंडळाने व्यक्त केला आहे. बँकेची स्थापना माजी खासदार स्व. ल. सो. तथा अण्णा जोशी यांच्या नेतृत्वाखाली २००३ मध्ये झाली होती. बँकेच्या पुण्यात शुक्रवार पेठ व बाणेर अशा २ शाखा असून बँकेकडे ठेवी रु. ९ कोटी ५० लाखांच्या आहेत तर कर्जे रु. ५ कोटी ५० लाखांची आहेत. कोरोना काळापासून म्हणजे मार्च २०२० पासून बँकेच्या व्यावसायिक खातेदारांना आलेल्या अडचणींमुळे या बँकेची वाढत गेलेली थकीत कर्जे (एनपीए) आणि संचित तोटा यामुळे रिझर्व्ह बँकेने मार्च २०२३ पासून पुणे सहकारी बँकेवर आर्थिक निर्बंध लावले आहेत. सध्या बँकेच्या खातेदारांना फक्त रु. १० हजार काढता येत आहेत.

# प्रा. चेतन पापडे यांना पीएच.डी. प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**



येथील नागेश करजगी आर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल विभागातील सहाय्यक प्रा. चेतन विजयकुमार पापडे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पीएच. डी. डिग्री प्रदान करण्यात आली आहे.

श्री. पापडे यांच्या या संशोधनात डॉ. ए. बी. कणसे-पाटील हे त्यांचे पीएचडी मार्गदर्शक होते. त्यांचे विभागप्रमुख, उपप्राचार्य, प्राचार्य आणि संस्थेच्या विश्वस्तांनी अभिनंदन केले.

''नॅनो मिक्स्ड फेज चेंज मटेरियल वापरून पॅराबॉलिक कॉन्सन्ट्रेटिंग सोलर कुकरची कार्यक्षमता वाढवणे'' या विषयावर त्यांनी केलेल्या संशोधनासाठी त्यांना ही डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या संशोधनात नॅनो मिक्स्ड फेज चेंज मटेरियल निर्मिती केली आहे. सौर ऊर्जा साठवण्यासाठी पारंपारिकपणे फेस चेंज मटेरियल वापरले जाते, परंतु त्यामध्ये काही तांत्रिक अडचणी आहेत. त्यात उच्च तापमानात वितळणे आणि कमी उष्णता वाहून नेण्याची क्षमता यांसारखी कमी कार्यक्षमता आढळते यावर उपाय म्हणून त्यांनी ॲल्युमिनियम ऑक्साईड नॅनो पार्टिकल्स फेस चेंज मटेरियल मध्ये मिश्रित केले. त्यामुळे याची कार्यक्षमता आणि ऊर्जा साठवण्याची क्षमता सुधारली आहे.



# प्रारूप शहर विकास आराखडा रद्द करा अन्यथा जन आंदोलन : फारूक शाब्दी

## महापालिका अतिरिक्त आयुक्त पवार यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.२४ जानेवारी-**

महापालिकेने प्रारूप शहर विकास आराखडा रद्द करावा किंवा दुरुस्ती करावा अन्यथा मोठे जन आंदोलन करण्यात येईल, असा इशारा एमआयएमच्या वतीने एमआयएम पक्षाचे राज्य कार्यकारी अध्यक्ष फारूक शाब्दी यांनी दिला आहे.

एमआयएमच्या वतीने महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांना निवेदन देण्यात आले. सोलापूर महापालिकेच्या वतीने प्रारूप विकास आराखडा प्रसिद्ध करुन विविध आरक्षण जाहीर झाले आहे.सोलापूर शहरातील अनेक धार्मिक जागा आरक्षित करण्यात आल्या आहेत.शहरातील मोठमोठ्या टोलेजंग इमारती असलेल्या नगराना झोपडपट्टी भाग म्हणून घोषित करण्यात आले आहे.शहरातील मोक्याच्या जागी खाजगी जागावर आरक्षण जाहीर करण्यात आले आहे असा आरोप केला आहे.सोलापूर एमआयएमच्या वतीने याचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करण्यात आला. एमआयएम पक्षाचे राज्य कार्यकारी अध्यक्ष फारूक शाब्दी यांनी ही तर हिटलरशाही सुरू आहे अशा शब्दांत महानगरपालिकेचा निषेध केला. हा आराखडा रद्द करा किंवा दुरुस्ती करा अन्यथा तीव्र स्वरूपात आंदोलन करण्याचा इशारा राज्य कार्याध्यक्ष फारूक शाब्दी यांनी दिला. निवेदन देताना गाझी जहागीरदार, तौफिक हत्तुरे, वाहेदा भंडाले, अझहर हुंडेकरी, एजाज बागवान, बिस्मिल्ला सय्यद, याकूब शेख, राजा बागवान, सादिक नदाफ अशफाक बागवान, शजर सय्यद, नदिम डोणगांवकर, नसिमा कुरेशी, इस्लामोद्दीन शेख, महीबुबअली कुरेशी, मचिंद्र लोकेकर आदी उपस्थित होते.

# विकास आराखड्यात सफाई कामगारांसाठी जागा आरक्षित करा

**सोलापूर, दि. २४ जानेवारी -**

सोलापूर : सोलापूर शहराच्या आगामी विकास आराखड्यात सफाई कामगारांना मोफत घरे देण्यासाठी पाच ठिकाणी जागा आरक्षित करा, अशी मागणी महापालिका कामगार संघटना कृती समितीने महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

याबाबत कामगार नेते व कृती समितीचे अध्यक्ष अशोक जानराव यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. त्यात म्हटले आहे की, महानगरपालिकेतील सफाई कामगारांना लाड-पागे समितीचा अहवाल सन २०१३ पासून लागू होऊन त्याचा अंमल सुरू आहे. सफाई कामगाराच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांना महापालिकेतर्फे मोफत घर देण्याची योजना सुरू आहे. या योजनेअंतर्गत मागील सात-आठ वर्षापूर्वी ७१ सफाई कामगारांना जुना तुळजापूर नाका येथे मोफत घरे बांधून दिलेली आहेत. महापालिकेत २००० सफाई कामगार असून मागील १० वर्षात सेवानिवृत्त झालेले सफाई कामगारांची जनगणना सुरू आहे. त्यातील पात्र सफाई कामगारांना मोफत घरे देणे बंधनकारक आहे. महानगरपालिकेने तयार केलेल्या नवीन विकास आराखड्यात शहराच्या वेगवेगळ्या मध्यवर्ती भागात पाच ठिकाणी प्रत्येकी चार-चार एकर जागेवर सफाई कामगाराच्या मोफत घर योजनेसाठी आरक्षित करावी. या जागेत छोटीशी बाग, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सोय होऊन सफाई कामगारांना प्रशस्त राहता येईल.

### सोलापूर महानगरपालिका विकास आराखडा
## कृती समितीची सोमवारी तातडीची बैठक

**सोलापूर, दि. २४ जानेवारी -**

सोलापूर महानगरपालिका विकास आराखडा कृती समितीची सोमवारी तातडीची बैठक सोमवार दि.२७ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता जागृत मारुती मंदिर, दोंदे नगर कॉलनी, गोविंदश्री मंगल कार्यालयाजवळ, जुळे सोलापूर येथे आयोजित करण्यात आली आहे. महापालिका प्रशासनाने नवीन विकास आराखड्यात शहरातील तसेच ''जुळे सोलापूरातील'' आरक्षणाच्या योग्य अशा ठिकाणी नागरी सोयी सुविधांसाठी आरक्षणाची सोय न करता अनेक ठिकाणचे आरक्षण रद्द किंवा अनेक ठिकाणी आरक्षण केले आहे. अशा महानगरपालिकेच्या आरक्षणा विरोधात आवाज उठविण्यासाठी शहरातील नागरिकांची तातडीची बैठक बोलावली आहे. यावेळी कलाकार, खेळाडू, साहित्यिक, कलावंत, सामाजिक कार्यकर्ते आदींसह नागरीकांनी बहुसंख्येने लेखी स्वरुपातील निवेदनासह बैठकीस हजर रहावे, असे आवाहन माजी आ. उत्तमप्रकाश खंदारे, माजी आ. शिवशरण पाटील - बिराजदार, लक्ष्मीकांत ठोंगे पाटील, शैलेश आमणगी, चेतन चौधरी यांनी केले आहे.


## Classifieds

### पाहिजेत

**हेवेनली ब्युटी लेडिज सलोन ॲन्ड ॲकॅडमी पत्ता : शॉप नं. ७ मेलोडी अपार्टमेंटजवळ आयएमएस स्कूल येथे अनुभवी स्टाफ पाहिजेत. बेसीक टू ॲडव्हॉन्स कोर्स चालू आहेत.**
**संपर्क : ८८८८४३३२८५**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**


### चौकशी नोटिस

प्रति,
१) **श्री विनायक जनार्दन सुरवसे,**
रा. धरमशी लाईन, मुरारजी पेठ, सोलापूर
२) **श्रीमती शारदा दत्तात्रय कदम,**
रा. मु.पो. कोंडी, ता उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
३) **श्री रामचंद्र दादाराव पाटील,**
रा. मु.पो. कोंडी, ता उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
४) **श्रीमती ललीता बाळू कदम,**
रा. मु.पो. कोंडी, ता उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
५) **श्री केशव हसानंद पमनानी,**
रा. सिधी कॉलनी, गुरुनानक चौक, सोलापूर

**विषय :- चौकशी/सुनावणी बाबत.**

**संदर्भः-मा. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सोलापूर यांचेकडील पत्रक्रमांक/न.भू./पु.प.नोंद क्र.४३५/मुरारजी पेठ टि.पी.०२/ फाप्लॉनं. ८५२१ /१/१०/७ कावि ७१२/२४ सोलापूर दि.२७/१२/२०२४**

विषयांकित आदेशाचे अनुषंगाने दिनांक. ०४/०२/२०२५ रोजी ठीक. ४.०० वाजता चौकशी करण्यात येणार आहे. सबब त्या अनुषंगाने आपण जरुर त्या पुराव्याचे कागदपत्रासह खालील नमूद ठिकाणी नेमले दिनांक व वेळेत हजर राहून आपले म्हणने मांडावे, अन्यथा आपल्या गैरहजेरीत चौकशी / सुनावणी करण्यात येवून पुढील कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**ठिकाण -**
**नगर भूमापन अधिकारी, सोलापूर कार्यालय**
**जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, सोलापूर**

**सही/-**
**(गजानन पोळ)**
**नगर भूमापन अधिकारी, सोलापूर**

### जाहीर प्रसिध्दीकरण

नगरपरिषद कार्यालय मुरुम, जि. उस्मानाबाद
जा.क्रमांक/९१३ दिनांक २७/११/२०२४

सर्व लोकास कळविण्यात येते की, श्री. बंडप्पा शिवप्पा रासुरे, गांधी चौक, मुरूम यांनी घर नं. (२२७) चे वारसा प्र. आधारे नामांतरणाकरीता अर्ज दाखल केला आहे. बांधकामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**घराची चतुःसीमा :-**

पुर्व - राज बंडगर यांची जागा, पश्चिम - सरकारी रस्ता, दक्षिण - बसवराज लामजने यांची जागा, उत्तर - नरसिंग नागोबा यांची जागा.

तरी वरीलप्रमाणे नामंतरणाबाबत ज्या कोणा हितसंबंधी व्यक्तीस जी काही तक्रार असेल ती (१५) दिवसाचे आत लेखी दाखल करावी. मुदतीनंतर कोणतीही तक्रार चालणार नाही.

**सही/-**
**मुख्याधिकारी, न.प. मुरूम**

### जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी कि. अर्ज नं.०१/२०२५
निशाण नं. ८

**बार्शी येथील मे. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात,**

१) **गोविंद बाळकृष्ण सुलाखे,**
वय - ६२ वर्षे, धंदा - व्यापार
रा. २७०९, नवी चाटे गल्ली,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **जयश्री जगदिश सावजी,**
वय - ७२ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. ए.एस-१, उज्वल फ्लॅट्स,
रहाटे कॉलनी, नागपूर, जि. नागपूर
३) **उदय बाळकृष्ण सुलाखे (मयत वारस)**
३अ) **अमीत उदय सुलाखे,**
वय - ४७ वर्षे, धंदा - व्यापार,
रा. - २७०९, नवी चाटे गल्ली,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
३ब) **विक्रम उदय सुलाखे,**
वय - ४५ वर्षे, धंदा - नोकरी,
यांचे कुलमूख्त्यारधारक अर्जदार नं. ३अ
३क) **अनुराधा उदय सुलाखे,**
वय - ६८ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. - २७०९, नवी चाटे गल्ली,
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

— **अर्जदार**

विरुध्द

**कोणी नाही** — **सामनेवाला**

ज्याअर्थी, अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज यातील अर्जदार नं. १, २ यांची बहिण व अर्जदार नं. ३अ व ३ब यांची आत्या तसेच अर्जदार नं. ३क यांची नणंद हेमलता बाळकृष्ण सुलाखे यांचे कायदेशिर वारस असल्याबाबत व मयत हेमलता बाळकृष्ण सुलाखे यांचे नावे असलेल्या बचत खात्यावरील रक्कम, मुदत ठेव खात्यावरील रक्कम व शेअर्स सर्टीफिकेट इ. बाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेकरिता या मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी, या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, वर नमुद अर्जदारांचे अर्जातील मागणी व विधाना संबंधाने जर कोणाचेही आक्षेप असतील तर हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमलेली ता. २७/०२/२०२५ रोजी पर्यंत मे. कोर्टात स्वतः अगर आपल्या विद्वीज्ञा मार्फत हजर होऊन आपले तक्रारी, हरकती लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा मुदती नंतर मे. कोर्टात पुढील हुकूम होतील.

हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिध्द केले असे.
ता. २३/०१/२०२५

**सही/-** **कनिष्ठ लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **सहाय्यक अधिक्षक**

### नावात बदल

माझे जुने नाव **तोटप्पा शिवानंद मोटगी** असे होते. ते आता बदलून **तोटप्पा शिवप्पा मोटगी** असे ओळखले जाईल. अक्कलकोट येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर प्रतिज्ञा पत्र क्र. ७०५३/२०२५ दिनांक २३/०१/२०२५


### प्लॉट व बांधलेली घरे विकणे आहे

**नदंगाव व परिसरातील तमाम प्लॉट, घर विकत घेणाऱ्यासाठी सुवर्णसंधी !!**

हार मळा नदंगाव येथील आमच्या मालकीची बांधलेली घरे व एन.ए. केलेले प्लॉट अत्यंत माफक दरात विक्री करावयाचे आहेत, ज्यांची कोणाची हे प्लॉट, घर घेण्याची इच्छा असणाऱ्यांनी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा,

**संपर्क : हिरालाल माणिकराव चिनगुंडे नदंगावकर**
**मोबाईल नंबर- ८६६८४००७१८ व ७३८५१९७९७८**


### बैंक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5

आजादी का अमृत महोत्सव

**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - 8 (1)**
**ताबा सूचना**

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी आहेत आर्थिक मालमत्ता आणि सुरक्षा व्याजाची अंमलबजावणी कायदा, 2002, आणि उप-अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचलेल्या कलम 13 चे कलम (12), मागणी सूचनेनुसार 03/01/2023 खाली नमूद केलेल्या कर्जदारांना आणि जामीनदारांना 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्याचे आवाहन सदर सूचना प्राप्त झाल्याची तारीख.

कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि जनतेला नोटीस देण्यात आली आहे. खाली स्वाक्षरी केलेल्या व्यक्तीने खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे. सुरक्षा हिताच्या नियम 8 सह वाचलेल्या अधिनियमाच्या कलम 13 च्या उप कलम (4) अंतर्गत त्याला प्रदान केलेले अधिकार 22/01/2025 रोजी अंमलबजावणी नियम, 2002

विशेषत: कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता आणि कोणत्याही गोष्टींशी व्यवहार करू नका मालमत्तेचे व्यवहार बँक ऑफ महाराष्ट्रच्या वरील रकमेच्या शुल्काच्या अधीन असतील नमूद केले आहे.

उपलब्ध वेळेच्या संदर्भात, कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष आमंत्रित केले आहे, सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा - दुधनी**<br>**कर्जदार - 1.M/s. राजशेखर शिवपुत्रप्पा कौंची प्रा. राजशेखर शिवपुत्रप्पा कौंची**<br>मु.पो. दुधनी, ता.अक्कलकोट, जि. सोलापूर.<br><br>**हमीदार-**<br>**2. श्री. बस्वराज सिद्धण्णा निंबाळ.**<br>**3. श्रीकांत शिवपुत्रप्पा कौंची**<br>दोघे **R/o,** मु.पो. दुधनी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर. | **प्राथमिक सुरक्षाः -** स्टॉक, बुक हायपोथेकेशन कर्ज, प्राप्ती (90 दिवस) पर्यंत आणि कर्जदार (वर्तमान आणि भविष्य)<br><br>**संपार्श्विक सुरक्षाः -**<br>सर्व तुकड्यांचे नोंदणीकृत अतिरिक्त गहाण आणि पार्सल 217 च्या मापाच्या मालमत्तेवर आहे. (108.50 SQM प्रत्येक) प्लॉट क्र. 6 व 7, गट क्रमांक 562/A1 आणि गट क्रमांक 562/A अनुक्रमे, बांधकाम क्षेत्र 126.51 चौ. मीटर (तळमजला) 128.85 चौरस मीटर (पहिला मजला) एकूण बांधकाम क्षेत्र 255.36 चौ. मीटर बसवेश्वर लिबर्टीजवळ, एसटी स्टँड रस्ता मु.पो. दुधनी **मालमत्तेचे मालक श्री. राजशेखर शिवपुत्रप्पा कौंची आणि श्री. श्रीकांत शिवपुत्रप्पा कौंची.**<br><br>**खालीलप्रमाणे सीमा :-** प्लॉट क्र. 6 गट क्र.562/A1<br>पूर्व - प्लॉट क्र. 5, पश्चिम - प्लॉट क्र. 7<br>दक्षिण - रस्ता, उत्तर - प्लॉट क्रमांक 2 आणि 3<br><br>**खालीलप्रमाणे सीमाः-** प्लॉट क्र. 7 गट क्र. 562/A<br>पूर्व - प्लॉट क्र. 6, पश्चिम - प्लॉट क्र. 8<br>दक्षिण - रस्ता, उत्तर - प्लॉट क्रमांक 2 आणि 3 | **मागणी सूचनाः**<br>दि. 03/01/2023<br>रु. 39,12,230.31/-<br>अधिक लागू न केलेले व्याज w.e.f 03/01/2023 पर्यंतची प्राप्ती कर्ज<br><br>**प्रत्यक्ष ताबा तारीखः**<br>22/01/2025 |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - २२/०१/२०२५**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### क्रीडामंत्र्यांच्या हस्ते भारतीय दिव्यांग क्रिकेटपटूंचा सत्कार

**नवी दिल्ली** : श्रीलंकेच्या कोलंबो येथे दिव्यांगांची चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धा २०२५ जिंकल्याबद्दल भारतीय दिव्यांग क्रिकेट संघाचा शुक्रवारी येथे केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. भारतीय दिव्यांग क्रिकेट संघाने स्पर्धेच्या अंतिम फेरीत अपवादात्मक कौशल्य दाखवत इंग्लंडला पराभूत केले. डिफरंटली एबल्ड क्रिकेट कौन्सिल ऑफ इंडिया (डीसीसीआय) आणि ॲक्सेसिबिलिटी ऑर्गनायझेशन स्वयम यांच्या पाठिंब्याने भारतीय दिव्यांग क्रिकेट संघाचा शुक्रवारी भारतीय क्रीडा प्राधिकरणात सत्कार करण्यात आला. मांडविया यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समावेशक क्रीडा सहभागाच्या दृष्टिकोनाचा हवाला देत दिव्यांग खेळाडूंना पाठिंबा देण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेवर भर दिला. दिव्यांग खेळाडूंच्या यशाबद्दल देशाला अभिमान आहे, हा विजय त्याचा पुरावा आहे, असे मांडविया म्हणाले. या कार्यक्रमाला संपूर्ण संघ, प्रशिक्षक, डीसीसीआयचे सरचिटणीस रविकांत चौहान, स्वयंमचे संस्थापक-अध्यक्ष स्मिनू जिंदाल आणि क्रीडा मंत्रालयाचे अधिकारी देखील उपस्थित होते.

### सूरमा क्लब अंतिम फेरीत दाखल

**रांची** : महिला हॉकी इंडिया लीग (एचआयएल) २०२४-२५ स्पर्धेच्या शेवटच्या गट साखळी सामन्यात शुक्रवारी येथील मरंग गोमके जयपाल सिंग मुंडा ॲस्ट्रो टर्फ हॉकी स्टेडियमवर झालेल्या सामन्यात सूरमा हॉकी क्लबने श्राची राढ बंगाल टायगर्सचा ४-२ असा पराभव केला. या विजयासह, सूरमा हॉकी क्लबने २६ जानेवारी रोजी ओडिशा वॉरियर्सविरुद्ध अंतिम सामना खेळण्याची संधी मिळवली. चार्लोट एंगलबर्टने शानदार हॅट्ट्रिक साजरी करत सामन्यावर वर्चस्व गाजवले. तिने पहिल्या, १७ व्या व ४७ व्या मिनिटाला गोल नोंदविले. हिना बानो (९) हिने सूरमासाठी गोल केला. कर्णधार वंदना कटारिया (४८) व शिल्पी दबासने शेवटच्या चरणात गोल केले परंतु त्यांना सामन्याचा निकाल बदलता आला नाही. खेळ सुरू होताच चार्लोट एंगलबर्टने वर्तुळाच्या वरच्या बाजूने एक सैल पास घेत गोलरक्षकाला हुलकावणी देत पहिला गोल केला. सूरमाने त्यानंतरच्या काही मिनिटांत सामन्यावर आपला दबाव कायम ठेवला.

### भारतीय डेव्हिस चषक टेनिस संघ सज्ज



**नवी दिल्ली** : आगामी १ आणि २ फेब्रुवारी रोजी येथे होणाऱ्या टोगोविरुद्धच्या जागतिक गट १ च्या प्ले-ऑफ डेव्हिस चषक सामन्यासाठी भारतीय संघ सज्ज झाला आहे. भारतीय संघात एस मुकुंद, श्रीराम बालाजी आणि ऋत्विक बोलीपल्ली हे पुढील काही दिवसांत संघात सहभागी होतील. रविवारी टोगो संघ येण्यापूर्वी चिराग आणि युवानसह संघाला मदत करण्यासाठी निवडलेले आर्यन शाह देखील संघात सहभागी होतील. प्रशिक्षक आशुतोष सिंग यांनी रामकुमार रामनाथन व करण सिंग यांच्यासाठी योग्य सरावाची व्यवस्था करण्याचे काम हाती घेतले आहे. चिराग दुहान व युवान नंदल यांच्या उपस्थितीमुळे खेळाडूंना आपले कौशल्य वाढवण्यात फायदा होत आहे.

# भारत विजयाची पुनरावृत्ती करण्यास उत्सुक

## मोहम्मद शमीच्या तंदुरुस्तीवर लक्ष ● इंग्लंडविरुद्ध आघाडी वाढवण्यावर भर

◆ **चेन्नई, २४ जानेवारी**

वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी याच्या तंदुरुस्तीवर लक्ष ठेवून भारतीय टी-२० संघ शनिवारी येथे पाच सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या सामन्यातील कामगिरीची पुनरावृत्ती करण्यासाठी उत्सुक असेल.

बुधवारी ईडन गार्डन्सवर अभिषेक शर्माच्या झंझावाती खेळीच्या जोरावर भारताने इंग्लंडवर ७ गड्यांनी सहज विजय मिळवत पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत १-० अशी आघाडी मिळविली आहे.

भारतीय प्रेक्षकांना मोहम्मद शमीला खेळताना पाहण्याची नक्कीच इच्छा असेल, परंतु सध्याच्या परिस्थितीनुसार अकरा खेळाडूंच्या संघात त्याचा समावेश करणे हे त्याच्या तंदुरुस्तीच्या पुढील मूल्यांकनावर अवलंबून असेल.

३४ वर्षीय शमी पहिल्या टी-२० सामन्यात खेळण्याची अपेक्षा होती व तो नेटमध्येही सक्रियपणे सहभागी होता, परंतु त्याचे पुनरागमन पुढे ढकलण्यात आले,



सराव सत्रादरम्यान सूर्यकुमार यादव व मोहम्मद शमी

कारण संघ व्यवस्थापन त्याच्या तयारीचा सखोल आढावा घेऊ इच्छित आहे.

तथापि, कोलकातामध्ये भारताला शमीची फारशी उणीव भासली नाही. येथे वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने नवीन चेंडूसह व फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्तीने प्रभावी स्पेल करत इंग्लंडला धुळीस मिळवून दिले.

ईडनच्या खेळपट्टीवर जलद व त्यांच्या हळू गोलंदाजांना पुरेशी मदत होती, परंतु येथील चिपॉल स्टेडियमवर फिरकी गोलंदाजांना अधिक मदत देऊ शकते.

खेळपट्टीचे स्वरूप काहीही असो भारतीय क्रिकेटपटू तक्रार करणार नाही. यजमान संघात वरुण, उपकर्णधार अक्षर पटेल व रवी बिश्नोईचा समावेश असलेल्या संघात गुणवत्ता व विविधता आहे.

इंग्लंडच्या दृष्टिकोनातून भारतीयांना आव्हान देण्यासाठी त्यांना अनुभवी फिरकीपटू आदिल रशीद आणि लियाम लिव्हिंगस्टोन यांच्याकडून उत्तम कामगिरीची अपेक्षा असेल.

वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चर वगळता, पहिल्या सामन्यात अभिषेक शर्मा व संजू सॅमसनच्या आक्रमक खेळीला इतर कोणताही इंग्लिश गोलंदाज रोखू शकला नाही.

गत वर्षी टी-२० मध्ये एकत्र आल्यापासून सॅमसन व अभिषेकला लक्षणीय यश मिळाले आहे. कोलकात्यात अभिषेकने जबरदस्त धावा काढत इंग्लंडला धक्का दिला.

गत सहा डावात सॅमसनने तीन शतके झळकावली आहेत व पुढच्या वर्षी घरच्या मैदानावर होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी या दोघांना पहिल्या सलामीवीर म्हणून कल्पना करणे अवास्तव ठरणार नाही.

इंग्लंडलाही त्यांच्या सलामीवीरांकडून सुरुवातीची गती मिळविण्यासाठी आक्रमक सुरुवातीची अपेक्षा असेल.

> **भारत वि. इंग्लंड**
> **दुसरा टी-२० सामना**
> **स्थळ : एम. ए. चिदम्बरम् स्टेडियम, चेन्नई**
> **वेळ : सायंकाळी ७.०० वाजतापासून**
> **थेट प्रसारण : स्टार स्पोर्ट्सवर**

कर्णधार सूर्यकुमार यादवला चमक दाखवण्याची वेळ आली आहे. गत वर्षी झालेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यानंतर मागील ११ डावांमध्ये त्याने केवळ दोन अर्धशतके झळकावली आहेत. भारत केवळ एक सामना खेळल्यामुळे संघात फार बदल होण्याची शक्यता नाही. जर शमी २०२३ च्या विश्वचषक अंतिम सामन्यानंतर आंतरराष्ट्रीयस्तरावर पुनरागमन करण्यासाठी खरोखरच तंदुरुस्त असेल तर नितीश कुमार रेड्डी त्याच्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी लागू शकते. ◂(वृत्तसंस्था)

# बुमराह, जयस्वाल, जडेजाचा आयसीसी पुरुष कसोटी संघात समावेश

◆ **दुबई, २४ जानेवारी**

शुक्रवारी भारताच्या जसप्रीत बुमराह, रवींद्र जडेजा व यशस्वी जयस्वालला आयसीसी पुरुषांच्या २०२४ च्या कसोटी संघात स्थान देण्यात आले. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी)समाज माध्यमावर ११ सदस्यीय संघाची घोषणा केली आणि ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज पॅट कमिन्सची कर्णधार म्हणून निवड केली.

जयस्वाल व इंग्लंडचा बेन डकेट सलामीवीर म्हणून संघ असून न्यूझीलंडचा माजी कर्णधार केन विल्यमसन तिसऱ्या क्रमांकावर आहे. मधल्या फळीत इंग्लंडचा जो रूट व हॅरी ब्रुक आणि श्रीलंकेचा कामिंदू मेंडिसचा संघात समावेश आहे. इंग्लंडचा जेमी स्मिथ याला यष्टिरक्षक-फलंदाज म्हणून संघात स्थान देण्यात आले आहे. गोलंदाजीमध्ये जडेजा हा वेगवान गोलंदाज बुमराह, आणि न्यूझीलंडचा मॅट हेन्री यांच्यासह एकमेव फिरकी गोलंदाज आहे.

बुमराहने २०२४ मध्ये १४.९२ च्या आश्चर्यकारक सरासरीने ७१ बळी टिपले व त्या वर्षी कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक बळी टिपणारा गोलंदाज म्हणून स्थान मिळवले. यापैकी ३२ बळी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या अलिकडच्या बॉर्डर-गावस्कर चषक मालिकेत घेतल्या. या मालिकेत भारताने १-३ असा पराभव पत्करला. दरम्यान, जडेजाने २०२४ मध्ये ५२७ धावा केल्या आणि ४८ बळी टिपले. कॅलेंडर वर्षात, जयस्वालने ५४.७४ च्या सरासरीने उल्लेखनीय १,४७८ धावा केल्या असून तो जो रूट (२०२४ मध्ये ५५.५७ च्या सरासरीने १,५५६ धावा) नंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. ◂(वृत्तसंस्था)

### आयसीसीच्या वर्षातील सर्वोत्तम एकदिवसीय संघात एकही भारतीय नाही

शुक्रवारी जाहीर झालेल्या आयसीसीच्या वर्षातील सर्वोत्तम एकदिवसीय संघाच्या यादीत एकाही भारतीय क्रिकेटपटूला स्थान मिळाले नाही. २०२४ मध्ये ५० षटकांच्या स्वरूपात भारतीय खेळाडूंची कोणतीही विशेष आंतरराष्ट्रीय कामगिरी नव्हती. श्रीलंकेचे चार खेळाडू, पाकिस्तान व अफगाणिस्तानचे प्रत्येकी तीन, वेस्ट इंडीजचा एक खेळाडू आयसीसीच्या ऑल-स्टार संघात आहे. भारताने श्रीलंकेविरुद्ध केवळ तीन एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामने खेळले, त्यापैकी दोन सामने गमावले, तर तिसरा सामना बरोबरीत सुटला.

## मंधाना, दीप्तीची आयसीसीच्या महिला वन-डे संघात निवड

◆ **दुबई, २४ जानेवारी**

दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाज लॉरा वोल्वार्डच्या नेतृत्वाखालील आयसीसी वर्षातील महिला एकदिवसीय क्रिकेट संघात भारताची स्टार फलंदाज स्मृती मंधाना आणि अष्टपैलू दीप्ती शर्मा यांची निवड झाली आहे.

२०२४ मध्ये स्मृती मंधाना अव्वल स्थानावर होती आणि तिने केवळ १३ सामन्यांमध्ये ७४७ धावा काढल्या होत्या. जानेवारीमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध २९ धावांच्या खेळीने तिच्या वर्षाची सुरुवात सौम्य झाली. तथापि, एकदिवसीय सामन्यांपासून सहा महिन्यांच्या विश्रांतीनंतर, मंधाना दक्षिण आफ्रिकेविरुद्ध जबरदस्त फॉर्ममध्ये परतली.

ऑक्टोबरमध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या डळमळीत मालिकेत तिने जबरदस्त शतक झळकावले आणि महिला एकदिवसीय सामन्यांमध्ये भारताची सर्वात जास्त शतके करणारी खेळाडू झाली तेव्हा मंधानाची सातत्य पुन्हा एकदा समोर आले. तिने ऑस्ट्रेलियाविरुद्ध आणखी एक शतक झळकावून वर्षाची सुरुवात केली आणि वेस्ट इंडीजविरुद्ध दमदार कामगिरी केली. तिचे थोडक्यात शतक हुकले पण दोन अर्धशतके झळकावली. दीप्ती शर्मा ही भारताची सर्वोत्तम गोलंदाज असून तिने १३ सामन्यांमध्ये २४ बळी घेतले आणि १८६ धावांचे योगदान दिले. डिसेंबरमध्ये वेस्ट इंडीजविरुद्धची तिची ३१ धावांत ६ बळी ही वर्षातील सर्वोत्तम कामगिरी ठरली.

# राजस्थानविरुद्ध विदर्भ १६ धावांनी पिछाडीवर

**रणजी करंडक क्रिकेट**

### हर्ष दुबेचे ५ बळी

◆ **जयपूर, २४ जानेवारी**

येथे सुरू असलेल्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेतील एलिट ब गटाच्या साखळी सामन्यात दुसऱ्या दिवशी विदर्भाच्या १६५ धावांच्या प्रत्युत्तरात राजस्थानने ८७.४ षटकांत सर्वबाद २६५ धावा उभारल्या आणि पहिल्या डावात १०० धावांची आघाडी मिळविली. दिवस अखेरपर्यंत विदर्भाने पिछाडी भरून काढत दुसऱ्या डावात ३२ षकांत ४ बाद ८४ धावा काढल्या. विदर्भ आता केवळ १६ धावांनी पिछाडीवर आहे. विदर्भाच्या डावखुरा फिरकी गोलंदाज हर्ष दुबेने ८१ धावांत ५ बळी टिपण्याची किमया केली.

राजस्थानने ५ बाद १०१ धावांवरून आपल्या पहिल्या डावास सुरुवात केल्यानंतर त्यांनी १६४ धावांची भर घेतली व पहिल्या डावांत सर्वबाद २६५ धावांची नोंद केली. कालचे नाबादवीर कर्णधार महिपाल लोमरोर व समर्पित जोशीने विदर्भाच्या गोलंदाजांचा खंबीरपणे सामना करत आपल्या संघाची धावसंख्या वाढविली. या दोघांनी सहाव्या गड्यासाठी ८९ धावांची भागीदारी केली. विदर्भाच्या हर्ष दुबेने महिपाल लोमरोरची घोडदौड थांबविली. महिपालने १३३ चेंडूंत ११ चौकारांसह ७२ धावांचे योगदान दिले. पुढे समर्पित जोशी वैयक्तिक शतकाकडे वाटचाल करत असतानाच हर्ष दुबेने त्याला वाठकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. समर्पित जोशीने १३८ चेंडूंत ८ चौकार व २ षट्कारांसह ७८ धावा नोंदवल्या. झुबेर अलीने २८ धावांची भर घातली.



विदर्भाकडून हर्ष दुबेने ८१ धावांत ५ बळी टिपण्याची किमया केली. नचिकेत भुते व शुभम कापसेने प्रत्येकी २ बळी टिपले. आदित्य ठाकरेने एक बळी टिपला.

विदर्भाकडून सलामीवीर ध्रुव शोरीने संघाची पिछाडी भरून काढण्याचा चांगला प्रयत्न केला, परंतु त्याचा जोडीदार सिद्धेश वाठ भोपळा न फोडताच तंबूत परतला. ध्रुव शोरीने अमन मोखाडे (१९), करण नायर (४) व यश राठोडच्या साथीने संघाला ८१ धावांचा टप्पा गाठून दिला असताना सुतारने त्याला पायचित केले.

दिवस अखेर विदर्भाने ३२ षटकांत ४ बाद ८४ धावा केल्या. खेळ थांबला तेव्हा यश राठोड नाबाद १६ व आदित्य ठाकरे शून्यावर खेळत होते. ◂(वृत्तसंस्था)

# श्रेया परदेशी, श्रीगणेश उडता, वैभव रणदिवे यांना जिल्हा क्रीडा पुरस्कार जाहीर

## उद्या पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्या हस्ते वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २४ जानेवारी-**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणारे जिल्हा क्रीडा पुरस्कार राष्ट्रीय खेळाडू श्रेया परदेशी (धर्नुविद्या), श्रीगणेश उडता (डायव्हिंग) व दिव्यांग खेळाडू वैभव रणदिवे (नेमबाजी) यांना जाहीर झाला आहे. जिल्ह्यातील २०२३-२४ या वर्षातील क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना हे पुरस्कार जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांनी जाहीर केले. प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व रोख बक्षिस रू.१० हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. रविवारी २६ जानेवारी रोजी पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्या हस्ते ध्वजारोहनाच्या कार्यक्रमामध्ये हे पुरस्कार देण्यात येतील.




**दिव्यांग खेळाडू : वैभवराज बापू रणदिवे**



(शिक्षण १२ वी) वैभवराज याने १० मीटर एअर पिस्टल शूटिंग (नेमबाजी) दुसऱ्या झोनल पॅराशुटींग चॅम्पियनशिप मध्ये जुनियर गटात सुवर्ण प्राप्त. तिसऱ्या नॅशनल पॅराशुटींग चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये ज्युनियर गटामध्ये सिल्वर मेडल. इंटरनॅशनल शूटींग चॅम्पियनशिप ऑफ होनोहर (जर्मनी) या स्पर्धेत सीनियर गटात सहभाग व पहिल्या पॅरा खेलो इंडिया शूटींग स्पर्धेत ब्राँझ.



**श्रेया मुकूंद परदेशी**

(शिक्षण बी.ए.) : श्रेया हिने धर्नुविद्या या खेळात सन २०१८ ते २०२२ राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्राविण्य प्राप्त तसेच राज्य शालेय क्रीडा स्पर्धेत २०१८ ते २०२३ महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व करून अनेक पदके प्राप्त.

**श्रीगणेश प्रशांत उडता**



(शिक्षण १२ वी) : श्रीगणेश याने २०२३ साली राज्यस्तरीय शालेय डायव्हिंग क्रीडा स्पर्धेत ०१ मीटर ०३ मीटर व हायबोर्ड डायव्हिंग या खेळ प्रकारात उत्कृष्ट कामगिरी. २०२४ राज्य व राष्ट्रीय स्तरावर सहभागी.

### एसव्हीसीएसमध्ये क्रीडा सप्ताह

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

एस. व्ही. सी. एस. हायस्कूल होटगी येथे क्रीडा सप्ताह उत्साहात झाला. ष.ब्र. वीरतपस्वी श्री. चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व ष.ब्र. तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन बृहन्मठ होटगी संस्थेचे संचालक शशिकांत रामपुरे यांनी केले. यावेळी अल्ट्राटेक सिमेंटचे व्यवस्थापक एम. के. बाळगी, शालेय समितीचे सदस्य भीमाशंकर पाटील, रेवणसिद्ध पटणे, हिपळेच्या सरपंच माया पाटील, प्राचार्य नंदकुमार धाये, पर्यवेक्षक श्रीशैल व्हनमाने, तंत्र विभाग प्रमुख केदार गंगदे यांच्या हस्ते करण्यात आले. गीत मंचच्या विद्यार्थ्यांनीनी स्वागत गीत सादर केले. क्रीडा मशाल प्रज्वलित करून क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी कबड्डी, खो-खो व हॉलीबॉल या चुरशीच्या सामन्याचा आनंद घेतला. या कार्यक्रमासाठी क्रीडा शिक्षिका शोभाराणी कुंभार, अमसिध्द गुणके यांचे सहकार्य लाभले.

# महावितरण, पश्चिम रेल्वे व महाराष्ट्र पोष्टाची विजयी घोडदौड

### विद्यार्थी क्रीडा केंद्र आयोजित व्यावसायिक खो-खो स्पर्धा

**मुंबई, दि. २४ जानेवारी-**

विद्यार्थी क्रीडा केंद्र आयोजित व्यावसायिक पुरुष व महिला खो-खो स्पर्धेत महावितरण, पश्चिम रेल्वे व महाराष्ट्र पोष्टाने विजयी घोडदौड केली आहे.

मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने विद्यार्थी क्रीडा केंद्र आयोजित किशोर गट (४ फुट ११ इंच) व व्यावसायिक पुरुष - महिला गटाच्या खो-खो स्पर्धा लाल मैदान परळ येथे आज काही अत्यंत चुरशीचे आणि रोमांचक सामने खेळले गेले. ही स्पर्धा २६ जानेवारी पर्यंत चालणार आहे.

व्यावसायिक महिला गटाच्या पहिल्या सामन्यात रचना नोटरी वर्क्सने महाराष्ट्र पोष्टाचा (मध्यंतर ५-४) ९-८ असा १:५० मिनिटे राखून १ गुणाने पराभव केला. रचना तर्फे सेजल यादवने २:३०, ३:५० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात १ खेळाडू बाद केला. पूजा फरगडेने २:४०, २:५० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात १ खेळाडू बाद केला. काजल शेखने नाबाद १:५० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात १ खेळाडू बाद केला. तर पराभूत महाराष्ट्र पोष्टातर्फे किशोरी मोकाशीने ३:१०, ४:४० मिनिटे संरक्षण केले.



खुशबू सुतारने १:३०, २:०० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात २ खेळाडू बाद केले.दुसऱ्या सामन्यात महावितरण कंपनीने मुंबई पोलीसचा मोठा पराभव केला. या सामन्यात मध्यंतराला ९-३ अशी सहा गुणांची आघाडी महावितरणने घेतल्याने मुंबई पोलिसांना डावाने पराभव स्वीकारावा लागला. दुसऱ्या डावात मुंबई पोलिसांनी महावितरणचे ५ खेळाडू बाद करण्यात यश मिळवले. व हा सामना महावितरणने एक डाव राखून ९-८ असा सहज जिंकला. व्यावसायिक पुरुष गटाच्या पहिल्या सामन्यात पश्चिम रेल्वेने मुंबई पोलीसाचा (मध्यंतर ११-५) ११-९ असा १ डाव २ गुणांनी पराभव केला. पश्चिम रेल्वेतर्फे दिपक माधवने २, नाबाद १:३० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात १ गडी बाद केला. निखिल सोडयेने २:१०, २ मिनिटे संरक्षण केले. अमित पाटीलने १:१० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात २ गडी बाद केले. पराभूत मुंबई पोलीसतर्फे सोहेल कलावंतने १:१० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात २ गडी बाद केले तर अक्षय हजारे व लोकेश भडवलकरने प्रत्येकी २ गडी बाद केले. दुसऱ्या सामन्यात महाराष्ट्र पोष्टाने महावितरण कंपनीचा (मध्यंतर १३-४) १३-११ असा १ डाव व २ गुणांनी पराभव केला. महाराष्ट्र पोष्टातर्फे लक्ष्मण गवसने नाबाद १:३० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात २ गडी बाद केले. शुभम शिगवण व शुभम शिंदेने प्रत्येकी २ मिनिटे संरक्षण केले. तर पराभूत महावितरणतर्फे चेतन बडदेने आक्रमणात २ गडी बाद केले.

### किशोर गटाचा थरार

४ फुट ११ इंच किशोर गटाच्या सामन्यात ओम साईश्वर सेवा मंडळाने सरस्वती मंदिराचा (मध्यंतर ११-२) ११-५ असा १ डाव व ६ गुणांनी धुवा उडवला. ओम साईश्वरतर्फे अधिराज गुरवने नाबाद १ मिनिटे संरक्षण करून आक्रमणात ६ गडी बाद केले. आरव साटमने ३:२० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात १ गडी बाद केला. अर्णव राणेने २:४० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात १ गडी बाद केला. पराभूत सरस्वती तर्फे पार्थ केळकरने १:५० मिनिटे संरक्षण करून आक्रमणात १ गडी बाद केला. आदित्य सोनारने १:१० मिनिटे संरक्षण केले.



# धावपटू साईश्वर व श्रद्धा गुंटूक यांचे १४२ किमी रनिंग व सायकलिंग

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

चॅम्पीयन फिटनेस स्पोर्ट्सच्या वतीने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या एक दिवसीय अल्ट्रा सायकलिंग व अल्ट्रा रनिंग स्पर्धेत साईश्वर व श्रद्धा केशव गुंटूक बंधू भगिनीने सहभाग घेत १०० किमी अंतर सायकलिंग व ४२ किमी अंतर रनिंग कमी वेळात पूर्ण केले.

जुळे सोलापुरातील स्वामी विवेकानंद प्रशालेत इयत्ता नववीत शिकणारा साईश्वर व श्रद्धा एक दौड देश के नाम अंतर्गत राष्ट्रीय पातळीवरील रनिंग स्पर्धेत साईश्वर ४२ किमी अंतर ३ तास ८ मिनिटे ११ सेकंदात हातात तिरंगा घेऊन पूर्ण केले तर श्रद्धा हिने सायकलिंग स्पर्धेत सायकलला तिरंगा लावून १०० किमी अंतर ५ तास ३८ मिनिटे ४२ सेकंदात पूर्ण केली आहे. ही स्पर्धा पहाटे ३ वाजून ४ मिनिटांनी जुळे सोलापुरातील भंडारी ग्राउंड येथून सुरुवात करून सीना नदी, सीना नदी ते भंडारी ग्राउंड व पुन्हा भंडारी ग्राउंड तेथे यु टर्न घेत एसआरपीएफ सोरेगाव येथे ८ वाजून ४२ मिनिटे ४२ सेकंदाने सांगता करण्यात आली. साईश्वर व श्रद्धा यांना सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह, स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य चिदानंद माळी, क्रीडा प्रशिक्षक कृष्णा कोळी यांचे मार्गदर्शन लाभले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### भारूड सम्राट अनिल केगांर यांनी भारुडातून दिले समाज प्रबोधनाचे धडे

**करमाळा, दि. २४ जानेवारी-**

करमाळा येथील विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजनास्तर व ग्रामपंचायत उंदरगाव याच्या संयुक्त विद्यमाने अनिल केंगार यांच्या भारुडांचे आयोजन करण्यात आले होते. भारुडाच्या माध्यमातून जनजागृती करत असताना संतश्रेष्ठ एकनाथ महाराजांचे भारुड दादला नको ग बाई मला नवरा नको ग बाई, भूत जबर मोठे गं बाई, झडपण करू गत काई. तसेच संत सेना महाराजांचे भारूड आम्ही वारिका वारिका करू हजामत बारीक तसेच जगद्गुरु संत तुकोबारायांचे लेक लाडकी लाडकी लेक मी संतांची इत्यादी भारुडाच्या माध्यमातून अनिल केंगार यांनी पर्यावरण रक्षण, स्वच्छता अभियान, तंटामुक्त गाव, लेक वाचवा देश वाचवा, व्यसन मुक्त युवाशक्ती, मराठी भाषा गौरव, नवीन शैक्षणिक धोरण मोबाईल फोनचे फायदे तोटे इत्यादी सामाजिक विषयांवरती भारूडातून समाज प्रबोधन केले. केंगार भारूड सम्राट यांनी प्रबोधन करताना एन. एस.एसचे स्वयंसेवक रितेश उघडे अनिकेत भालेराव, रोहम परदेशी यांनी भारुडात सहभागी घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबूराव कोकरे उपस्थित होते. सरपंच युवराज मगर, उपसरपंच शिवाजी कोकरे, रघुनाथ पाटील, बावान जावळे,बिभिषण गरडे, हनुमंत कांबळे, पाडूरंग ताकमागे, नवनाथ मरे, प्रा.लक्ष्मण राख, प्रा.राहुल श्रीरामे, प्रा. संजय पाटील, प्रा.सुजाता भोरे, प्रा. धिंदळे मनोहर, प्रा.गजेंद्र रोकडे उपस्थित होते



### मोडनिंब येथील शिबिरात ५८ जणांचे रक्तदान

**मोडनिंब, दि.२४ जानेवारी-**

मोडनिंब (ता.माढा) येथील बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त युवासेना मोडनिंब यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ५८ दात्यांनी सहभाग नोंदविला. शिबिराचे आयोजन ग्रामपंचायत कार्यालयात करण्यात आले. प्रत्येक रक्तदात्यास प्रमाणपत्र देण्यात आले.यावेळी सचिन बागल,मधुकर देशमुख, राजाभाऊ गायकवाड, किशोर देशमुख, मनसेचे प्रशांत गिड्डे, ग्रा. प. सदस्य बालाजी पाटील, कुरण गिड्डे, कैलास तोडकरी, नितीन गडधरे, दिपक सुर्वे, संदेश तोडकरी, शंभू फुगे, दत्ता जडकर, उदय जाधव, गणेश कुंभार, विजय पवार, मारती वाघ, प्रकाश कोळी, युवा नेते ऋत्विक तोडकरी, सुनील साळुंखे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवासनेचे तालुका उपप्रमुख दादा शितोळे, शहर प्रमुख संभाजी तोडकरी, नितीन घमे यांनी परिश्रम घेतले.



### स्व. बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी

**अक्कलकोट, दि. २४ जानेवारी**

हिंदू हदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त व स्नेहल मयुर मेत्रेसकर यांच्या वतीने स्वामी समर्थ समाधी मठ येथे भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आला. याप्रसंगी शिवसेना जिल्हा उपाध्यक्ष सुनील कटारे माजी तालुकाप्रमुख मनोज पवार अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष अयाज जमादार, युवा सेना शहर प्रमुख अजय राठोड, शिवसेना शहर उपप्रमुख गंगाराम धोत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत भाविकांना प्रसाद वाटपाचा कार्यक्रम पार पडला.

## निधन वृत्त

### पांडुरंग पवार



**सांगोला, दि.२४ जानेवारी-**

सांगोला शहरातील पवार वस्ती येथील रहिवासी पांडुरंग सुभ्राव पवार (वय-७०) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार, दि. २४ जानेवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### दत्तात्रय नवले



**सोलापूर, दि.२४ जानेवारी-**

माजी सैनिक दत्तात्रय रामचंद्र नवले (वय ७३, रा. गोलेगाव , ता. शिरूर, जि. पुणे) यांचे गुरुवारी (ता. २३) रोजी दुपारी १२.३० वाजता पुण्यातील रुग्णालयात अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी नायब सुभेदार म्हणून चार मराठा बटालियन मध्ये २४ वर्षे सेवा केली. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर गोलेगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. केगावा येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांचे ते वडील होत.

### गौरीशंकर गुल्लापल्ली



**सोलापूर, दि.२४ जानेवारी-**

जुना कुमठा नाका परिसरातील वेणुगोपालनगर येथील रहिवासी गौरीशंकर व्यंकटनरसू गुल्लापल्ली (वय ७१) यांचे बुधवार २२ जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ, सून व नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर अक्कलकोट रोडवरील पद्मशाली शांतीधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# निरा देवघरचे पाणी २२ गावांना मिळणार

**माजी आमदार राम सातपुते; माळशिरस तालुक्याचे एमआयडीसीचे स्वप्न लवकरच पूर्ण होणार**

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २४ जानेवारी-**

गेल्या अनेक वर्षांपासून माळशिरस तालुक्यातील एम आयडीसीचे स्वप्न अपूर्ण असून तालुक्यातील तरुणांना तालुक्यातच रोजगार उपलब्ध व्हावा, त्यांना रोजगारासाठी शहराच्या ठिकाणी जाऊ लागू नये यासाठी माळशिरस तालुक्यात लवकरच अद्यावत एमआयडीसी उभी राहणार असून या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उद्योगमंत्री ना. उदय सावंत यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली असून लवकरच माळशिरस तालुक्यात एमआयडीसी होणार आहे तर निरा उजव्या कालव्यापासून वंचित असलेल्या तालुक्यातील २२ गावांना निरादेवघरचे पाणी लवकरच उपलब्ध होणार असल्याची माहिती माळशिरसचे मा आ राम सातपुते यांनी पत्रकारांना दिली.

> माजी आमदार राम सातपुते हे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय मानले जातात ते आमदार असताना त्यांनी हे प्रश्न सभागृहात तत्कालीन मंत्री महोदयांकडे लावून धरले होते पत्रव्यवहार केला होता त्यास सध्या मूर्त स्वरूप मिळाले असून लवकरच माळशिरस तालुक्यात अद्यावत एमआयडीसी व नीरा देवघर चे २२ गावांना पाणी उपलब्ध होत असल्याने शेतकऱ्यांसह तरुणांमधून समाधान व्यक्त केले जात आहे आमदार असताना राम सातपुते यांनी केलेल्या कामाची ही पोहचपावती असल्याचे बोलले जात आहे.



तालुक्यात एमआयडीसी व्हावी यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू होते पण या प्रयत्नांना आज अखेर मुर्त स्वरूप मिळत असून माळशिरस तालुक्यात एम आयडीसी व्हावी यासाठी दोन ते तीन ठिकाणच्या जागेची पाहणी झाली असून या जागेवर जर एम आयडीसी होत असल्याने अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह होणार असून तरुणांच्या हाताला काम मिळणार आहे याचबरोबर परिसरातील तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतीमालालाही चांगला बाजारभाव मिळणार आहे तालुक्याच्या विकासात भर पडणार आहे याचबरोबर गेले अनेक वर्ष प्रलंबित असलेल्या निरादेवघरच्या पाण्याचा प्रश्नही सुटला असून येत्या दोन वर्षात हे पाणी तालुक्यातील २२ गावांना मिळणार आहे अशी माहिती दिली



# भंडारा उधळून पालकमंत्री गोरेंचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २४ जानेवारी-**

राज्याचे ग्रामविकासमंत्री व सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे धनगर समाजाच्या वतीने पारंपारिक गजीढोल वाजवून तसेच पवित्र भंडाऱ्यांची उधळण करुन स्वागत करण्यात आले.

पालकमंत्री गोरे सोलापूर दौऱ्यावर येणार म्हटल्यानंतर काही समाज संघटनेच्या वतीने गोरे यांना समाजाच्या प्रलंबित मागण्या आणि समाजाच्या काही प्रश्नाची आठवण करुन देवून आवाहन देण्यात आले होते. त्या पार्श्वभूमीवर धनगर समाजाच्या वतीने मंत्री गोरे यांचे जंगी स्वागत करण्यात आले. तसेच समाजाचे पाठबळ कायम मंत्री गोरे यांच्या पाठिशी राहिल, असे अश्वासन देण्यात आले. पारंपारिक घोंगडी आणि काठी देवून त्यांचा समाज बांधवांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी अमोल कारंडे, माऊली हळवणकर, प्रकाश घोडके, महेश गुंडे, बबलू गुंडे, यतीराज होनमाने, आप्पासाहेब देशमुख, नागेश वाघमोडे, अभिजित देवकाते, आप्पा पुजारी उपस्थित होते.

# लोकसाहित्य हा भारताच्या प्राचीन संस्कृतीचा गाभा

**ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांचे प्रतिपादन; यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२४ जानेवारी-**

लोकसाहित्य हा भारताच्या प्राचीन संस्कृतीचा गाभा असून, जुनी शिल्पं, शिलालेख, लोकगीते जतन करणे काळाची गरज आहे. असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांनी केले.

ज्येष्ठ नागरिक संघ धनकवडी व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बहिशाल शिक्षण मंडळाच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी लोकाकलेतून लोकशिक्षण या विषयावर श्री यादव बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष बाजीराव गायकवाड, कवी जगदीप वनाशिव, सोमनाथ नाईक, भालचंद्र निखळ, बबन मांढरे, रामचंद्र चव्हाण, शकुंतला झगडे, सुनिता वाघमारे, प्रमोद पाटील श्री अकोलकर, श्री मधुकर नवले, आदी उपस्थित होते.



यादव म्हणाले, पूर्वीच्या काळी दशावतार, कीर्तन, भजन, गोंधळ, लावणी, तमाशा, वासुदेव, बहुरूपी, शाहिरी या माध्यमातून समाजाचे प्रबोधन आणि मनोरंजन व्हायचे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आंदोलनात, कवी, शाहीर यांचा मोठा सहभाग होता. लावणी, तमाशा, वासुदेव, यांनी लोकाकालेतून लोकजागृती केली.''

लोकदेव श्रीखंडोबा आणि लोकदेव विठोबा ही महाराष्ट्राची संस्कृती आणि वारसा जतन करणारी ऊर्जा केंद्र आहेत असे सांगून श्री यादव यांनी लोककलेचा ठेवा भाषणातून उलगडून रसिकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी वनशिव यांनी कविता सादर केली. प्रास्ताविक बाजीराव गायकवाड यांनी केले. सूत्रसंचलन शकुंतला झगडे यांनी केले.



### महाराष्ट्र विद्यालयाला राज्यस्तरीय कृतिशील शाळा पुरस्कार

**बार्शी, दि.२४ जानेवारी-**

महाराष्ट्र विद्यालय बार्शी या शाळेला कृतिशील शाळा पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. पुरस्कार स्वीकारताना उपमुख्याध्यापक आर.बी.सपताळे, के.जी.मदने, सुहास वाघमारे, महेश माने, मनोज मिरगणे, विजय अनभुले उपस्थित होते. राज्यातील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या गुणवंत शिक्षक आणि शाळांना महात्मा फुले, सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय पुरस्कार युवराज छत्रपती संभाजी महाराज यांच्या हस्ते पुण्यातील एस.एम.जोशी सभागृहात देण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत, पुणे विभाग शिक्षण निरीक्षक रावसाहेब मिरगणे, अध्यक्ष डॉ.श्रीमंत कोकाटे, आय. आर.एस. विपुल वाघमारे उपस्थित होते. पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी.वाय.यादव, उपाध्यक्ष एन.एन.जगदाळे, संस्थेचे सचिव तथा शाळा समितीचे अध्यक्ष पी.टी.पाटील, सहसचिव तथा शाळा समितीचे सदस्य ए.पी. देबडवार, संस्थेचे खजिनदार तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ. मिरा यादव, एस.बी. शेळवणे, प्राचार्या के.डी. धावणे, पर्यवेक्षक एस.सी.महामुनी, पर्यवेक्षिका एन.बी. साठे यांनी अभिनंदन केले.

# सोलापूरला स्वातंत्र्य लढ्याचा रोमांचक इतिहास

**डॉ. श्रीकांत येळेगावकर यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी -**

सोलापुरातील हुतात्म्यांनी अपूर्व आहुती देऊन स्वातंत्र्य लढ्याचा जाज्वल्य इतिहास जोपासला आहे. मातृभूमीच्या स्वातंत्र्यास्तव समरांगणी पडलेल्या हुतात्म्यांना हृदयफुले अर्पून डॉ श्रीकांत येळेगावकर यांनी इतिहासातील ते प्रसंग पुन्हा जिवंत केले.





रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ आयोजित ''भारतीय स्वातंत्र्यात सोलापूरचे योगदान '' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी रोटरी नॉर्थ चे अध्यक्षा डॉ. जान्हवी माखिजा या होत्या. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. तशीच स्फूर्तिदायक, प्रेरक माहिती सोलापूरचे योगदान या विषयी डॉ. येळेगावकर यांनी माहिती दिली.

महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचंद्र बोस आदी महान क्रांतिकारकांच्या विचारांनी भारावून सोलापुरातील युवकांनी शौर्य, धैर्य आणि पराक्रमाची बाजी लावली. गुलामीचे पारतंत्र्य झिडकारून ते स्वातंत्र्याचा सूर्य झेलण्या फासावर चढले. भारतीय स्वातंत्र्यापूर्वी सोलापूरकरानी लढून मिळवलेल्या स्वातंत्र्याचा रोमांचक लढा त्यांनी नवीन पिढी समोर उलगडून ठेवला. गांधी टोपी लढ्याचे प्रेरणा स्थान होते.

ब्रिटिश सैनिकांनी देशभक्त तुळशीदास जाधव यांच्या डोक्यावरील टोपी पायदळी तुडवली. या आंदोलनात सोलापूरच्या चार हुतात्म्यांना फासावर लटकवले गेले. त्यांनी सांगितलेला सोलापूरच्या क्रांतीचा इतिहास आजही रोमांच उभा करणारा होता.

उपस्थितांचे स्वागत डॉ. जानवी माखिजा यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख मधुरा वडापुरकर यांनी करून दिली. तर आभार सुनील दावडा यांनी मानले.या कार्यक्रमास स्वप्नील कोंडगुळे, बळीराम पावडे, संपत बलदवा, संतोष भंडारी, दीपक आर्वे, दिलीप गायकवाड, संजय चौगुले, आसावरी सराफ, क्षितिजा गाताडे, डॉक्टर बाळासाहेब शितोळे, सौ. शितोळे, अग्रवाल, दीपक आहुजा उपस्थित होते.





### भारत हायस्कूलमध्ये २५ वर्षांपूर्वीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

करमाळा, दि.२४ जानेवारी-

जेऊर तालुका करमाळा येथील भारत हायस्कूलमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी पंचवीस वर्षांनंतर एकत्र येऊन साजरा केला स्नेह मिळाला. वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या या वर्ग मित्रांनी पंचवीस वर्षांनंतर आपल्याला लहानपणीच्या आठवणींना उजाळा देण्याचे काम केले आहेभारत हायस्कूल जेऊर येथील २०००-२००१ च्या बॅचने २५ वर्षानंतर प्रथमच सर्व विद्यार्थ्यांनी नियोजन करून आपल्या जुन्या शाळेत एकत्र येण्याचे ठरवले एकमेकांचे नंबर घेतले गेले एकमेकांना आवर्जून फोन करून वेळ काढण्याचे ठरले एक महिन्यापूर्वीपासून तयारी सुरू होती अखेर तो दिवस आला आणि सर्वजण ठरल्याप्रमाणे आपल्या जुन्या शाळेत एकत्र जमले ज्या आदर्श शिक्षकाने भारत शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातून शिक्षणाचा महायज्ञ आरंभ केला अशा आदर्श शिक्षक व संस्थापक स्वमुना कदम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. संदीप इवरे यांनी केले. आभार वैभव पाथ्रुडकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आनंद संचेती, अजिनाथ माने, सचिन हजारे यांनी परिश्रम घेतले.

### एमएसएटी परीक्षेत सानवी देशपांडेचे यश

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २४ जानेवारी**

डॉ होमी भाभा फाऊंडेशन मुंबई मार्फत घेण्यात आलेल्या चडढ परीक्षेमध्ये सुलाखे हॉयस्कूलमधील इयत्ता ८ वी क मधील विद्यार्थीनी सानवी प्रशांत देशपाडे हिने राज्यात व्दितीय क्रमांक प्राप्त केलेला आहे.





तिला शिष्यवृत्ती, ISRO भेट, नवनीत व अन्य प्रायोजकांकडून भेटवस्तू , ट्रॉफी व प्रमाणपत्रे मिळणार आहेत. तिला विज्ञान शिक्षक संतोष तोडकरी यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल तिचे व तिच्या पालकांचे बार्शी ऐज्यूकेशन सोसायटीचे अध्यक्ष आनंद सुलाखे, सचिव अनंत कवठाळे, प्राचार्य स्वामीराव हिरोळीकर, उपप्राचार्य रामकृष्ण इंगळे, पर्यवेक्षक, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमार्फत अभिनंदन करण्यात आले.

# सार्वजनिक टॉयलेट बसवण्याचे काम सुरू

**कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी घेतली दखल**

**अशोक कामटे संघटनेच्या पाठपुराव्याला यश**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२४ जानेवारी-**

> शहीद अशोक कामटे संघटनेने शहरामध्ये मागणी केल्याप्रमाणे आवश्यक ठिकाणी स्त्री व पुरुषांकरिता स्वतंत्र टॉयलेट बसवण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय दूर होणार आहे.
> **- डॉ. सुधीर गवळी, मुख्याधिकारी, सांगोले नगरपरिषद**

महात्मा फुले चौक ते जुने एसबीआय बँकेपर्यंत सार्वजनिक मुतारी व शौचालयाची सुविधा नगरपालिकेने करावी, अशी मागणी करत याबाबतचे निवेदन सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने सांगोला नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांना देण्यात आले होते. कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी कामटे संघटनेच्या निवेदनाची दखल घेऊन पूर्तता केल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. तसेच सदर मागणीची दखल घेतल्याबद्दल कामटे संघटनेने प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहेत.



तालुक्यातून व इतर भागातून अनेक नागरिक सांगोल्यात कामाकरिता सातत्याने दैनंदिन येत असतात. त्यामध्ये महिला वर्गांचा मोठी संख्या आहे. त्याचबरोबर पुरुषही तेवढ्याच प्रमाणात आवक-जावक करतात. शहरामध्ये तीन ते चारच पुरुषांकरिता सुस्थितीत सार्वजनिक मुतारींची सोय होती. त्यामुळे नागरिकांना खुल्या जागेचा आसरा घ्यावा लागत आहे. महिला वर्ग लाजून हा प्रश्न कुठेही बोलत, वाच्यता करत नसल्याने लघुशंकेची समस्या निर्माण झालेली होती. याची दखल घेत नगरपालिकेने तात्काळ स्टेशन रोड परिसरात, सांगोला शहरात महत्वाच्या व आवश्यक ठिकाणी महिला व पुरुषांकरिता स्वच्छतागृह उभारण्याचे, बसवण्याचे काम सुरू केले आहे.



### रक्ताची एक पिशवी तिघांना जीवदान देऊ शकते : डॉ. जामदार

**सदाशिवनगर, दि.२४ जानेवारी-**

केमिस्ट हृदय सम्राट माननीय जगन्नाथ शिंदे यांच्या अमृत महोत्सवनिमित्त माळशिरस शहर मेडिकल असोसिएशनतर्फे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन माळशिरस ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मुकुंद जामदार यांच्या हस्ते धन्वंतरीचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आले. संपूर्ण भारतात जगन्नाथ शिंदे यांच्या अमृत महोत्सव निमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आलेले होते. माळशिरसमधून ३२ केमिस्ट बांधवांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबिरासाठी नातेपुतेचे ज्ञानदीप ब्लड बँकेचे सहकार्य लाभले. यावेळी मास्टर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर मुकुंद जामदार, अभय साठे उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### मनोरमाच्यावतीने हळदी कुंकू कार्यक्रम

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

मनोरमा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. सोलापूर अर्थात मनोरमा परिवाराच्या वतीने हळदी कुंकवाचा कार्यक्रम जिल्ह्यातील विविध शाखेमध्ये आयोजित करण्यात आला. बार्शी शाखेतील सर्व महिला सभासद खातेदार व मान्यवरांच्या उपस्थितीत तिळगुळ समारंभ व हळदी कुंकवाचा कार्यक्रम घेण्यात आला. यासाठी प्रमुख व्याख्याता म्हणून बार्शी येथील प्रसिद्ध गायनाकॉलॉजिस्ट डॉ. गौरी गायकवाड यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. संस्कृती व महिला आरोग्य या विषयावर त्यांनी महिलांशी संवाद साधला. रणरागिनी महिला संस्थेच्या अध्यक्ष भोसले, तलाठी भोसले उपस्थित होते. समारंभाचे अध्यक्षस्थान मनोरमा मल्टिस्टेटच्या चेअरमन शोभा मोरे यांनी भूषवले. याप्रसंगी मनोरमा मल्टिस्टेटच्या सीईओ कविता कुलकर्णी, विद्या भगरे, सुनिल भगत, मनोज खंडागळे, अक्षय भोसले, चंद्रकांत माळी, पूजा जाधव यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन मृणाल मोरे यांनी केले



### जिजामाता शाळेत रथसप्तमी उत्सवात

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे सोलापूर संचलित जिजामाता प्राथमिक शाळा तुळशीदास नगर कोंडी येथे रथसप्तमी उत्सव निमित्त हळदी-कुंकू, तिळगुळ-वाण वाटप व विद्यार्थी बक्षिस वितरण समारंभ आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अश्विनी किणीकर, रुपाली कोरे उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी बालवर्ग प्रमुख सुरेखा नान्नजकर होत्या. यावेळी मुख्याध्यापक चंद्रकांत कुंटेलूसर व प्रमुख अतिथींचे भाषणे झाली. विविध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. या उपक्रमाचे माजी आमदार निर्मला ठोकळ, अध्यक्ष सचिन ठोकळ, उपाध्यक्ष ॲड. बिपिन ठोकळ, सचिवा शिल्पा ठोकळ यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्ञानेश्वर कदम, वनमाला ग्राम, राजश्री ढवण, अपर्णा चव्हाण, शुभांगी पाटील, विजयकुमार राजापुरे यांनी परिश्रम घेतले.



### ठोकळ प्रशालेत हळदी कुंकू कार्यक्रम

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय येथे माता-भगिनी पालकांसाठी तिळगुळ वाटप व हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात झाला. अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका शिल्पा सचिन ठोकळ तर उद्घाटक म्हणून माजी महापौर सुशीला आबुटे, पोलीस उपनिरीक्षक वळसंग पोलीस ठाणे म्हाळप्पा भूताली सुरवसे, जि.प. शिक्षणाधिकारी (योजना) सुलभा वटारे, माजी नगरसेवक पुनम बनसोडे, गुरुशांत धुत्तरगावकर उपस्थित होते. यावेळी पालकांचे उद्बोधन करण्यासाठी सहाय्यक प्राध्यापक छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय डॉ. तृप्ती चोरमले यांनी उच्च रक्तदाब व मधुमेह या संदर्भात जनजागृती करून पालकांशी संवाद साधला. संस्थेचे उपाध्यक्ष सचिन ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे, माजी शिक्षण विस्तार अधिकारी अशोक भांजे, प्राचार्य दत्तात्रय गाजरे, इंदिरा प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक संजय चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दिपप्रज्वालनाने कार्यक्रमांचे उदघाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन प्राचार्य दत्तात्रय गाजरे यांनी केले. सूत्रसंचालन पूनम चव्हाण यांनी केले, तर नारायणी शेंडगे हिने आभार मानले.

### तालकटोरा स्टेडीयमवर सोमवारी प्रकृती संवाद

**ड्रीम फाउंडेशनतर्फे ७५ पर्यावरणप्रेमींचा सन्मान**

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

प्रकृती केंद्रीत विकास मंच दिल्ली, ड्रीम फाउंडेशन व विविध सामाजिक संस्था व संघटना यांच्या वतीने श्री. केएन गोविंदाचार्य यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी २७ जानेवारी रोजी प्रकृती संवाद कार्यक्रम तालकटोरा स्टेडियम नवी दिल्ली येथे होणार असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष काशिनाथ भतगुणकी यांना माहिती दिली. प्रकृती केंद्रीत विकास मंचचे राष्ट्रीय संघटनमंत्री अजितकुमार तिवारी यांच्या संयोजन व विविध पर्यावरण प्रेमींच्या सहकार्याने होणाऱ्या या प्रकृती संवाद कार्यक्रमात विविध विषयांवर विचार मंथन होणार आहे. या कार्यक्रमाचे मुख्य उद्देश प्रकृतीच्या विरूध्द जीवन पध्दतीमुळे उत्पन्न होणारे विविध धोके व त्यावर समाधान, प्रकृतीला अनुकुल जीवनपध्दती, प्रकृती संतुलन व शाश्वत विकास यावर मान्यवरांचे मार्गदर्शन होणार आहे. याच कार्यक्रमात देशपातळीवर पर्यावरण क्षेत्रात अनेक वर्षापासून कार्यरत ७५ मान्यवर व्यक्तींचा ड्रीम फांउडेशन तर्फे सन्मान चिन्ह, सन्मान पत्र व मेडल देऊन गौरव करण्यात येणार आहे. तसेच अस्सल सोलापूर हुरडा पार्टी दिल्लीत आयोजित केले आहे. या कार्यक्रमास केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चव्हाण, स्वामी धर्मात्मानंद सरस्वती, सुधीर देशपांडे, आचार्य. रामानुज, राजेंद्र देवनिकर, डॉ. बी.सी. कुमार व ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी आदी मान्यवर सहभागी होणार आहे.

# पालिकेतील लाचखोर लेखनिकास दोन दिवसांची पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

महापालिकेच्या कर कमी भरून २८ हजार ७४५ रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या कर विभागातील लेखनीकास दोन दिवसाच्या पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश विशेष न्यायाधीश कटारिया यांनी दिला. गुरुवारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने लेखनिकाविरूध्द कारवाई केली होती.



चंद्रकांत लक्ष्मण दोंतुल (वय २९) असे पोलिस कोठडी मिळालेल्या लेखनिकाचे नाव आहे. याबाबत सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील तक्रारदार यांनी सोलापूर महानगरपालिका हद्दीमध्ये ३००० स्क्वेअर फुट जागा नोटरी पद्धतीने खरेदी केलेली असून सदर जागेची कर आकारणीस नावाची नोंदणी करण्यासाठी तक्रारदाराने महानगरपालिकेच्या कर विभागामध्ये अर्ज सादर केला होता. या अर्जाच्या अनुषंगाने तक्रारदार हे पाठपुरावा करीत होते तक्रारदार यांचे ३००० स्क्वेअर फुट नोटरी पद्धतीने खरेदी केलेल्या जागेची कर आकारणीस नोंद करण्याकरिता महानगरपालिकेतील कर आकारणी व कर संकलन विभागातील वरिष्ठ मुख्य लेखनिक चंद्रकांत दोंतुल यांची तक्रारदाराने भेट घेतली असता दोतुल यांनी तक्रारदार यांना त्यांनी खरेदी केलेल्या जागेचा सण १९९२ ते मार्च २०२५ पर्यंतच्या कायदेशीर कर एक लाख ७७ हजार ७४५ रुपये भरण्यास सांगितला तेवढा कर भरायचा नसेल तर पन्नास हजार रुपये देण्यास सांगून त्यामधून सण १९९२ ते मार्च २०२५ पर्यंतचा कर भरल्याची पावती देतो असे तक्रारदारास सांगितले. त्यामुळे तक्रारदाराने दोंतुल यांच्याकडे ५० हजार रुपये दिले. दोंतुल यांनी ५० हजार रुपयांपैकी २१२५५ रुपये ऑनलाईन कर भरल्याची पावती तक्रारदारास देऊन उर्वरित २८ हजार ७४५ रुपये लाच म्हणून स्वीकारली.

याबाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार दाखल केली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दोंतुल यास अटक करून सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. शुक्रवारी दोंतुल यांस न्यायालयात हजर केले असता त्यास दोन दिवसाची पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

# पु.ना. गाडगीळ ज्वेलर्समधून दागिन्यांची चोरी

**दुकानातील सुपरवायझरविरूद्ध गुन्हा**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी -**

करोडों चित्रपट शौकींनांच्या दिलाची धडकन असलेली अभिनेत्री माधुरी दिक्षित हिच्या हस्ते उद्घाटन झालेल्या शहरातील ध्रुव हॉटेलसमोरील पु.ना. गाडगीळ ज्वेलर्स या सराफी दुकानात काम करणाऱ्या सुपरवायझरने ६ लाख ८७ हजार किंमीच्या सोन्या-चांदीच्या दागिने चोरून नेल्याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत पु. ना. गाडगीळ ज्वेलर्स या सराफी दुकानाचे व्यवस्थापक राहुल नरेश बाकळे (वय ३३, रा. भवानी पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दुकानातील सुपरवायझर राजकुमार बिराजदार (रा. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुना एम्प्लॉयमेंट चौक परिसरातील हॉटेल ध्रुव समोरील पु ना गाडगीळ ज्वेलर्स या सराफी दुकानाचे गेल्या काही दिवसापूर्वी चित्रपट अभिनेत्री माधुरी दिक्षित हिच्या हस्ते उद्घाटन झाले आहे.

या सराफी दुकानात सुपरवायझर म्हणून काम करणाऱ्या राजकुमार बिराजदार याने २३ जानेवारी रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास दुकानाचे व्यवस्थापक राहुल बाकळे यांच्या संमतीवाचून ५ लाख ९२ हजार रुपये किंमतीचे ७१.५ ग्रॅम वजनाची सोन्याचे वेढणी आणि ९५ हजार रुपये किंमतीचा चांदीचा एक किलोचा बार चोरून नेला. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक शिंदे पुढील तपास करीत आहेत.

## मुलबाळ होत नसल्याने विवाहितेचा छळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ जानेवारी -**

मुलबाळ होत नसल्याने विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह तिघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आलीया रोजीब बागवान (वय २१, रा. गांधी नगर भाग ४, अक्कलकोट रोड, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती रोजीब शकील बागवान, सासू हिनाकौसर शकील बागवान, सासरे शकील युसुफ बागवान (रा. किसान नगर, कलंदरी शाळेच्या समोर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २५ डिसेंबर २०२२ ते एप्रिल २०२४ या कालावधीत आलीया या सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती रोजीब व इतरांनी त्यांना शारीरीक व मानसिक त्रास देऊन जाचहाट करून मारहाण केली. माहेरून दोन तोळे सोने, दोन लाख रुपये घेऊन ये, तुला मुलबाळ होत नाही, तू दिसायला सुंदर नाही, तुला लग्नात हुंडा दिला नाही, आई वडीलांकडून चारचाकी घेऊन ये म्हणून गाडीची मागणी करून आलीया हिला त्रास दिला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार नवले पुढील तपास करीत आहेत.

## उद्या ब्राह्मण वधू-वर परिचय मेळावा

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

रेशीमगाठ ब्राह्मण वधुवर सूचक मंडळ सोलापूर आयोजित सर्वशाखीय ब्राह्मण वधूवर परिचय मेळाव्याचे आयोजन दिनांक २६ जानेवारी २०२५ रोजी डफरीन चौक येथील सारस्वत मंगल कार्यलय येथे सकाळी १०:०० ते ४:०० या वेळेत करण्यात आले आहे. गेली ८ वर्ष ब्राह्मण संघटनेची नि:शुल्क सेवा हा वसा घेऊन मंडळ काम करत असून गेल्या वर्षी जिल्हास्तरीय आणि यंदाच्या वर्षी राज्यस्तरीय मेळावा घेत असल्याचे मंडळाच्या अध्यक्षा अरुणा जहागीरदार यांनी सांगितले.

## आकर्षक वाहन क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी -**

दुचाकी वाहनांसाठी सुरु होणाऱ्या एमएच-१३ ईटी मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवण्याकरिता अर्ज स्विकारण्याबाबत प्रक्रिया सुरु करण्यात आली असून, दुचाकी वाहनांसाठी आकर्षक नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांनी केले आहे.

ज्या दुचाकी वाहन मालकांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहीत शुल्क भरून हवे असतील त्यांनी दिनांक २९ जानेवारी २०२५ या कालावधीत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते सायं ४ या वेळेत विहीत नमुन्यातील अर्ज सादर करावा.

कार्यालयाच्या नवीन नोंदणी विभागात डीडी, पत्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करावा. डीडी फक्त डीवाय आरटीओ सोलापूर यांच्या नावे नॅशनलाईज अथवा शेड्युल्ड बँकेचा असावा. अर्जासोबत पत्त्याच्या पुराव्याची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक असेल.

## विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य निर्माण करावीत

- कुलगुरु प्रा.डॉ. महानवर
- महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट अकॅडमीच्या प्रशिक्षण शिबीराचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

भविष्यातील उद्योग व्यावसायातील वाढत्या रोजगाराच्या संधी लक्षात घेवून प्राध्यापकांनी कौशल्यआधारीत अभ्यासक्रम निर्माण करावेत. ज्यामुळे समाजाती नागरिकांच्या गरजा पुर्ण करणारी कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये विकशीत करावीत. असे प्रतिपादन कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी केले.




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठच्या कौशल्य विकास केंद्र आणि महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजीत फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्यातील १४ जिल्ह्यातुन ४० प्राध्यापक उपस्थित राहिले होते. या प्रशिक्षण शिबीराच्या समारोप प्रसंगी कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट अकॅडमीच्या इन्क्लुजन अँड डायव्हरसिटी केंद्राचे प्रमुख मिथिलेश भाकरे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्राचे प्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर, सह समन्वयक डॉ. श्रीराम राऊत, डॉ. अभिजित जगताप उपस्थित होते.

प्रस्ताविक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले. तर यावेळी मिथिलेश भाकरे मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचलन डॉ. सुनिता गाजर आणि सृती देवळे यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार डॉ. अभिजित जगताप यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. तेजस्विनी कांबळे, रुषीकेश मंडलीक, तारिक तांबोळी, भैरव भुसारे, गणेश ननावरे, अमोल खंडागळे, रविंद्र कोरे,जय शिंदे, स्नेहल जानकर, अनिता धोंगडे, सोमनाथ वडरे, राजेश पाटील यांनी परिश्रम घेतले.

## परीक्षा पे चर्चा प्रश्नोत्तरी स्पर्धेत इंडियन मॉडेलची किमया गांधी प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ जानेवारी-**

परीक्षा पे चर्चा प्रश्नोत्तरी स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कूलच्या किमया गांधी हिने प्रथम क्रमांक पटकाविला. पीएम श्री केन्द्रीय विद्यालयाच्या अंकिता कोळेकर व इंडियन मॉडेल स्कूलच्याच आदेश गोडसे यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय स्थान मिळविले.



येथील मध्य रेलेच्या पीएम श्री केन्द्रीय विद्यालय सी.आर सोलापूरमध्ये या स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेमध्ये सोलापुरातील केन्द्रीय विद्यालय, आय.एम.एस, के.ल.ई, व्ही. मेहता, संगमेश्वर पब्लिक स्कूल, मॉडेल पब्लिक स्कूल, श्री वीरतपस्वी इंग्लिश स्कूल, सेवासदन प्रशाला या ८ विद्यालयातील ७८ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रमेश नायर, सहायक कार्मिक अधिकारी, मध्य रेलवे, सोलापुर यांच्या हस्ते पुरस्कार व प्रणामपत्र देऊन सन्मानित करण्यात आले व सर्व सहभागी विद्यार्थ्यांना माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी द्वारा लिखित 'पुस्तक एक्झाम वॉरियर' प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्राचार्य उमाकांत जोशी होते. कार्यक्रमाचे आयोजन व संचालन दिलीप कुमार यादव यांनी केले तर आभार अनुराधा गौड यांनी मानले. जयसिंह राठोड, दिनेश गवळी, विजय दलाल हे होते. रॉकेश जाधव, अनुराधा गोठे, प्रशांत सूर्यवंशी, अभिषेक रंजन, राहुल यादव आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## एस.व्ही.सी.एस.हायस्कूल होटगी कृतिशील शाळा पुरस्काराने सन्मानित

**सोलापूर, दि. २० जानेवारी -**

महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीकडून दिला जाणारा सन २०२४-२५ या वर्षाचा कृतिशील शाळा पुरस्कार देऊन एस.व्ही.सी.एस.होटगी प्रशालेचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे पदाधिकारी एस.व्ही.सी.एस. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार धाये, पर्यवेक्षक श्रीशैल व्हनमाने तंत्र विभाग प्रमुख केदार गंगदे आदी उपस्थित होते.




## महात्मा फुले प्रशालेच्या २००० साल बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ जानेवारी-**

विजापूर नाका येथील महात्मा फुले प्रशालेच्या सन २००० सालच्या शैक्षणिक इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांचे २५ व्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त गुरुशिष्य स्नेहमेळावा (गेट-टुगेदर) १९ जानेवारी रोजी उत्साहात पार पडला.याप्रसंगी शाळेचे शिक्षक मुजावर सर, शिकलगार सर, धर्मसाळे सर, पवार सर आणि शिक्षिका मुसळे मॅडम उपस्थित होते. याप्रसंगी सर्व गुरुंचा शिष्यांनी सत्कार करुन आठवण रहावी म्हणून एक भेटवस्तू दिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

"पहिल्या 3 दिवसात मिशन अयोध्या पहा आणि "चलो अयोध्या"च्या लकी ड्रॉ मध्ये सहभागी व्हा!
अधिक माहितीसाठी मिशन अयोध्याच्या सोशल पेजेसना भेट द्या."




लक्ष्मीनारायण सोलापूर ६.३०

मुंबई - प्लाझा सिनेमा दादर १.००; जयहिंद लालबाग १२.००; पिव्हीआर - आयनॉक्स सिनेमाज : आर सिटी घाटकोपर १२.४५, मेट्रो कल्याण १.२५, रघुलिला वाशी १.२५, एक्सप्रीया पलावा डोंबिवली १.४०; मिराज सिनेमाज : आयमॅक्स वडाळा २.१५, अनुपम गोरेगाव १.००, दत्ताणी वसई १२.००, फनफिएस्टा नालासोपारा ६.००, सिनेराज पनवेल ५.००, आर मॉल मुलुंड १२.००, वी डोंबिवली १२.४५, स्टारसिटी अंबरनाथ ४.३०; मुव्हीमॅक्स सिनेमा : एसएम५ कल्याण ३.००; हुमा कांजुरमार्ग १२.००, वंडरमॉल ठाणे ३.३०; सिनेपोलिस विव्हीयाना मॉल ठाणे २.३०; मुव्हीटाईम हब गोरेगाव ५.१५; मॅक्सस बोरिवली २.००, भाईंदर ४.४५; के टि व्हिजन वसई १.३०; के टि व्हिजन बोईसर १२.३०; ट्रायोज लोणावळा ६.००; आयनॉक्स फ्रोझोन छ. संभाजीनगर १२.४५; रिलायंस छ. संभाजीनगर १२.३०;मोहन नोवा छ. संभाजीनगर २.३०; खिंवसरा छ. संभाजीनगर ६.१५ ; खिंवसरा वळूज ६.००; मोहन आंबेजोगाई १२.३०; ईस्क्वेअर : अभिनय छ. संभाजीनगर १२.००; यशोदा लातूर स.११.००; भारत नांदेड १२.४५; संतोषीमाता बीड ३.१५; माऊली कैज ३.००; स्वस्तिक वैजापूर १२.००, ६.००; मनोहर मुखेड ३.००; ओमराज जाफराबाद ३.००; प्रदिप सोयेगाव ६.००; राधाराम बासमत १२.००; हिरा भोकरधन १२.००; कृष्णा जालना १२.००; जवाहर तुळजापूर ६.००; मिनाक्षी शेलू ३.३०; ताज उस्मानाबाद ३.३०; आर के उदगीर ३.००; श्रीनाथ परळी ३, ९; मिराज अकोला १.३०; मिराज अमरावती ४.००; सिनेमॅजिक चिखली १२.००; मिराज चंद्रपूर १.४५; सिनेमार्क मेहकर ३.००; मिराज नंदुरबार ४.४५; एआरडी बुलढाणा स. ११.००; स्टार जळगाव ११.००; एलिमेंट यवतमाळ १२.३०; विजयश्री मालेगाव १२.००, ३.००

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ई-बाईक पेटली...

सोलापूर : डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर शुक्रवारी दुपारी दुचाकीने पेट घेतला. नागरिकांनी प्रसंगावधान साधून अग्निशामक दलाला पाचारण केले. त्यामुळे त्याचा स्फोट होता-होता वाचला. कोणतीही हानी झाली नाही.

(छायाचित्र : केवल तिवारी)



## ▸▸ संक्षिप्त वृत्त...

### माहेश्वरी सभेच्या वतीने उद्या रक्तदान शिबिर

**सोलापूर, दि. २४ जानेवारी -**

जिल्हा माहेश्वरी सभा आणि नीलकंठ को-ऑपरेटिव्ह बँक यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार २६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता रक्तदान शिबिर आणि विविध पुरस्कारांचा वितरण सोहळा आयोजित केल्याची माहिती अध्यक्ष जवाहर जाजू यांनी पत्रकार परिषदेत दिली. येथील कस्तुरबा मार्केटजवळील लिंगशेट्टी मंगल कार्यालयात जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग रजपूत यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ समाजसेवक ब्रिजमोहन फोफलिया यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होईल. यावेळी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा स्वातंत्र्यसेनानी पुरस्कार, विद्या विभूषण पुरस्कार, रक्त महर्षी पुरस्कार, रक्त कर्ण पुरस्कार आणि विशेष सन्मान आदी पुरस्काराने गौरविण्यात येईल, नागरिकांनी यावेळी उपस्थित राहावे, असे आवाहन श्री. जाजू यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस गिरीश जाखेटीया, मधुसूदन कालाणी, चंद्रकांत तापडिया, अशोक बाहेती आदी उपस्थित होते.

### अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिला अश्लिल इशारा करून हातवारे करून तिचा लैंगिक छळ केल्याची घटना घडली आहे. याबाबत पिडीत अल्पवयीन मुलीच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरुन उपेंद्र नारायण नंदाल (वय ३२, रा. दाजी पेठ, सोलापूर) या तरूणाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपेंद्र नंदाल हा यातील अल्पवयीन पिडीत मुलीचा सारखा पाठलाग करीत होता. पिडीता ही शाळेत जाताना तिच्याकडे पाहून नंदाल हा पुटपुटत बोलून तिला अश्लिल इशारे करून तिला मानसिक त्रास देऊन तिच्या मनास लज्जा वाटेल अशी कृत्ये करीत होता. २३ जानेवारी रोजी सायंकाळी पिडीता ही तिच्या घरासमोर थांबलेली असताना उपेंद्र नंदाल याने तिला अश्लिल इशारे करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. त्यामुळे पिडीतेने ही बाब तिच्या नातेवाईकांना सांगितल्यानंतर याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात नंदाल विरूध्द पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.

### रिक्षा लावण्याच्या कारणावरून मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

शहरातील एस टी स्टॅन्ड येथे रिक्षा लावण्याच्या कारणावरून रिक्षाचालकास मारहाण करणाऱ्या दोघां रिक्षाचालकाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अभिषेक ज्ञानेश्वर मोहिते (वय ३०, रा. हांडे प्लॉट, आचल शोरूमसमोर, जुना पूना नाका, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन खाजा नदाफ (वय २७, रा. श्रीराम बेकरीजवळ, मौलाली चौक, सोलापूर) आणि शुभम (रा. ठोकळ नगर, बाळे, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अभिषेक मोहिते, खाजा नदाफ व शुभम हे तिघेही रिक्षाचालक असून २३ जानेवारी रोजी एस टी स्टॅन्ड समोरील संतोष लॉजसमोर सर्वजण रिक्षा भाड्याने नंबर लावून भरत होते. त्यावेळी रिक्षा नंबरने लावण्यावरून त्यांच्यात तक्रार झाल्याने अभिषेक मोहिते यास खाजा नदाफ व शुभम या दोघांनी शिवीगाळ करून दमदाटी केली. तसेच तु कसा धंदा करतो तो बघतोच असे म्हणून धमकी दिली. पोलिस नाईक कामुर्ती पुढील तपास करीत आहेत.

### डंपर आणि दुचाकीच्या अपघातात दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

बोरामणी नाका येथे डंपर आणि दुचाकीचा भीषण अपघात झाला. यात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून त्याचा उजवा हात मनगटापासून फ्रॅक्चर झाला. भारत अशोक विरस्वामी (वय ७१ रा. जुना घरकुल सोलापूर ) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. जखमी अवस्थेत त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार दुचाकीवरून ( १३ ७४२५ ) यातील जखमी जात होते. त्यावेळी डंपर( २५ १११ ) या दोन्ही वाहनांचा भीषण अपघात झाला. काही दिवसांपूर्वीच गुरुनानक चौक येथील अपघातात एका सात वर्षीय चिमुकलीचा जीव गेला आहे. या घटनेची नोंद जेलरोड पोलीस ठाण्यात झाली आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालय तिरंगामय



सोलापूर : २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयावर आकर्षक तिरंगा रोषणाई करण्यात आली आहे. शुक्रवारी सायंकाळी टिपलेले नयनरम्य छायाचित्र. (छाया : केवल तिवारी)



सोलापूर :१०० दिवसाच्या कृती आराखड्याच्या अनुषंगाने शहर पोलिस आयुक्तालयाच्या वॉलकंम्पौडवर वारली पेंटींग करण्यात येत आहे.

# शहरात एका कारसह चार दुचाकींची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी -**

सोलापुरातून विविध घटनांमध्ये एका चारचाकी कारसह चार दुचाकींची चोरी करण्यात आली आहे.

गणेश अशोक पिंपळे (वय ३९, रा. लक्ष्मी नगर, चंडक शाळेजवळ, बाळे, सोलापूर) यांनी त्यांची एमएच १२ एचझेड १५४८ क्रमांकाची टोयाटो इनोव्हा कंपनीची कार ही २१ एप्रिल २०२४ रोजी पूना नाका येथे पार्क केली होती. ही ४ लाख रुपये किंमतीची कार कुणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात २३ जानेवारी २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक कामुती पुढील तपास करीत आहेत.

**पहिली घटना -** राहुल सिद्राम कोळेकर (वय ३५, रा. नाशिवाला बोळ, दक्षिण कसबा, सोलापूर) यांनी त्यांची एमएच १३ बीडब्ल्यू ७११३ क्रमांकाची दुचाकी ही १० जानेवारी रोजी रात्री घरासमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती २५ हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार काळे पुढील तपास करीत आहेत.



**दुसरी घटना -** संजय रामचंद्र सुरवसे (वय ५८, रा. टिळक नगर भाग १, मजरेवाडी, सोलापूर) यांनी त्यांची एमएच १३ सीएल ५६३२ क्रमांकाची ४० हजार रुपये किंमतीची दुचाकी ही २२ जानेवारी रोजी रेल्वे स्टेशन येथील सी एन डब्ल्यू ऑफीसच्या समोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती दुचाकीची चोरट्याने चोरून नेल्याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

**तिसरी घटना -** मुरलीधर लक्ष्मीनारायण अल्ले (वय ५७, रा. रविवार पेठ, मुस्लीम कब्रस्तानसमोर, सोलापूर) यांनी २२ जानेवारी रोजी रात्री रेल्वे स्टेशन येथील नविन दादराच्या बाजूला भिंतीलगत त्यांची एमएच १३ एटी ८१७३ क्रमांकाची २५ हजार रुपये किंमतीची दुचाकी हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरटयाने चोरून नेल्याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार सरतापे पुढील तपास करीत आहेत.

**चौथी घटना -** श्रीपाद कृष्णहरी इंजामुरे (वय ३०, रा. रविवार पेठ, सोलापूर) यांनी १६ जानेवारी रोजी रात्री मार्केट यार्डच्या मागील गेट ते गोंधळी वस्ती दरम्यानच्या मोकळ्या जागेत रोडच्या कडेला त्यांची एमएच १३ बीजी ४९२७ क्रमांकाची दुचाकी हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार नदाफ पुढील तपास करीत आहेत.

# पैशासाठी विवाहितेचा छळ; शहरात दोन घटना उघडकीस

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी -**

सोलापुरात पैशासाठी विवाहितेच्या छळाचे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.करिष्मा कासिम बागवान (वय २८, रा. मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती कासिम, सासरे हसन, सासू खैरून, नणंद जुलफिना (सर्व रा. सिध्देश्वर नगर भाग २, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



१८ मे २०२१५ ते ३ डिसेंबर २०२४ या कालावधीत करिष्मा या सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती व इतरांनी त्यांचा शारीरीक व मानसिक त्रास देत छळ केला. पती कासिम याने मला कर्ज झाले आहे, तु तुझ्या तीन भावांकडून ५० हजार रुपये घेऊन ये म्हणून मारहाण केली. तसेच सासरे हसन व सासू खैरून यांनी माहेरून २ लाख रुपये घेऊन आली तर नांदायला ये नाही तर येऊ नको असे म्हणून शिवीगाळ करीत सतत दमदाटी केली. नणंदेने माझ्या भावाला जास्त सोने घातले नाही, तसेच हुंडा दिला नाही असे म्हणून शिवीगाळ केली. म्हणून या सर्वांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या एका गुन्ह्यात ऐश्वर्या विशाल साळुंके (वय २९, रा. महेश थोबडे नगर, दहिटणे रोड, शेळगी, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती विशाल, सासू संगीता (रा. गुरुद्वार कॉलनी रोड, पुणे), शुभांगी पाटील, सुशांत पाटील (रा. रावेत, पुणे), संजय टोणपे, स्वाती टोणपे (रा. लोणी काळभोर, पुणे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ जून २०२३ ते ३० जून २०२४ या कालावधीत ऐश्वर्या या सासरी पुणे येथे नांदण्यास होत्या. त्यावेळी पती, सासू व नणंद आणि त्याच्या नवऱ्यांनी ऐश्वर्या यांना घरातील किरकोळ कामावरून सतत घालून पाडून बोलून तसेच नविन फ्लॅट घेण्यासाठी माहेरून ५ लाख रुपये आणावेत म्हणून घरातून हाकलून देऊन ऐश्वर्याचा शारीरीक व मानसिक छळ केला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार साळुंके पुढील तपास करीत आहेत.

# तोगटवीर क्षत्रिय समाजाचे उद्या आरोग्य निदान शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ जानेवारी-**

श्री तोगटवीर क्षत्रिय समाज, सोलापूर अंतर्गत श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रीय सहकारी रुग्णालय नियमीत सोलापूर श्रीसोमवार पेठ गट्टी फंड सेवा संघम्, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य निदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, श्री तोगटवीर क्षत्रिय समाज अंतर्गत व श्री सोमवार पेठ गट्टी फंड सेवा संघम् यांची स्थापना होऊन १५० वर्ष पूर्ण झाले. याच पार्श्वभूमीवर शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय सहकारी रुग्णालय नियमित सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य निदान शिबिराचे आयोजन रविवार (दि.२६) जानेवारी २०२५ रोजी सकाळी ०९ ते दु. १ पर्यंत. करण्यात आले आहे. सर्व समाज बांधवांनी या शिबीराचा लाभ घ्यावा. असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

### श्री श्री दिव्यज्ञानानंदगिरी महाराज यांचे प्रवचन

श्री तोगटवीर क्षत्रिय समाज, सोलापूर श्री सोमवार पेठ गट्टी फंड सेवा संघम्, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यज्ञानानंदगिरी महाराज यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले आहे. श्री सोमवार पेठ गट्टी फंड सेवा संघम् यांच्या १५० वर्ष शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त समाजाचे कुलगुरु श्री श्री दिव्यज्ञानानंदगिरी महाराज यांचे दिव्य सानिध्य व लाभणार आहे. शुक्रवार (दि. ३१) जानेवारी रोजी सायं. ५ वा. तोगटवीर सांस्कृतिक भवन येथे आयोजित केले आहे. तरी आपले समाज बांधवांनी या प्रवचनास उपस्थित राहून गुरु आशिर वचनाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सोमनाथ चारे दोन वर्षासाठी तडीपार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ जानेवारी-**

शहरातील जोडभावी पेठ पोलिस ठाण्यातील सराईत गुन्हेगार सोमनाथ चारे यास पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीच्या आदेशानंतर चारे यास पुणे येथे सोडण्यात आले आहे.



सोमनाथ परमेश्वर चारे (रा. ४५, रा. कक्कय्या नगर, शेळगी, सोलापूर) असे तडीपार करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. सोमनाथ चारे याच्याविरुध्द सन २०२३ व २०२४ मध्ये व्यापाऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात माल खरेदी करून त्यांना दोन तीन दिवसात मालाचे पैसे देतो असे सांगून व्यापाऱ्यांची फसवणुक करणे, जीवे ठार मारण्याची धमकी देणे, बनावट दस्तऐवज तयार करून व्यापाऱ्यांची फसवणुक करणे, दमदाटी करणे, मारहाण करणे यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे चारे यास तडीपार करण्यात यावे म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्याकडून पोलिस उपायुक्त कबाडे यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यास पोलिस उपायुक कबाडे यांनी मंजुरी देत चारे यास सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदशे दिले. तडीपारीच्या आदेशानंतर चारे यास पुणे येथे सोडण्यात आले आहे.

# पैशाच्या व्यवहारातून विषप्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

शहरातील आसरा चौकातील एका कार्यालयामध्ये पैशाच्या व्यवहारातून एकाने विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. कुतबुद्दीन हुसेन शेख (वय ४२, रा. रूबी नगर, जुळे सोलापूर) असे उपचारासाठी दाखल झालेल्याचे नाव आहे. २४ जानेवारी रोजी दुपारी एकच्या सुमारास आसरा चौकाजवळील रिलायन्स मॉलच्या बाजूला असलेल्या निलेश यादव याच्या ऑफीसमध्ये कुतबुद्दीन शेख यांनी पैशाच्या व्यवहारातून विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. कुतबुद्दीन शेख यांना मित्र समीर इनामदार यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

स्वातंत्र्य सेनानी
स्व.तुळशीदासजी (दादा) जाधव
यांची १२१ वी जयंती समारंभ...



शनिवार, दि. २५ जानेवारी २०२५
रोजी स. ८.३० वाजता
पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पचक्र अर्पण
स्थळ : मेकॅनिक चौक, सोलापूर
अभिवादक
जिजामाता प्राथमिक शाळा, कोंडी, ता. उत्तर सोलापूर
मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका आदी.

# पोलिसांच्या सूचना येताच सिग्नल दुरुस्ती

## ● महापालिका प्रशासनाच्या म्हणण्यानुसार सिग्नल यंत्रणा सुरळीत





### गुरुनानक चौक येथील सिग्नल यंत्रणा व्यवस्थित सज्ज

महापालिकेच्या वतीने शहरातील गुरुनानक चौक येथे सिग्नल यंत्रणा व्यवस्थित रित्या तयार ठेवण्यात आले आहे. या सिग्नल यंत्रणेचा वापर करण्यास कोणतीही अडचण नाही.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यासाठी ट्राफिक सिग्नल यंत्रणा सुरू आहे. ही यंत्रणा विविध ठिकाणी सुरळीत आहे. दरम्यानच्या काळात काही ठिकाणी बिघाड झाला तर पोलिसांच्या सूचना येताच अर्ध्या तासात महापालिका प्रशासनाकडून दुरुस्ती करण्यात येते, अशी माहिती महापालिका विद्युत विभागाचे अभियंता महादेव इंगळे यांनी दिली.

शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यासाठी ट्राफिक सिग्नल यंत्रणा सुरू आहे. या संदर्भात महापालिका विद्युत विभागाकडून आवश्यकतेनुसार नियमित कार्यवाही केली जाते. सोलापूर शहरात वाहनांची संख्या मोठी आहे. सोलापूर शहरात विविध ठिकाणी विविध १६ ठिकाणी ट्रॅफिक सिग्नलची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे वाहतूक सुरळीत होण्यास मदत होते. सकाळी ९ ते दुपारी २ आणि सायंकाळी ४ ते रात्री ८ वाजेपर्यंत ही ट्रॅफिक सिग्नल यंत्रणा सुरू असते. सिग्नल यंत्रणा सुरळीत ठेवण्याचा महापालिका प्रशासनाचा नियमित प्रयत्न आहे. सिग्नलला टायमर व्यवस्था आहे. दररोज पोलिसांच्या सूचना येतात. पोलिसांच्या सूचना आल्यानंतर महापालिका विद्युत विभागाकडून तातडीने किमान अर्धा तासात दुरुस्ती केली जाते. तत्काळ कार्यवाही करण्यात येते. त्यासाठी एजन्सी नेमण्यात आली आहे. यामुळे कुठेही विलंब होत नाही, असेही महापालिका विद्युत विभागाचे अभियंता महादेव इंगळे यांनी स्पष्ट केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०१३

**क्षणभंगुर हे जाय न कळतां ।**
**ग्रास गिळी सत्ता नाहीं हातीं ।।**

आपल्यासकट आपल्या नजरेस जे कांही दिसते, ते सर्व पंचतत्वातून निर्माण झालेले असून, एके दिवशी हे सर्व पंचतत्वातच विलीन होणार असते, हा निसर्गाचा कधीही न बदलणारा नियम आहे. हे सर्व आपणाला माहिती असूनही आपण हे माझे, ते माझे, मी असा, मी तसा असे म्हटल्याशिवाय राहात नाही. देह म्हणजे मी म्हणून बसल्याने आपणाला आपला खरा परिचय होत नाही. अर्थात देहाला मी म्हणण्यामुळे आपण कळत न कळत माया, मोह, ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, काम, क्रोध आदीमध्ये अडकतो. या सर्वात अडकणे म्हणजे मी ला पुष्टी देणे होय. मी ची वाढती पुष्टी देहाभिमानाला खतपाणी घालते. मूळात हा देहच आपल्या मालकीचा किंवा आपल्या स्वाधीन नसल्यामुळे इतर कांही आपल्या स्वाधीन असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. या क्षणी आपल्या डोळ्याला दिसणारा हा देह पुढच्या क्षणी दिसेलच असे नाही. कारण नाशवंत असणाऱ्या या देहातील हालचाल कोणत्याही क्षणी कोणाचीही, कसलीही परवानगी न घेता बंद होऊ शकते. हातात घेतलेला घास तोंडात घालण्याची सत्ता जर आपल्या हाती नाही तर या देहाला मी समजून इतरांवर सत्ता गाजविण्याची सत्ता आपणाला मिळण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,


संत तुकाराम महाराज

**क्षणभंगुर हें जाय न कळतां।**
**ग्रास गिळी सत्ता नाहीं हातीं।।**

आजच्या अभंगावरून मला एक घटना आठवली ती अशी, आमच्या कार्यालयात एक कर्मचारी होता, ज्यास खूप पान खाण्याची सवय होती. एके दिवशी दुपारी जेवण करून ते पानटपरीवर गेले. त्यांनी पानाचा विडा हाती घेतला. तो पानाचा विडा तोंडात घालण्यासाठी हात वर उचलला. तेव्हा अचानकपणे त्याच्या छातीत वेदना होऊ लागल्या. क्षणार्धात ते मुठी वळू लागले. पानासह मूठ वळली गेली. थोड्याच वेळात त्यांची प्राणज्योत मालवली. प्रेताचे दफन करतांना काहींनी त्यांच्या मुठीतील पान एक बोट उचलून बाहेर काढले. ही सत्य घटना मी पाहिली. माझ्यासोबत अनेकांनी ही घटना पाहिली व अनेकजण हळहळले सुध्दा. पण प्रत्येकांनी या घटनेचा खोलवर विचार केलाच असेल असे मात्र नाही. मी मात्र ही घटना आजही लक्षात ठेवून आहे, आणि ती घटना मुद्दाम होऊन आपल्यासमोर सांगत आहे. या घटनेतून आपल्या लक्षात यायला हवे की हातातील घास स्वत:च्या तोंडात घालण्याची सत्ता जर आपल्या हाती नाही, तर आम्ही इतरांवर सत्ता गाजविण्याचा अट्टहास करून स्वत:च स्वत:जवळून दूर जातोच का? आपण आपल्याजवळ येण्यासाठी आपणाला प्रथम मी ला दूर हाकलावे लागणार आहे. मी ला हाकलले म्हणजे कोणावर सत्ता गाजविण्याची इच्छाच आपणाला निर्माण होत नाही. म्हणजेच दु:ख नावाचा प्रकार मनाला स्पर्श करीत नाही.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. २५ जानेवारी २०२५ | पर्यटन दिन, षट्‌तिला |
| विक्रम संवत् २०८०-८१ | एकादशी, राष्ट्रीय मतदार दिन |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - पौष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. एकादशी - (२०.३१) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - शिशिर | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - ज्येष्ठा (अहोरात्र) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - ध्रुव (२८.३७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (०८.०३) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा.

**वृषभ :** मुलांची काळजी राहील. आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल.

**मिथुन :** स्पर्धेमध्ये यश मिळेल. कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत.

**कर्क :** घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल. एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य.

**सिंह :** हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य. मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे.

**कन्या :** मागील कामात विशेष यश मिळेल. आपल्या लहानसहान इच्छा: आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल. रागावर नियंत्रण ठेवा.

**तुळ :** व्यापार फायदेशीर राहणार आहे. राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक :** लोकप्रियता वाढणार आहे. रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**धनु :** विरोधकांपासून सावध रहा. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर :** नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे.

**कुंभ :** आरोग्याची काळजी घ्या. चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.

**मीन :** मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल.

# महामार्गाच्या धर्तीवर गतिरोधक बसवा

### माजी आ. नरसय्या आडम यांची मनपा आयुक्तांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी -**

अपघातांच्या पार्श्वभूमीवर शहरात महामार्गाच्या धर्तीवर गतिरोधक बसवा. शहरातील सिग्नल, सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने चालू करा या मागण्यांचे निवेदन माकपचे माजी आ. नरसय्या आडम यांची मनपा आयुक्तांना देण्यात आले.




शहरात रस्त्याच्या दुतर्फा अतिक्रमण आहे. यामुळे अनियंत्रित व बेजबाबदार वाहतुकीचे प्रमाण वाढलेले आहे. राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गांचे शहरांतर्गत मुख्य रस्त्यांना जोडल्यानंतर केल्या जाणाऱ्या वाहतुकीच्या नियमांचे चिन्हांकन व निर्देशाचे फलक बऱ्याच ठिकाणी दिसत नाहीत. चौकाचौकातील बंद अवस्थेतील सिग्नल, बंद अवस्थेतील सीसीटीव्ही या सर्व बाबींमध्ये समन्वयाचा अभाव यामुळे शहरात अपघात मालिका अद्याप सुरूच आहे, अशी चिंता माकपचे ज्येष्ठ नेते माजी आ. नरसय्या आडम यांनी व्यक्त केली. हैदराबाद रोड व अक्कलकोट रोड मार्गे शांती चौक ते गुरुनानक चौक या नागरिकांच्या प्रचंड वर्दळीच्या मार्गावरून होत असलेली जड वाहतूक, माल वाहतूक कायम स्वरूपी बंद करून याला उपलब्ध असणाऱ्या पर्यायी मार्गाचा अवलंब करावा. त्यास बाह्य वळण द्यावे अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने करण्यात आली.

यावेळी शिष्टमंडळात माकपचे जिल्हा सचिव ॲड. एम. एच. शेख, युसुफ शेख मेजर, ॲड. अनिल वासम, विल्यम ससाणे, दाउद शेख, नरेश दुगाणे आदींची उपस्थिती होती.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती मो. ९९६००५३५२१

### अलक:- (३१) हिंदू कोण?

संघ परिवारातील भारतीय मजदूर संघाचे संस्थापक माननीय दत्तोपंतजी ठेंगडी यांची एक आठवण सांगते. इ.स. १९६२ च्या चिनी आक्रमणानंतरची गोष्ट आहे. तेव्हा बंगालचे राज्यपाल होते श्री. त्रिभुवन नारायण. त्याआधी ते उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री होते. ते वैयक्तिक रितीने पंतप्रधान नेहरूजींचे मित्र होते. त्यांच्या घरी विजयादशमीच्या आधी नवरात्र पूजा होत असे. त्यावेळी ते शतचंडीचा पाठ करायचे. त्यात या देवी सर्वभूतेषु क्षुधा रूपेण संस्थिता। नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः हा श्लोक आहे. याविषयी त्यांनी नेहरूजीं समवेत चर्चा केली. आणि धर्म हा शब्द जरी उच्चारला तरी नेहरूंचा विरोध असायचा. तो त्यांचा विरोध मावळला व त्यांच्या विचारात परिवर्तन आले. आणि नंतर ते म्हणू लागले आम्ही भौतिक प्रगती, कृषी प्रगती करत असताना आपल्या मनाची सतर्कता वाढवणे देशहितासाठी आवश्यक आहे. व ही मनाची सतर्कता, मनातील देशप्रेम जप ेिहश लरीळो`ष ऊक्रच यामुळेच शक्य आहे. अशा अर्थाची प्रस्तावना श्री. नारायण यांच्या पुस्तकात पंडित नेहरूंनी लिहिली. ती प्रसिद्ध झाली नेहरूंच्या मृत्यूपूर्वी २४ तास आधी. थोडक्यात त्याग; तपस्या, निष्ठा आणि प्रतिबद्धता असल्याशिवाय भौतिक किंवा ऐहिक प्रगती शक्य नसते. हाच विचार हिंदू धर्म शिकवतो व हा विचार मानणारे सारे हिंदूच असतात. ज्यांच्यामुळे हिंदुराष्ट्र बनते. - **क्रमशः**

# पटकथा लेखन ही एक तांत्रिक, सर्जनशील कला : प्रा. गव्हाणे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी-**

पटकथा लेखन ही एक तांत्रिक तसेच सर्जनशील कला आहे, असे प्रतिपादन वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् अँड सायन्सचे प्रा.नानासाहेब गव्हाणे यांनी केले.



संगमेश्वर कॉलेजच्या सांस्कृतिक विभागाद्वारे आयोजित सांस्कृतिक व्याख्यानमालेचे दुसरे व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानाचा विषय होता- ''पटकथा लेखन व वाचन''या व्याख्यानाप्रसंगी ते बोलत होते. त्यांनी आपल्या व्याख्यानात पटकथा लेखनातील अनेक पैलू उलगडून दाखवले. पटकथा लेखन करताना कथेचे महत्व, कथेचा प्रारंभ,मध्य,अंत कसा असावा. पटकथेतील पात्रांची निवड कशी करावी.ग्रामीण कथा असेल तर पात्रे कशी असतील व शहरी कथा असेल तर कशी असतील तसेच, संवाद, भाषाशैली इत्यादी गोष्टी पटकथेसाठी किती महत्वाच्या असतात या बाबींवर त्यांनी विस्ताराने चर्चा केली. अनेक गाजलेल्या चित्रपटांची पटकथा कशी लिहिताना कुठल्या बाबींचा विचार केला गेला, यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.सुहास पुजारी यांनी दो आँखे बारह हाथ' चित्रपटाची कथा ग.दि.माडगुळकर यांनी कशी लिहिली, यावर विचार व्यक्त केले. प्रारंभी सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ. दादासाहेब खांडेकर यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष कॉलेजचे प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा होते. पाहुण्यांचा परिचय गायत्री मेट्रे हिने तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जैद अब्दुल हसन शेख याने केले. रुद्र बेसरे यानी आभार मानले.

# अभावग्रस्त, कष्टकरी लोकांना पाहून लिहायला लागलो

### माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी यांनी उलगडला जीवनप्रवास

### महापालिकेच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जानेवारी -**

गरीबीत आणि दु:खात आनंद उपभोगणारी माणसे मी पाहिली. अभावग्रस्त जीवन मी पाहिले. अभावग्रस्त, प्रामाणिक आणि कष्टकरी लोकांना पाहून मी लिहायला लागलो. मराठी भाषेबद्दल मला आतून ओढ होती. मराठी भाषा ही सुलभ आणि समृद्ध अशी भाषा आहे. भाषेच्या दृष्टीने विशालता आली पाहिजे, असे विचार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. इरेश स्वामी यांनी मांडले.



#### एकमेकांमधील संवादातूनच विकास

मराठी भाषा ही समृद्ध भाषा आहे असे सांगताना डॉ. स्वामी पुढे म्हणाले, दुसऱ्याचे हित पाहणारा माणूस धर्म महत्त्वाचा आहे. अभ्यासकांनी भाषेबद्दल दु:श्वास करू नये. भाषेच्या विद्यार्थ्यांनी शब्दकोश ठेवला पाहिजे. त्यामुळे अभिव्यक्ती वाढते. भाषेच्या दृष्टीने विशालता आली पाहिजे. विविध भाषेतील शब्द आपल्या भाषेत घेतले पाहिजेत तर ती समृद्ध होते. भाषेचे दरवाजे उघडी ठेवली पाहिजेत. एकमेकांमधील संवाद झाला पाहिजे. त्यातूनच विकास होतो, असेही यावेळी डॉ. स्वामी यांनी सांगितले.

सोलापूर महापालिकेच्या वतीने महाराष्ट्र साहित्य परिषद, जुळे सोलापूर, महाराष्ट्र साहित्य परिषद दक्षिण सोलापूर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद उपनगरिय शाखा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, महापालिका पत्रकार संघ यांच्या सहकार्याने ३० जानेवारी पर्यंत आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. स्वामी यांची मुलाखत घेण्यात आली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महापालिका उपायुक्त आशिष लोकरे, तैमूर मुलानी, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी माजी कुलगुरू डॉ. स्वामी यांनी बालपणीपासून ते आत्तापर्यंतचा आपला जीवन प्रवास मांडला. विविध प्रश्नांच्या उत्तरात ते पुढे म्हणाले, तत्कालीन कथा स्पर्धेच्या निमित्ताने मी लिहिण्यास सुरुवात केली. अभावग्रस्त जीवन मी जगलो. जे अनुभवले, जे पाहिले ते लिहिले पाहिजे याच उद्देशातून लिहीत राहिलो. गरिबांना दिवाळीसह इतर सण का येतात असा प्रश्न भेडसावतो. या सणांमुळे त्यांच्या दु:खांना डागण्या दिल्यासारखे होते. गरिबी आणि दु:खात आनंद उपभोगणारी माणसे पाहिली. ती प्रामाणिक आणि कष्टकरी असतात. अशाच लोकांना पाहून मी लिहायला लागलो. मराठी भाषेबद्दल मला आतून ओढ होती.

विद्यापीठाचे कुलगुरू हे पद अनपेक्षित होते. त्यावेळी कोल्हापुरातील विद्यापीठात जाणे सोलापुरातील लोकांना, विद्यार्थ्यांना अडचणीचे ठरत होते. अशा परिस्थितीत सोलापूर विद्यापीठाची स्थापना झाली. सोलापूर विद्यापीठाची निर्मिती हे एक धाडस होते, ते माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकमार शिंदे यांनी केले.सुरुवातीला निधी कमी होता. त्यासाठी प्रयत्न केला, असेही डॉ. स्वामी यांनी सांगितले.

या मुलाखतीचे सूत्रसंचालन प्रा. नानासाहेब गव्हाणे, प्रा. डॉ. सारीपुत्र तुपेरे, प्रा. देविदास गायकवाड यांनी केले. प्रशांत बडवे यांनी आभार मानले.

# अर्थ पंचायतन

अर्थ पंचायतन. हो. अर्थ पंचायतन. याआधी माझे गुंतवणूक पंचायतन नावाचे पुस्तक राजहंस प्रकाशनने प्रसिध्द केले आहे. बेंजामिन ग्रॅहॅम, सर जॉन टेंपलटन, वॉरेन बफे, जॉर्ज सोरोस, पीटर लिंच या ५ जगप्रसिद्ध गुंतवणूकदारांच्या गुंतवणूक पद्धतींची भारतीय गुंतवणूक क्षेत्राच्या संदर्भात तुमच्या - माझ्या सारख्या सर्वसामान्य गुंतवणूकदारांना उपयोगी होईल अशा तऱ्हेने सविस्तर आणि सोदाहरण चर्चा असे स्वरूप असलेल्या या पुस्तकाची सध्या १५ वी आवृत्ती सुरू आहे. म्हणून असेल कदाचित पण या लेखाचे शीर्षक आणि सूत्र म्हणून जे सुचले त्याचे नाव अर्थ पंचायतन !

अर्थ पंचायतन. सध्या आपल्या देशात जे आर्थिक - सामाजिक - राजकीय वातावरण आहे हे पाहता मला आपल्या देशातील पण महाराष्ट्रात ज्यांची पाळे - मुळे आहेत अशा ज्या ५ नेत्यांची सारखी आठवण येत असते ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे आणि न्यायमूर्ती गोपाळ कृष्ण गोखले.

या ५ ही जणांना आपण सगळे अर्थतज्ज्ञ म्हणून कमी आणि भारतीय राजकारणी म्हणून जास्त ओळखतो याची मला पूर्ण कल्पना आहे. पण या ५ ही जणांनी त्यांच्या त्यांच्या कार्यकाळात त्यांनी त्या त्या वेळी निवडलेल्या त्यांच्या त्यांच्या कार्यक्षेत्रात अतिशय मूलभूत आणि मोलाचे काम केले आहे हे तर निर्विवाद सत्य आहे. पण त्याचबरोबर स्वत:च्या बहुआयामी बुद्धी आणि स्वानुभावाच्या जोरावर या पांचजणांनी विविध क्षेत्रांबाबत जी भूमिका मांडली आहे त्याच्याकडे आपले फारसे लक्ष जात नाही. असाच एक भाग म्हणजे या ५ जणांनी त्या त्या वेळी व्यक्त केलेले आर्थिक विचार आणि त्याची आजच्या काळातली उपयुक्तता किंवा प्रचीती. या ५ ही जणांच्या वेगवेगळ्या विचारांची वेगवेगळ्या ठिकाणी आजही वाटणारी उपयुक्तता एवढे एकच साम्य या पाच जणांच्या आर्थिक विचारा बाबत आहे असे नाही. दुसरे साम्य म्हणजे त्या त्या काळात स्वत:चे सामर्थ्य आणि त्याचबरोबर मर्यादाही याचें नेमके भान ठेवत कृती करण्याचे त्यांनी केलेले प्रयत्न. आणि तिसरे साम्य म्हणजे या पाचही जणांनी त्यांची मते स्वत: पुरेशी मर्यादित न ठेवता या ना त्या प्रकारे त्याबाबत सर्वसामान्य भारतीय नागरिकांना जागरूक करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्या प्रयत्नांना त्यावेळी किंवा नंतर किती यश - अपयश आले हा भाग अलाहीदा ! कारण असे यश - अपयश त्यांच्या एकट्याच्या हातात नव्हते. पण याबाबतीत त्या ५ ही जणांची तळमळ सच्ची होती याबाबत कोणतीही शंका नाहीं.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सध्या आपल्या देशात अमेरिकी डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपयाचे मूल्य या विषयाची अतोनात चर्चा सुरू आहे. इतक्या प्रमाणात आणि इतक्या टोकाची चर्चा सुरू आहे की कधी कधी असे वाटते की भीक नको ; पण कुत्रे आवर असे म्हणत या आणि अशा निव्वळ चर्चेने कंटाळून याबाबतची परिस्थिती आपोआप सुधारेल की काय ! ही चर्चा ऐकत - पाहात असताना फार वाटते की पुन्हा एकदा नव्याने , नव्या संदर्भात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ढहश झीेलश्रशा `ष ठींशिश या ग्रंथाकडे वळावे . असाच एक दुसरा मुद्दा म्हणजे एकीकडे तापवलेले आणि प्रसंगी तापते ठेवलेले मराठा आरक्षण आणि दुसरीकडे Knowledge Based Economy ची चर्चा ! हे दोन्ही विषय इतक्या हिरीरीने मांडले जातात की असे वाटावे की जणू काही आरक्षण हा सार्वकालिक, सार्वत्रिक , सर्वसामान्य आणि सर्वमान्य उपाय आहे.

अशावेळी फार वाटते की प्रसंगी आरक्षण हे १० वर्षांच्या कालावधीसाठी असावे असेही मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले होते याचे कदाचित सोयीस्कर विस्मरण आपल्याला झाले आहे की काय ? एकीकडे काश्मीर आणि दुसरीकडे मणिपूर अशी परदेशी प्रेरित आणि प्रसंगी धार्मिक रंगाची अशांतता अनुभवली की जाणवायला लागते की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर करताना हिंदुस्तानात - भारतात जन्माला आलेल्या , आपली पाळेमुळे असलेल्या धर्माची निवड केली होती.

लोकमान्य टिळक रशिया - युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने घेतलेली भूमिका आणि तालिबानने अफगाणिस्तानचा घेतलेला ताबा या दोन घटकांमुळे गेल्या काही वर्षात आपल्या देशाने स्वत:च्या तेलाच्या आयातीचा रोख रशियाकडे वळवला आहे. त्याचे फायदे आता चांगलेच लक्षात आले आहेत. स्वतंत्र भारताला स्वत:च्या आर्थिक प्रगतीसाठी कोणत्या देशाकडे लक्ष ठेवले पाहिजे याबाबत लोकमान्य टिळकांनी वारंवार ज्या देशांचा उल्लेख केला आहे ते हे देश आहेत हा निव्वळ योगायोग नक्कीच नसतो. एकंदरीतच आंतरराष्ट्रीय अर्थकारण व जागतिक राजकारण यांची सांगड भारतीय स्वातंत्र्य लढ्याशी घालणारा पहिला भारतीय राजकीय नेता म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. त्यावेळी ते राजकीय स्वातंत्र्य म्हणून लढत होते; आता आपण आर्थिक समृद्धीची मांडणी करत आहोत इतकेच! राष्ट्रीय शिक्षण, दारूबंदी, शेतसारा, शेअर बाजारातील कार्य पद्धती. कामगार कायदे, याबाबत त्यावेळी लोकमान्य टिळकांनी मांडलेली भूमिका आणि आजची परिस्थिती यात प्रचंड साम्य आणि संबंध आहे. आजच्या भारतीय अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे संरक्षण विषयक वस्तूचे आपल्या देशातच उत्पादन! याबाबतची पाहिली मागणी आणि मांडणी लोकमान्य टिळकांनी १८९५ साली नागपूरला भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात केली होती. एक वेळ परदेशी निधी , परदेशी तंत्रज्ञान चालेल ; पण परदेशी माल नाही ही त्यावेळी लोकमान्य टिळकांनी मांडलेली सार्वजनिक भूमिका आहे. आज आपल्या देशात याबाबत सुरू असलेली कार्यवाही आणि लोकमान्य टिळकांची भूमिका यात कांहीही फरक नाही. फरक असलाच तर इतकाच आहे की लोकमान्य टिळक त्याला स्वदेशी म्हणत होते ; मोदी सरकार त्याला आत्मनिर्भर म्हणते. केवळ संरक्षण विषयक वस्तूंची आपल्याच देशात निर्मिती इतकीच लोकमान्य टिळकांची संरक्षण विषयक भूमिका सीमित किंवा मर्यादित नव्हती. भारतीय नागरिकांनी मोठया प्रमाणावर लष्करात व सनदी सेवेत भरती झाले पाहिजे असा आग्रह लोकमान्य टिळकांनी वारंवार धरला होता. आज त्याचे महत्त्व प्रकट होते आहे. काळाच्या पुढची विज्ञाननिष्ठा हा लोकमान्य टिळकांच्या आर्थिक विचारांचा पाया आहे. आजच्या rtificial intelligence च्या जमान्यात त्याचे महत्त्व वेगळेपणाने अधोरेखित करण्याची आवश्यकता नाही. खरं म्हणजे अर्थकारणी लोकमान्य एका स्वतंत्र लेखाचा , नव्हे स्वतंत्र पुस्तकाचा विषय आहे. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर सध्या आपल्या इथे दिल्लीत होणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाची चर्चा सुरू आहे. अशावेळी त्या काळात लेखण्या मोडा , बंदूका घ्या असे आवाहन स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी केले होते याची आठवण आल्या शिवाय राहत नाही. लोकमान्य टिळक यांच्या प्रमाणेच स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीही लष्करात भरती होण्यावर भर दिला होता. आज भूतान सारखें देश स्वत:चे लष्कर न बाळगता भारतीय फौजेला ते काम र्जीीीिलश करतात तेंव्हां लोकमान्य टिळक आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या दूरदर्शीपणाचे प्रत्यंतर येते. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे

Essays on Indian Economics या न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या पुस्तकाचे अवधूत डोंगरे यांनी भारतीय अर्थकारणावरील निबंध या नावाने केलेले भाषांतर ( हे भाषांतर आहे ; अनुवाद नाहीं) साधना प्रकाशनाने नुकतेच प्रसिध्द केले आहे. हे पुस्तक वाचतांना साहित्य अकादमीने प्रकाशित केलेल्या, आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी संपादक असलेल्या लोकमान्य टिळक लेखसंग्रह (लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा केसरीतील निवडक लेख संग्रह) या पुस्तकाची वारंवार आठवण होते. या दोन्ही पुस्तकांत परतंत्र भारताच्या आर्थिक समस्या हा या दोन्हींचा समान धागा आहे. पण व्यक्ती परत्वे, काळ परत्वे, स्वभाव परत्वे मांडणी आणि बैठक साहजिकच वेगळी आहे. ही दोन्ही पुस्तके एकाचवेळी वाचली तर आजच्या परिभाषेत बोलायचे तर एखाद्या Panel Discussions ला बसल्या सारखें वाटते. पण या दोन्ही भूमिका आजच्या सारख्या कंठाळी, अर्वाच्य नसून अत्यंत अभ्यासू आहेत. ... हा खरा आजच्या ज्ञानाधिष्ठीत अर्थव्यवस्थेचा आणि समाज व्यवस्थेचा पाया आहे. न्यायमूर्ती गोपाळ कृष्ण गोखले . न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे शिष्य व सहकारी असणाऱ्या न्यायमूर्ती गोपाळ कृष्ण गोखले यांनी विधी मंडळात केलेली अर्थसंकल्प या विषयावरची भाषणे आजही आवर्जून वाचावीत अशी आहेत. सैद्धांतिक संकल्पना आणि व्यवहारात्मक उपयुक्तता यावर त्यांचा भर असे असे म्हणले जाते. सरते शेवटी या मालिकेत लोकहितवादी (गोपाळराव देशमुख)यांचाही समावेश कदाचित करता येईल. त्यांच्या शतपत्रेच्या माध्यमातून त्यांनी आर्थिक विचारांची मांडणी प्रसंगी केलीही आहे. पण तिचे स्वरूप तत्कालीन परिस्थितीचे वर्णन अशा स्वरूपाची जास्त आहे. त्यात धोरणात्मक मांडणीचा भाग फारसा आहे. लोकहीतवादींचे लेखन हे आत्ताची स्थिती अशी अशी आहे असे अर्थसंकल्प -पूर्व आढावा (Economic Survey ) मांडल्यासारखी आहे. त्यात त्यावर पावले उचलत अर्थसंकल्प ( Budget ) मांडण्याचा भाग फारसा नाहीं . Economic Survey चे महत्व नाहीं असे नाही ; पण त्याला Budget ची सर नाहीं. आंबेडकर-टिळक-सावरकर-रानडे-,गोखले याबाबात लोकहितवादिंच्या पुढे जातात. अजून एक डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकमान्य टिळक यांचे आर्थिक विचार हा खर म्हणजे तीन स्वतंत्र पुस्तकांचे विषय आहेत. एक पुस्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार. दुसरे पुस्तक म्हणजे लोकमान्य टिळक यांचे आर्थिक विचार. तिसरे पुस्तक म्हणजे या दोघांच्याही आर्थिक विचारांचा तुलनात्मक अभ्यास. डॉ. बाबासाहेब आंबेडकर , लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, न्यायमूर्ती रानडे आणि न्यायमूर्ती गोखले या पाचही जणांचे कायदेविषयक शिक्षण हे जसे त्यांच्यात साम्य आहे; तसेच या पाचही जणांच्या आर्थिक मतांचे प्रत्यंतर आजच्या काळात येते. म्हणून हे पाचजण म्हणजे अर्थ पंचायतन.

**- चंद्रशेखर टिळक, डोंबिवली**
**मो. ९८२०२९२३७६**

## संक्षिप्त वृत्त



### बार्शी तालुक्यातील ९० हजार शेतकऱ्यांना हेक्टरी ३० हजार रुपये पीक विमा मिळावा

**बार्शी, दि. २४ जानेवारी-**

तालुक्यातील शेतकऱ्यांना सन २०२४ वर्षातील खरीप पिकासाठी ३० हजार रुपये हेक्टरी पीक विमा मिळावा. पिकाच्या नुकसानीप्रमाणे पीक विमा दिला नाही तर विमा कंपनीला जबाबदार धरुन जिल्हा कृषी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. शुक्राचार्य भोसले यांना निवेदन देत दिला. तालुक्यात गेल्या वर्षीच्या तुलनेने चालू वर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. सन २०२४ मधील खरीप हंगामात अतिवृष्टी आणि सततच्या पावसाने सोयाबीन या पिकाचे खूप मोठे नुकसान झाले होते. ओढावलेल्या नैसर्गिक आपत्ती दरम्यान विमा कंपनीच्या निकषानुसार झालेल्या नुकसानीच्या पूर्वसूचना तालुक्यातील ९० हजार शेतकऱ्यांनी नोंदवल्या होत्या. सोयाबीन पिकाचे नुकसान होऊन चार ते पाच महिने झाले, तरी अद्याप शेतकऱ्यांना पीक विमा जमा झालेला नाही. जर पंधरा दिवसांमध्ये शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम मिळाला नाही तर जिल्हा कृषी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा राहुल भड, अशोक माळी, भरत वाघमोडे, शिवाजी वाघमोडे आदी शेतकऱ्यांनी निवेदनामध्ये दिला आहे.



### लाकूड वाहतूक करणारा ट्रक जप्त

**मंगळवेढा, दि.२४ जानेवारी-**

मंगळवेढा-गणेशवाडी या मार्गावर बेकायदा वृक्षतोड करून विक्रीस जाणारा ट्रक वन विभागाच्या पथकाने पकडून ट्रक चालक मालक सचिन साळुंखे (रा.सांगोला) याच्यावर कारवाई केली आहे. दरम्यान, ३० हजार रुपये किमतीचे ६ टन लिंबाचे लाकूड पथकाने जप्त केल्याचे सांगण्यात आले. १८ जानेवारी रोजी मंगळवेढा-गोणेवाडी या मार्गावरून एक ट्रक (क्र. एम. एच. १३/ आर.१२३१) विनापरवाना वृक्ष तोडून आंधळगांव येथून भरून तो गोणेवाडी मार्गे विक्रीस जात असल्याची माहिती वन विभागाच्या पथकास लागल्याने उपवन संरक्षक कुशाग्र पाठक, सहाय्यक वनसंरक्षक विशाल चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर विभागाचे सतीश उटगे, वनपाल महेश मिरगेवाड, वनपाल भागवत मासाळ-मरवडेकर, किसन कांबळे यांनी गोणेवाडी येथे सापळा लावून ट्रक पकडला.



### श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरास एक लक्ष रुपयाची देणगी

**पंढरपूर,दि.२४ जानेवारी-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस इंदुमती रामचंद्र दळवी राहणार पुणे यांनी एक लक्ष रुपयांची देणगी दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. त्याबद्दल देणगीदार यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे लेखाधिकारी मुकेश अनेचा यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची प्रतिमा व उपरणे देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व देणगी विभाग प्रमुख राजेश पेटले उपस्थित होते. संबंधित देणगीदार यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या अन्नछत्रासाठी देणगी देण्याची इच्छा मंदिर समितीच्या सदस्या ॲड. माधवी निगडे यांच्याकडे व्यक्त केली होती. त्या दर महिन्याला श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येत असतात. जास्तीत जास्त भाविकांना अन्नदान व्हावे अशी त्यांची मनोमन इच्छा आहे. सदरची देणगी त्यांनी कै. लक्ष्मी शिवाजी दळवी व कै. रामचंद्र दगडोबा दळवी या आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ दिली आहे.



### सुधीर सुतार यांचा अक्कलकोटमध्ये सन्मान

**अक्कलकोट, दि २३ जानेवारी-**

सोलापूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज माध्यमिक प्रशालेचे शिक्षक सुधीर सुतार यांना महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीकडून जिल्हास्तरीय कृतिशील शिक्षक २०२५ चे कृतीशील शिक्षक पुरस्कार लाभल्या प्रित्यर्थ श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात चेअरमन महेश इंगळे यांनी स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद देऊन सुधीर सुतार सर यांचा यथोचित सन्मान केला. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, जिल्हा परिषद शिक्षक व्यंकट धरमसाले, विश्वनाथ करकी, सोमनाथ सुतार, संजय आडवीतोटे, श्रीशैल गवंडी, महेश काटकर, विपुल जाधव, स्वामीनाथ मुमूडले इत्यादी उपस्थित होते.

# कुंभेज येथील चौथ्या पंपाचे काम युद्ध पातळीवर

## दहिगाव सिंचन योजनेबाबत आमदार नारायण पाटील यांची कार्यतत्परता

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २४ जानेवारी-**

करमाळ्याचे आमदार नारायण आबा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या पंप हाऊस -२ कुंभेज येथील चौथ्या पंपाचे काम युद्ध पातळीवर सुरु आहे. साध्य दहिगाव उपसा सिंचन योजनेचे रब्बी आवर्तन चालू आहे. या आवर्तनामध्ये अगदी टेल मायनार पर्यंत घोटी, नेर्ले या भागापर्यंत अतिशय चांगल्या पद्धतीने पाणी पोहचले असून या भागतील बंधारे, तलाव, नालबंदारे, नाला बिल्डिंग भरून घेतले गेलेले आहेत.सद्या कुंभेज येथील पंप हाऊस मधील चौथा पंप हा अनेक वर्षे झाले नादुरुस्त होता. याची दुरुस्ती तातडीने करण्याची सूचना आमदार नारायण आबा पाटील यांनी दिली. यावर कुंभेज येथील पंप हाऊस दोन मध्ये युद्ध पातळीवर काम सुरु असून लवकरच हे काम पूर्ण होईल यामुळे येत्या काही दिवसात पंप हाऊस एक दहिगाव व पंप हाऊस दोन येथील सर्व पंप पूर्ण क्षमतेने पाणी उपसा करतील. २०१९ नंतर कधीही ही योजना दहा पंप सुरु करून चालवली गेली नव्हती. परंतु आमदार नारायण आबा पाटील यांनी कार्यतत्पर्ता दाखवत आता दहा मोटारीने पाणी





उपसा करून लाभ क्षेत्रातील सर्व भागात पाणी देण्याचे ठरवले आहे आणि याच उद्देशाने या योजनेची कामे युद्ध पातळीवर सुरु आहेत.पंपहाऊस दोन येथील काम चालू असल्यामुळे काही काळा पुरता पाणीपुरवठा स्थगित राहील याची नोंद शेतकऱ्यांनी घ्यावी. परंतु साधारणता दोन दिवसात दहिगाव येथील सहा व कुंभेज येथील चार हे सर्व पंप पूर्ण क्षमतेने पाणी उपसा करतील. तसेच दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या रब्बी आवर्तनास तीस दिवसाची मंजुरी मिळाली असता नारायण आबा पाटील यांनी आम्हाला आणखीन मंजुरी वाढवून पंधरा दिवस आवर्तन देण्यात यावे अशी मागणी पालकमंत्री यांच्याकडे व संबधित विभागाकडे केली असल्याने आवर्तन वाढवून मिळण्याची शक्यता आहे. माझ्या मतदारसंघातील दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या राखीव असलेल्या १.८० ढचउ पाण्याचा पूर्ण उपयोग लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना झाला पाहिजे, अशी मागणी आ. पाटील यांनी उचलून धरली असून यामुळे पाहिल्यांदाच दहिगाव उपास सिंचन योजनेच्या माध्यमातून वंचित राहिलेल्या अनेक भागामध्ये पाणी जाणार आहे.आणि रब्बी आवर्तनात दहिगाव उपसा सिंचन योजनेचे पाणी मिळत असल्याने शेतातील ज्वारी, गहू, माका, हरभारा, ऊस, केळी या पिकांना जीवदान मिळत असल्याने शेतकरी वर्गातून आ. पाटील यांच्या कार्यतत्परतेचे कौतुक केले जात आहे.



## कन्नड नाटकाने समाजात परिवर्तन : कोलाठी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.२४ जानेवारी-**

तालुक्यात सर्वत्र ग्रामीण भागात ग्रामदैवत यात्रा निमित्ताने गावातील अनेक कलाकार मिळून कन्नड सामाजिक नाटक आयोजित करतात. या कन्नड नाटकाने समाजात परिवर्तन होत असल्याची मनोगत संरोजा कोलाठी यांनी व्यक्त केले. अक्कलकोट तालुक्यातील दुधनीचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रा निमित्त श्री गंधर्व नाट्यसंघच्या वतीने श्री शंकरजी हुवीन हळी लिखित जिल्हाधिकारी अर्थात अधिकार निनदु सरकार नन्नदु या नाटकाचे आयोजन केले होते.

नाटकास संगीत मडु, नंदर्गी अफजलपूर, सोनु हडलगी, सदू हडलगी, प्रोजेक्ट गीरीष भावी, बिळगी यांचे होते. या नाटकाचे आधारस्तंभ आमदार सचिन कल्याणशेटी व मिलन कल्याणशेटी तसेच मालक बसवराज परमशेट्टी होते. खंबीरसाथ सातलिंग परमशेट्टी, महेश पाटील, शंकर भांजी, बसवराज हौदे होते. दुधनी गावांतील प्रतिष्ठीत व्यक्तीच्या सहकार्य लाभले. या नाटकात प्रियांका कोलाठी, शैलू बंगळुरू, चिन्नु हुल्याळ, कल्पना मुधोळ, ओंकार मैंदर्गी, भिमाशंकर जकापुर, शरणबसपा सिन्नुर, सिंधू उडचण, अमर परमशेट्टी, राज जकापूर, सतीश लोहार, शंकर रुगी, अबणा कलशेट्टी, धर्मा शिंगे आदी कलाकारांनी भूमिका सादरीकरण केले. सलग पाच दिवस नाटक चालू होते.

## विभागीय रेल्वे समितीवर विनोद भरते यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२४ जानेवारी-**

सोलापूर विभागीय रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य म्हणून अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे प्रांत कोषाध्यक्ष विनोद बाळासाहेब भरते यांची निवड झाली आहे. त्याबद्दलचे पत्र रेल्वे विभागातर्फे त्यांना देण्यात आले आहे. विनोद भरते हे मागील पंधरा वर्षापासून ग्राहक चळवळीत कार्यरत आहेत. तालुकास्तरापासून काम करत ते सध्या मध्य महाराष्ट्र प्रांताचे कोषाध्यक्ष या पदावर काम करीत आहेत. या निवडीबद्दल अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे प्रांत अध्यक्ष बाळासाहेब औटी, संघटक प्रसाद बुरांडे, सचिव संदीप जंगम, प्रांत सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास,जिल्हा संघटक दीपक इरकल, जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा महिला विभाग प्रमुख माधुरी परदेशी, जिल्हा सदस्य अण्णा ऐतवाडकर, पांडुरंग अल्लापूरकर, संतोष उपाध्ये, संभाजी लंगोटे, तालुका अध्यक्ष विनय उपाध्ये, उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, संघटक महेश भोसले, सहसंघटक आझाद अल्लापूरकर,सचिव प्रा.धनंजय पंधे, सदस्य सागर शिंदे, अंकुश वाघमारे, श्रीराम साळुंखे, सतिश निपाणकर, इंद्रजीत फडे, संजय खंडेलवाल यांनी अभिनंदन केले आहे.



## समर्थांची कृपासावली हे जीवनातील सर्वात मोठे भाग्य : रणजितसिंह नाईक-निंबाळकर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२४ जानेवारी-**

ब्रम्हांडनायक दत्त अवतारी श्री स्वामी समर्थांची कृपासावली हेच आमच्या कुटुंबीयांच्या जीवनाचे सर्वात मोठे भाग्य असल्याचे विचार भाजपा नेते तथा माढा मतदारसंघातील माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी मांडले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी

माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचा स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सत्कार केला. याप्रसंगी निंबाळकर बोलत होते. पुढे बोलताना निंबाळकर यांनी श्री स्वामी समर्थांच्या भक्तीभावातून लाभलेल्या जीवनाचे कर्म समाजसेवा व जनसेवेकरीता करण्याचे काम स्वामींच्या कृपेने माझ्या हातून घडत



असल्याचे मनोगतही व्यक्त केले. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संतोष फुटाणे, प्रसाद सोनार, सागर गोंडाळ, अमर पाटील, संजय पवार, व्यंकटेश पुजारी, श्रीशैल गवंडी, प्रफुल जाधव, श्रीकांत मलवे आदि उपस्थित होते.

## वाळू तस्करांची महिला प्रांताधिकाऱ्यांना दादागिरी

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२४ जानेवारी-**

दबंग महिला प्रांत अधिकारी यांनी वाळू तस्करावर कारवाईचा बडगा उगारला असून अवैधपणे वाळू वाहतूक करणारा टिपर चार ब्रास वाळूसह वीस लाख,२८ हजारांचा मुद्देमाल जप्त करून तीन जणांच्या विरोधात टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेने खळबळ उडाली असून वाहने आडवी लावून कारवाई रोखण्याचा प्रयत्न व धक्का-बुक्की करणाऱ्यासह तीन वाळू तस्करांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

ही कारवाई २३ जानेवारी रोजी रात्री १२.३० ते १.४५ वा.सुमारास पुणे-सोलापूर महामार्गावर वरवडे शिवारात करण्यात आली. राज्याचे जलसंपदामंत्री डॉ.राधाकृष्ण विखे-पाटील यांनी टेंभुर्णीत एका खाजगी कार्यक्रमात वाळू तस्करी वरून खास शैलीत जिल्हाधिकारी यांच्याकडे पाहून टिप्पणी केली होती.यामुळे प्रशासन वाळू तस्करावर काय कारवाई होणार याकडे लोकांचे लक्ष लागून राहीले होते. कुर्डुवाडी येथील प्रांत अधिकारी प्रियांका आंबेकर यांच्या नेतृत्वाखाली तलाठी व इतर कर्मचारी यांचे पथक कारवाई करण्यासाठी पुणे-सोलापूर महामार्गावरून येत असताना एक टिपर जात असल्याचे पाहून संशयावरून त्यास थांबविले असता त्यामध्ये विनापरवाना उत्खनन करून आणलेली वाळू मिळून आली.त्याच्याकडे वाळूचे कोणतेही कागदपत्रे नसल्याने टिपर ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यासाठी पथक टेंभुर्णी पोलीस ठाण्याकडे येत होते.यावेळी प्रांत अधिकारी यांच्या शासकीय वाहनास फॉर्च्यूनर व अल्कायझर या गाड्या आडव्या लावून त्यांना रोखण्याचा व कारवाईस अडथळा आणण्याचा दोघांनी प्रयत्न केला.तसेच प्रांत अधिकारी यांना आण्णा पाटील याने हाताने धक्का बुक्की केली आहे. याबाबत आण्णा पाटील रा.शिराळ (टें) ता. माढा,आप्पा पराडे रा. बाभळगाव,ता.माळशिरास व टिपरचा चालक गणेश काशिद रा.परीतेवाडी ता.माढा सोलापूर या तीन जणांवर टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून तिघांना अटक करण्यात आली आहे. याबाबत तलाठी प्रविण बोटे-(वय-३४) रा.कुर्डुवाडी यांनी फिर्याद दिली असून अधिक तपास पोसई अजित मोरे हे करीत आहेत.



> या गुन्ह्यामुळे आज दिवसभर टेंभुर्णी पोलीस स्टेशनच्या आवारात सर्व वाळूमाफेच्या गाड्यांची रांग आरोपींना भेटायला लागली होती या मुळे हे पोलीस स्टेशन आहे का हे वाळू माफियाचा आड्डा आहे का? असे दिवसभर सर्वसामान्य नागरिकांतून बोलले जात होते

## मंगळवेढा येथील शिक्षण विभागात गटशिक्षणाधिकाऱ्यासह १५ पदे रिक्त

### गटशिक्षणाधिकारीशिवाय चालतोय कारभार

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २४ जानेवारी-**

मंगळवेढा येथील पंचायत समिती शिक्षण विभागाकडील गटशिक्षणाधिकार्यासह विविध अन्य पदे रिक्त असल्याने भविष्यातील देशाचे आधारस्तंभ म्हणून ओळखल्या जाणार्या शालेय मुलांच्या शिक्षणावर प्रश्नचिन्ह उभे असून राज्याच्या शालेय शिक्षण मंत्रांनी याकामी तात्काळ लक्ष घालून रिक्त पदे भरावीत अशी सुज्ञ पालक वर्गातून मागणी होत आहे. मंगळवेढा येथील तत्कालीन गटशिक्षणाधिकारी दशरथ यरवळकर हे दि.७ जुलै २०१६ रोजी सेवानिवृत्त झाले तेव्हापासून आजतागायत तब्बल ९ वर्षे या कार्यालयास गटशिक्षणाधिकारीच मिळाले नसून प्रभारी केंद्र प्रमुखावरच हा कारभार चालत असल्याने शिक्षणाची ऐशी तैशीच सुरु असल्याच्या पालकांच्या प्रतिक्रिया आहेत. गटशिक्षणाधिकार्याबरोबरच पोषण आहार अधिक्षक -१,विस्ताराधिकारी -२,केंद्र प्रमुख -८,मुख्याध्यापक -४ अशी एकूण १६ पदे पंचायत समिती शिक्षण विभागात रिक्त आहेत. मोरेवाडी, डोंगरगांव, बंडगरवाडी, भोसे या चार शाळेवर मुख्याध्यापक नसल्याने




प्रभारी मुख्याध्यापक असून शालेय अध्यापन करावयाचे की मुख्याध्यापकाचा कार्यभार सांभाळावयाचा असा या शिक्षकापुढे प्रश्न पडला आहे.

दोन्ही पदाचा भार सांभाळण्याची वेळ येत असल्याने अध्यापन करावयास वेळ मिळत नसल्यामुळे मुलांच्या भवितव्याचे काय होणार? असा सुज्ञ पालकांचा सवाल आहे. आत्तापर्यंत प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून हणमंत कोष्टी,बजरंग पांढरे,पोपट लवटे आदींनी पदभार सांभाळून शिक्षणाचा गाडा हाकला आहे.

# पिलीव आरोग्य केंद्रात २२ पदे रिक्त

### आरोग्य सेवा कोलमडली

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि.२४ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव हे सर्वात जुने प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. याठिकाणी पिलीव, झिंजेवस्ती, कुसमोड, बचेरी,शिंगोर्णी, कोळेगाव, फळवणी, तांदुळवाडी, शेंडेचिंच या गावांचा समावेश होतो. यामध्ये जवळपास या कार्यक्षेत्रात ९ आरोग्य उपकेंद्र आहेत .पण रिक्त जागांमुळे आरोग्य सेवेचा बोजवारा उडाला आहे. शासनस्तरावर सदरची रिक्त पदे भरण्यासाठी वारंवार मागणी करुनही सदरची रिक्त पदे भरली जात नाहीत.

पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्रात परिचर दोन रिक्त पदे, पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र आरोग्य सेवीका ६ पदे रिक्त यामध्ये पिलीव मुख्यालय २,फळवणी, शेंडेचिंच, बचेरी,पिलीव २,कोळेगाव याठिकाणी ही पदे रिक्त आहेत, तर आरोग्य सेवकाची ७ पदे रिक्त आहेतफ यामध्ये बचेरी, झिंजेवस्ती, तांदुळवाडी, शेंडेचिंच, पिलीव २,शिंगोर्णी व कोळेगाव याठिकाणी सदरची पदे रिक्त आहेत. तर शिपाई महीला व पुरुष प्रत्येकी एक पद रिक्त आहे. ही पदे पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्र व त्या अंतर्गत येणाऱ्या उपकेंद्रात रिक्त आहेत यामुळे खरेतर आरोग्य सेवा पूर्णपणे कोलमडली असून गेल्या अनेक वर्षापासून सदरची पदे रिक्त आहेत. अनेक उपकेंद्र खरेतर अक्षरशःधूळ खात पडली आहेत. रिक्त पदे ताबडतोब भरुन नागरिकांना चांगली सेवा देणयाची मागणी पिलीव परीसरातील नागरिकांमधून होत आहे. सध्या पिलीव येथील मुख्यालयाची इमारत ही अनेक दिवसांपासूनची असल्यामुळे धोकदायक झाली. याठिकाणी सुसज्ज अशी इमारत तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुगणालयात रुपांतर करणे आवश्यक आहे. कारण पंढरपूर - सातारा महामार्गावरील हे मुख्य ठिकाण असून पंढरपूर, तुळजापूर अक्कलकोट गोंदावले व इतर तिर्थ क्षेत्राकडे अनेक भाविक भक्त मोठ्या संख्येने याच ठिकाणावरून ये-जा करतात.




> याठिकाणी असणारे वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास जाधव यांना याविषयी विचारले असता या प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त जागा ताबडतोब भरावीत जेणेकरून याठिकाणाहून अजून चांगली व तत्पर सेवा देण्यास मदत होईल.

## कुंभेजची श्वेता शिंदे विद्यापीठात अव्वल

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २४ जानेवारी-**

केतूर (अभय माने) परभणीच्या वसंतराव नाईक कृषी विद्यापीठात कृषी अभियांत्रिकीच्या पदव्युत्तर पदवीमध्ये फार्म मशिनरी अँण्ड पॉवर इंजिनिअरींग विषयात तिने उज्वल यश संपादन केले आहे. श्वेता शिंदे ही वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोटचे विश्वस्त व करमाळा पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रा.भारतराव शिंदे पाटील यांची मुलगी आहे. श्वेता शिंदे हिने मिळवलेल्या यशाबद्दल तिचे वडील प्रा. भारतराव शिंदे, अक्कलकोटचे मा. उपनगराध्यक्ष व स्वामी महाराज मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे, चंद्रपुरचे उपजिल्हाधिकारी संजय पवार, यशकल्याणीचे अध्यक्ष प्रा.गणेश करे-पाटील, अहिल्यानगर काँग्रेसचे मा. जिल्हाध्यक्ष बाळासाहेब साळुंके, प्रा. नंदकुमार निगडे-देशमुख, प्रा. राजाराम माने, प्रा.विजय काकडे, विजयसिंह देशमुख, इंग्लीश टीचर्स असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष प्रा. बाळकृष्ण लावंड,पक्षीमित्र कल्याणराव साळुंके, प्रा.गोपाळ पाटील यांनी तिचे अभिनंदन केले. श्वेता शिंदे यांना विद्यापीठाच्या २६ व्या. दीक्षांत समारंभात सनद प्रदान करताना असोशिएट डीन व प्रिन्सिपाल डॉ.रामटेके,डॉ भोसले, डॉ. खोडके मॅडम, डॉ. मोरे, प्रो. पाटील उपस्थित होते.



# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## राष्ट्रध्वजासाठी प्लॅस्टिकचा वापर करु नये : प्रांताधिकारी इथापे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२४ जानेवारी-**

केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजाकरीता प्लॅस्टिकच्या वापरास तसेच प्लॅस्टिकचा राष्ट्रध्वज निर्मितीस व विक्रीस मान्यता नाही. राष्ट्रध्वजाचा मान राखणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून, राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखला जावा तसेच त्याचा अवमान होऊ नये, यासाठी प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजाचा वापर, निर्मिती व विक्री करू नये, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

दरवर्षी प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन, इतर राष्ट्रीय कार्यक्रम व महत्त्वाचे सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा सामन्यांच्या वेळी विद्यार्थी व नागरिकांकडून राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. हा कार्यक्रम पार पडल्यानंतर फाटलेले कागदी तसेच प्लॅस्टिकचे राष्ट्रध्वज मैदानात, रस्त्यावर तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी इतस्तत: पडलेले असतात. असे राष्ट्रध्वज पायदळी तुडविले जातात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. राष्ट्रध्वजाचा अवमान करणे त्याची विटंबना होणे हे बोधचिन्हे नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम १९५० राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१ तसेच ध्वजसंहितेच्या तरतुदीनुसार दंडनीय अपराध आहे.

केंद्रीय गृह मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजाकरिता प्लॅस्टिकच्या वापरास मान्यता नाही. राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखला जावा. खराब झालेले, राष्ट्रध्वज आढळून आल्यास ते सन्मानपूर्वक गोळा करुन नजीकच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयामध्ये जमा करावेत असे आवाहन प्रांताधिकारी इथापे यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### ग्राहकांना सौजन्याची वागणूक द्या : प्रांताधिकारी विजया पांगारकर

**सदाशिवनगर, दि. २४ जानेवारी-**

केंद्रांत आलेल्या ग्राहकांना सौजन्याची वागणुक द्या, तुमच्यामुळे शासनाची व प्रशासनाची प्रतिमा मलिन होणार नाही याची दक्षता घ्या, अशा सूचना अकलूजच्या उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर यांनी तहसील कार्यालयात आयोजित केलेल्या बैठकीत दिल्या. यावेळी तहसिलदार सुरेश शेजुळ, निवासी नायब तहसीलदार अमोल कदम, कुलकर्णी यांच्यासह तालुक्यातील महा ई सेवा केंद्र चालक उपस्थित होते. जातीच्या दाखल्याबाबत बोलताना पांगारकर म्हणाल्या, प्रस्ताव दाखल करून घेतानाच मानवी दिनाकांचा पुरावा बघूनच प्रस्ताव घ्या, सर्व पुरावे तालुक्यातील असतील त्यास रहिवास पुरावा आवश्यक नाही परंतु काही पुरावे इतर तालुक्यातील असतील त्यास रहिवास पुरावा आवश्यक आहे.चुकीचे दाखले दाखल करू नका, शासनाने ठरवून दिलेल्या आकारणी प्रमाणेच पैसे घ्या, केंद्रात येणाऱ्या प्रत्येकाची नोंद ठेवा. अर्ज सादर करताना ग्राहकांचा मोबाईल नंबर नोंद करा. केंद्रात रेट कार्ड दर्शनी भागात लावा यासह सूचना देऊन ग्राहकांची तक्रार आल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही कारवाई करणार असे स्पष्ट केले. यावेळी महा ई-सेवा केंद्राच्या वतीने कमिशनमध्ये वाढ व्हावी, केंद्र चालकाच्या मृत्यू नंतर वारसा ना केंद्र मिळावे आदी मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी केंद्र चालक नवनाथ वळकुंदे, अविनाश चक्रे, अशोक सिदवाडकर, प्रशांत सावंत उपस्थित होते.




### शिवाजी महाविद्यालयात ३४ जणांचे रक्तदान

**बार्शी, दि.२५ जानेवारी-**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात संस्थापक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय छात्र सेना विभागाच्यावतीने हिमोग्लोबिन तपासणी आणि रक्तदान शिबिरात ३४ जणांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. अब्दुल शेख, नॅक समन्वयक डॉ. समाधान पवार, विज्ञान शाखा समन्वयक डॉ. रामेश्वर कोठावळे, एनसीसी विभागप्रमुख डॉ. अशोक अनमुलवार, एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. दामाजी भिसे, प्रा. मनोज चिकराम, प्रा.समाधान लोंढे आदी उपस्थित होते.



### बरुर येथे १४४ बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी

**मंद्रुप, दि.२४ जानेवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बरुर येथे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ योजनेअंतर्गत १४४ बांधकाम कामगारांची आरोग्य तपासणी करण्यात आली. जनआरोग्य सेवा लॅब यांच्या वतीने आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी लॅबचे प्रमुख संध्या जाधव यांच्या टिमने आरोग्य तपासणी केली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते श्रीमंत डोमनाळे यांनी कामगारांच्या आरोग्य तपासणीसाठी मेहनत घेतली. यावेळी बरुर ग्रामपंचायतच्या सरपंच शोभा टेळे, उपसरपंच तम्माराया मकणापुरे, मल्लिकार्जून केरूर, गंगाधर डोमनाळे, हसीना पठाण, संकल्पना रगटे, स्वाती वाघमोडे, मडोळया स्वामी, शेखर स्वामी, रेणूका भासगी, हसिना मकानदार, डॉ. मेघना जाधव उपस्थित होत्या.



### नातेपुते येथील लोकमंगल पतसंस्थेत हळदी- कुंकू कार्यक्रम

**नातेपुते, दि. २४ जानेवारी-**

लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सोलापूर शाखा नातेपुते येथे मकर संक्रांती निमित्त हळदी-कुंकू कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी डॉ. कवितके, डॉ. व्होरा, योगा शिक्षिका उपस्थित होत्या यावेळी डॉ. कवितके डॉ. व्होरा यांनी व्यवसायाबाबत व महिलांनी स्वतःचे आरोग्य कसे सांभाळावे, याबाबत मार्गदर्शन केले.

## रखडलेल्या कामामुळे महाळुंग महामार्ग बनला धोकादायक

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.२४ जानेवारी-**

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज या राष्ट्रीय पालखी महामार्गीचे काम सध्या पूर्णत्वास जात आहे. हा महामार्ग माळीनगर वरून येवून तोंडले बोंडले येथे मिळतो. सध्या महामार्गाची किरकोळ कामे वगळता महामार्ग वा वाहतुकीसाठी खुला असल्याने ऊस वाहतुक करणारी तसेच माल ट्रक, कन्टेनर या सारखी अवजड वाहतूक करणाऱ्या वाहनांची मोठ्या प्रमाणावर वाहतुक होत आहे.

हा महामार्ग महाळूंग गावा जवळून गेला आहे. परंतू रेडे वस्ती व डांगे वस्ती या ठीकाणी महामार्गाचे काम तक्रारी मुळे रखडले आहे. या ठिकाणापासूनच महाळुंग, पंचवीस चार या ठीकाणी जाण्यासाठी सर्व्हिस रोड तयार होत आहेत. महामार्गावरून येणारी वाहने भरधाव वेगाने येतात



महाळुंग येथील धोकादायक अवस्थेतील राष्ट्रीय महामार्ग.

नेमक्या डांगे वस्ती व रेडे वस्ती नजीक रस्याचे काम रखडले असल्याने हा परिसर अपघात क्षेत्र बनला आहे. यात जास्त कुचंबणा शालेय विद्यार्थ्यांची होत आहे कारण या ठीकाणा वरून सदाशिवराव माने विद्यालय (अकलूज) , मुंडफणे वस्ती जि. प. शाळा, महाळुंग जि.प.शाळा, या शाळेतील विद्यार्थ्याना घरी जाण्यासाठी मध्यवर्ती ठीकाण असल्याने स्कूल बस येथेच थांबतात त्यामुळे विद्यार्थ्यांना महामार्ग पास करून सर्व्हिस रोड वरून घरी जावे लागत आहे.

रस्त्याचे रखडलेले काम त्यामुळे अवजड वाहनांची होणारी एकेरी वाहतुक, सर्व्हीस रोड वर उतरणारी वाहने यातून विद्यार्थ्यांना रस्ता पास करावा लागत आहे. त्यामुळे अनेकदा अपघात होण्याचे प्रसंग उद्भवत आहेत. प्रशासनाने यावर त्वरीत तोडगा काढून तक्रारदारांचे निराकरण करून एखादी अप्रीय घटना घडण्यापूर्वी हा मार्ग लवकरात लवकर करावा व विद्यार्थ्यां व नागरिकांना दिलासा मिळवून द्यावा, अशी पालकांची मागणी आहे.

> **विद्यार्थ्यांना थांबण्याची व्यवस्था करावी**
>
> डांगे वस्ती व रेडे वस्ती येथे महामार्गाचे काम रखडले आहे. यामुळे विद्यार्थ्यांसाठी हे धोकादायक ठरत आहे. कारण एकेरी वाहतूक तसेक दिशा दर्शक फलक नसल्याने व वाहनांना गती असल्याने महामार्ग पास करताना मुलांना जीव मुठीत धरून यावे लागते. त्यामुळे अपघात होता-होता वाचले आहेत. तरी प्रशासनाने रस्त्याचे काम होई पर्यंत विद्यार्थ्यांना थांबण्यासाठी शेडची व्यवस्था करावी, कारण लहान मुले रस्त्यावर कोठे थांबणार?
>
> **- प्रवीण रेडे-पाटील**, रेडे वस्ती महाळुंग

## बार्शीत आजपासून मोफत आरोग्य शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २४ जानेवारी-**


कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंती निमित्त मोफत राज्यस्तरीय फिजोओथेरपी आरोग्य शिबीर आयोजन करण्यात येत आहे,सोलापूर जिल्हयात असे शिबिर प्रथमच होत आहे.

शिबिरामध्ये ऑपरेशन नंतरचे व्यायामोपचार, हातापायाला मुंग्या येणे, शीयटिका, स्पॉन्डिलेसिस, अर्धांगवायू, चेहऱ्याचा अर्धांगवायु, सेरेबल पाल्सी, पार्कीगसन्स, पोलीओ, नस्कुलर डिस्ट्रॉफी, जी. बीएससीटीइव्हीटी, एचआरटी. के. आर.ए.सी. एल.पी.सी.एल, आरइएचएबी इत्यादी.,मानेचे आजार, मणक्याचे आजार,त्यांना ट्रेक्शन, मसल स्टीम्युलेटर,पराफीन वॅक्स अशा विविध उपचार पध्दतीने तपासणी करण्यात येणार आहे. हे शिबीर जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये २५ जानेवारी व २६ जानेवारी रोजी सकाळी १० ते ६ या वेळेत होणार आहे.या शिबीरामध्ये तज्ञ डॉक्टर्स डॉ. दीपा बासुंदे, डॉ. ऋषिकेश पोळ, डॉ. सौरभ झा, डॉ. शेख इर्शाद, डॉ.समृद्धी देशपांडे हे मोफत तपासण्या करणार आहेत. जास्तीत जास्त इच्छुकांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. इर्शाद शेख व डॉ समृद्धी देशपांडे यांनी केले आहे.

## श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराजांचा पादुका दर्शन सोहळा सोमवारी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२४ जानेवारी-**

अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज (नाणीजधाम) यांचा पादुका दर्शन सोहळा सोलापूर जिल्हा सेवा समिती अंतर्गत करमाळा तालुका यांच्यावतीने यशवंतराव चव्हाण महाविद्यालय प्रांगण, (वायसीएम कॉलेज, करमाळा जि.सोलापूर) येथे आयोजित करण्यात आला आहे.



त्यापूर्वी अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज (नाणीजधाम) यांच्या पादुकांची सकाळी ९ वाजता शहरात मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर पादुकांचे संतपीठावर आगमन होणार आहे. या निमित्ताने निराधार व गरीब २७ महिलांना शिलाई मशिन वाटप करण्यात येणार आहे. गुरुपूजन, आरतीपूजन, प्रवचन, उपासक दिक्षा, दर्शन, पुष्पवृष्टी असे कार्यक्रम दिवसभर होणार आहेत. यानिमित्ताने भाविकांना महाप्रसाद वाटप केला जाणार आहे. संस्थानच्या वतीने ४ जानेवारी ते १९ जानेवारी पर्यंत एक लाख रक्तदानाचा संकल्प होता विक्रमी १ लाख ३६ हजार २७० बाटल्या रक्त संकलित करुन ते गोरगरिब रुग्णांना देण्यात आले. असे विविध उपक्रम संस्थानच्या वतीने राबविले जात असल्याचे जिल्हा स्व-स्वरुप संप्रदायाच्या वतीने सांगण्यात आले आहे. भाविकांनी सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सोलापूर जिल्हा अध्यक्ष आबासाहेब शिंदे जिल्हा सचिव मारुती भोसले, जिल्हा निरीक्षक सचिन काकडे, अध्यक्ष सविता परांडे, देविदास ननवरे, जिल्हा कर्नल अशोक केळकर, श्रीकृष्ण चोरमले, रोहिणी सरडे, संतोष हंडाळ यांच्यावतीने करण्यात आले आहे.



## ओंकार पोळच्या मारेकऱ्यांना फाशी द्या

### जेऊर येथे वाढदिवसानिमित्त आठवणींना उजाळा देत मित्रांनी केले वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२४ जानेवारी**

बारामती येथे झालेल्या खुन प्रकरणातील जेऊर येथील ओंकार पोळच्या मारेकऱ्यांना तातडीने फाशीची शिक्षा देण्याची मागणी त्याच्या मित्रांकडून करण्यात येत आहे बारामतीच्या कॉलेजच्या आवारात झालेल्या खुन प्रकरणातील मृत्यू झालेल्या ओंकार पोळच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करूनही त्याच्या आठवणी जपण्याचा जेऊर येथिल त्याच्या युवक मित्रांनी एकत्र येऊन उपक्रम केला यावेळी ओंकार पोळच्या मारेकऱ्यांना तातडीने फाशीची शिक्षा देण्याची मुख्यमंत्र्याकडे करणार मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जेऊर (ता. करमाळा) येथील ओंकार संतोष पोळ या बारावीमध्ये बारामती येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यावर शाळेच्या आवारातच धारधार शस्त्राने हल्ला करून त्याचा खुन करण्यात आला होता.या घटनेमुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली होती. अद्यापही पोळ परिवार या दु:खातून सावरलेला नाही.२१ जानवारी दिवशी ओंकारचा वाढदिवस असल्याने या दिवशी त्याच्या सर्व मित्रांनी एकत्र येऊन त्याच्या आईवडिलांची भेट घेतली ओंकारची आठवण जपण्यासाठी त्याच्या वाढदिवसाच्या दिवशी दोन वृक्षांची लागवड करत त्याच्या आठवणी जपण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यावेळी ओंकारच्या खुनाचा हा खटला जलदगती न्यायालयात चालवून त्यांच्या मारेकऱ्यांना तातडीने फाशीची शिक्षा देण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे करणार असल्याचे त्यांनी सांगितले यावेळी प्रतिक जाधव, महावीर लवळे, श्रीनाथ जाडकर, प्रदिप पोळ आर्यन पवळ, गौरव पवार, धीरज शर्मा, सुरज शर्मा, वैभव शिरसागर,मंथन मोहीते, आनंद कदम, समर्थ पोळ, संदीप पोळ यांच्यासह त्याचा सर्व मित्रपरिवार उपस्थित होता.

## पिलीव ग्रामोस्व २०२५ निमित्त विविध कार्यक्रम

**पिलीव दि २४ जानेवारी -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पिलीव ग्रामोत्सव समीती व शाळा व्यवस्थापन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सर्व कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. यामध्ये २४ जानेवारी रोजी सकाळी ६ वाजता महिलांच्या व मुलींच्या मॅरेथॉन स्पर्धा संपन्न झाल्या आहेत.याच दिवशी सकाळी दहा वाजलेपासुन संध्याकाळी पाच वाजेपर्यंत महिलांच्या व मुलींच्या फनी गेमसचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच पाककृती व रांगोळी स्पर्धेने होणार आहे. २५ जानेवारी रोजी सकाळी सहा वाजता पुरुष, शालेय विदयार्थी व खुला गट पुरुष यांच्या मॅरेथॉन स्पर्धा एसटी स्टँडवरील चौकातून होणार आहेत. जास्तीत जास्त स्पर्धकांनी कार्यक्रमात सहभागी होणयाचे आवाहन पिलीव ग्रामोत्सव व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



## वटवृक्ष मंदिर समितीचे कार्य स्वागतार्ह : हभप गहिनीनाथ महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २४ जानेवारी-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात स्थानिक स्वामी भक्तांकरिता सकाळी ६ ते ९ या वेळेत स्वामींच्या दर्शनाकरिता विशेष नियोजन करण्यात आलेले आहे. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान विश्वस्त समितीचे स्थानिक भाविकांना दर्शनासाठी करण्यात आलेले हे नियोजन म्हणजे मंदिर समितीचे कार्य स्वागतार्ह असल्याचे मनोगत पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान समितीचे सहअध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांचा कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान केला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी हभप आबा महाराज कुरनूरकर, पत्रकार मारुती बावडे, प्रशांत गुरव, मोहन चव्हाण, श्रीकांत मलवे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, शिवशरण अचलेर, अमर पाटील, सागर गोंडाळ, खाजप्पा झंपले, श्रीकांत मलवे, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, तुषार मोरे उपस्थित होते.



## आरोग्य शिबिरात २०० विमा कामगारांची तपासणी

**बार्शी, दि. २४ जानेवारी-**

प्रभारी वैद्यकीय अधिकारी, राज्य कामगार विमा योजना, सेवा दवाखाना बार्शीमार्फत राज्य शासनाने घोषित केलेले १०० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत आरोग्य जनजागृती, तपासणी व उपचार शिबीर श्रीराम फिलामेंट इंडस्ट्रीज लि. बार्शी येथे विमा कामगाराकरिता आयोजित केले.

यामध्ये विमाधारकांना राज्य कामगार विमा योजना याबाबतची संपूर्ण माहिती देऊन ही योजना कशा पद्धतीने कामगारांच्या फायद्याची आहे. यामधे ज्या कामगारांची विमा कार्ड नोंदणी झालेली आहे त्यांना सर्व उपचार या योजनेतील रुग्णालय तसेच योजनेशी संलग्न रुग्णालयात मोफत केले जातात व अत्यावश्यक उपचाराचा खर्च शासन नियमाप्रमाणे परत केला जातो, याबाबत माहिती देण्यात आली. या योजनेअंतर्गत संलग्न (टायअप) रुग्णालयामध्ये होणाऱ्या कॅशलेस उपचाराबाबतची माहिती विमा कामगारांना देण्यात आली.

या आरोग्य शिबिरात २०० विमा कामगारांची आरोग्य तपासणी व औषधोपचार करण्यात आले. शिबिराकरिता राज्य कामगार विमा योजनेतील डॉ. स्वाती सुर्वे, सीएचओ डॉ. ज्ञानेश्वर नागरगोजे, अबुजर मुल्ला, अंकुश कोळेकर यांनी काम पाहिले. तसेच श्रीराम फिलामेंटमधील दीपक पाटील, गणेश उमाप यांचे सहकार्य लाभले.

## रस्त्यात गेलेल्या जमिनीचा मोबदला द्या

### वाणीचिंचाळे येथील शेतकऱ्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२४ जानेवारी-**

जत-मंगळवेढा राज्यमार्ग नं.१५६ साठी वाणीचिंचाळे (ता. सांगोला) येथील शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन न करता व कोणत्याही प्रकारचा मोबदला न देता खासगी मिळकतीवर कब्जा करून जबरदस्तीने त्या ठिकाणी रस्ता बनवण्याचे काम सुरू असून वाणीचिंचाळे हद्दीतील भुसंपादन न झालेले शेतकऱ्यांची जमीन भुसंपादित करून नुकसान भरपाई देण्यात यावे अन्यथा सदरचे काम बंद करून संबंधित विभागाच्या विरोधात तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल, असा इशारा रस्त्यालगत असलेल्या ४४ शेतकऱ्यांनी दिला आहे. निवेदन जिल्हाधिकारी यासह माहितीस्तव सार्व. बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, आ.बाबासाहेब देशमुख, आ.समाधान आवताडे, आ.गोपीचंद पडळकर, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना देण्यात आले आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात जत-मंगळवेढा राज्य महामार्ग नं.१५६ या रस्त्याचे काम सध्या सुरू आहे. सदर रस्त्याच्या कामाच्या संदर्भात वाणीचिंचाळे हद्दीतील शेतकरी यांना पूर्व सुचना न देता त्यांनी रस्त्याचे काम सुरू केले आहे. तरी रस्त्याचे मोजमाप करून सन १९७२ सालापासून वापरत असलेल्या रस्त्याचे भुसंपादन करून भूखंडाचे व्याजासहित रक्कम शेतकऱ्यांना देण्यात यावी अन्यथा तीव्र स्वरूपाच्या आंदोलन करण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे.




> हा रस्ता तयार करताना शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची नोटीस अथवा सुचना दिली नाही. तसेच रस्ता रुंदीकरण करताना शेतकऱ्याच्या हद्दीत रस्ता तयार करण्यात येत आहे. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. तसेच जुना रस्ता ३३ फुट असताना नवीन मनमानी पद्धतीने शेतकऱ्यांच्या शेतात तयार करत आहेत. यासाठी शासनाने आमची जमीन भुसंपादीत करून आम्हाला मोबादला देऊनच रस्त्याची रुंदी वाढवावी अन्यथा आम्हाला कायदेशीर मार्गाने आंदोलन करावे लागेल.
>
> **- राजेंद्र पाटील (बाधीत शेतकरी)**

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तेर येथे उखाणे स्पर्धाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२४ जानेवारी -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी मकर संक्रांतीनिम्मिताने महिलांसाठी हळदी कुंकू तिळगुळ समारंभ आयोजित करण्यात आला आहे

धाराशिव तालुक्यातील तेर येथे माजी गृहमंत्री डॉ पद्मसिंह पाटील यांच्या निवासस्थानी आज ( शनिवारी) महिलांसाठी अर्चनाताई पाटील यांनी सालाबादप्रमाणे याही वर्षी मकर संक्रांतीनिम्मिताने महिलांसाठी हळदी कुंकू तिळगुळ समारंभ आयोजित करण्यात




आला.

यावेळी त्यांनी उखाणे स्पर्धाचे आयोजन केले असून विजेत्या महिलांसाठी पैठणी व आकर्षक बक्षीसे देण्यात येणार आहेत हा कार्यक्रम शनिवारी २५ जानेवारी रोजी सायंकाळी ५. वाजता होणार असून मा कार्यक्रमासाठी सर्वा महिलांनी उपस्थित राहावे असे आवाहन अर्चनाताई पाटील यांनी केले आहे



## संक्षिप्त वृत्त...



### केशेगाव शाळेस स्पिकर संच भेट

**इटकळ, दि.२४ जानेवारी-**

तुळजापुर तालुक्यातील केशेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस शाळा व्यवस्थान समिती व सेवानिवृत्त प्राचार्य संगमेश्वर जळकोटे यांनी स्पीकर संच भेट देऊन शाळा विकासात्मक बाबीस चालना दिली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस स्पीकर संच नसल्याची समस्या लक्षात घेऊन शाळा समिती व सेवानिवृत्त प्राचार्य यांनी जी शाळेस मदत केली ती कौतुकास्पद असल्याचे मत मुख्याध्यापक प्रकाश कांबळे यांनी यावेळी बोलताना सांगितले व आभार मानले.

### राष्ट्रीय मतदार दिन : शपथ कार्यक्रम

**धाराशिव, दि.२४ जानेवारी-**

१५ वा राष्ट्रीय मतदार दिवस जिल्हास्तरावर,तालुका,मतदान केंद्रस्तरावर साजरा करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने राष्ट्रीय मतदार दिवसासाठी Nothing like voting, I Vote for sure (Theme) आयोगाकडून देण्यात आला आहे. जिल्हास्तरावर १५ वा राष्ट्रीय मतदार दिवस २५ जानेवारी रोजी छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तांबरी विभाग, धाराशिव या ठिकाणी सकाळी १० वाजता साजरा करण्यात येणार आहे. २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदार जनजागृती फेरी सकाळी ८.३० वाजता छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पोस्ट कार्यालय मार्ग छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे समारोप होणार आहे. छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,धाराशिव या ठिकाणी लोकशाहीवर निष्ठा ठेवण्याची शपथ घेण्याचा कार्यक्रम घेण्यात येणार आहे.



### बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

**नळदुर्ग, दि.२४ जानेवारी-**

नळदुर्ग येथे दि. २३ जानेवारी रोजी हिंदुह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची ९७ वी जयंती शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके यांच्यासह शहर शिवसेनेच्या वतीने साजरी करण्यात आली. नळदुर्ग येथील राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात झालेल्या कार्यक्रमात सेवानिवृत्त शिक्षक बाबुराव पोतदार यांच्या हस्ते हिंदुह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके, पत्रकार विलास येडगे, शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे, भगवंत सुरवसे, शहर शिवसेना प्रमुख शिवाजी सुरवसे, उपशहरप्रमुख दीपक घोडके, अफजल कुरेशी, शहर संघटक गौस कुरेशी, जेष्ठ शिवसैनिक मनोज मिश्रा, बंडप्पा कसेकर बाबु गायकवाड, व नळदुर्ग शहर चर्मकार चर्मकार संघटनेचे अध्यक्ष शंकर वाघमारे आदिजण उपस्थित होते.

### शिक्षकांना मिळणार निवडश्रेणी

**धाराशिव, दि.२४ जानेवारी -**

जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक शिक्षक आणि माध्यमिक शिक्षकांना निवडश्रेणी देण्यासाठी सर्व गटशिक्षणाधिकारी यांना याबाबतचा प्रस्ताव शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद धाराशिव येथे सादर करणेबाबत कळविले होते.तसेच शिक्षकांनी सुद्धा गटशिक्षणाधिकारी कार्यालयास प्रस्ताव सादर केलेले आहेत.निवड श्रेणी देण्यासाठी शिक्षकांना एकाच पदावर २४ वर्षे सेवा आवश्यक करण्यात आलेली आहे. याबाबतची यादी तालुकास्तरावर निवड श्रेणीसाठीचे ऑनलाईन सेवाअंतर्गत प्रशिक्षण आवश्यक आहे.पात्र दिनांकापूर्वीचे सलग तीन वर्षाचे गोपनीय अहवाल आवश्यक आहे व उच्च अहर्ता प्राप्त असणारे प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची तात्पुरती स्वरुपात यादी तपासून प्रसिद्ध स्तरावर तसेच जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. याबाबत शिक्षकांच्या काही हरकती, मुद्दे, दावे असतील तर संबंधित तालुका गटशिक्षणाधिकारी यांचेकडे ७ फेब्रुवारीपर्यंत लेखी स्वरुपात पुराव्यासह सादर करावेत. असे जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) अशोक पाटील यांनी कळविले आहे.

### सुभाषचंद्र बोस यांना अभिवादन

**धाराशिव, दि.२४ जानेवारी -**

हौशी छंदी गायकांचा समुह मेलडी स्टार्स समुहाच्या वतीने जयहिंद आझाद सेनेचे प्रणेते नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंती दिनी अभिवादन करण्यात आले. समन्वयक शरद वड गाकर, विधिज्ञ दिपक पाटील, संस्कार भारती जिल्हाध्यक्ष श्यामसुंदर भन्साळी, अनिल मालखरे आदी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पुजन करण्यात आले. नळे यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा स्वातंत्र्य लढ्यातील जीवनपट उलघटडला. या अभिवादन प्रसंगी क्षितीजा निंबाळकर, तौफिक शेख, नितीन बनसोडे, अतुल कुलकर्णी, सुजीत अंबुरे, सुर्यकांत कारंडे, वर्षा नळे,सौ. तारा मोरे, सुनिता माने, सुलक्षणा टिळक, विधिज्ञ विद्युलता शिरिष दलभंजन, अक्षय भन्साळी, महेश उंबर्गीकर, मुनीर शेख, मारुती लोंढे उपस्थित होते.

## पतीच्या हल्ल्यात पत्नी गंभीर जखमी; सत्र न्यायालयाने आरोपीला १० वर्षांची सक्तमजुरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ जानेवारी -**

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेतल्यामुळे रागाच्या भरात पत्नीवर जीवघेणा हल्ला करणाऱ्या याला सत्र न्यायालयाने १० वर्षांची सक्तमजुरी आणि दंडाची शिक्षा सुनावली आहे. सत्र न्यायाधीश आर. एस. गुप्ता यांच्या न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली.




१ सप्टेंबर २०२१ रोजी नरसिंग चव्हाण हा त्याच्या पत्नीसोबत शेतात उडीद-मुग काढण्याचे काम करत असताना पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत तिच्याशी भांडण केले. संतापाच्या भरात नरसिंग गोरोबा चव्हाण (रा.कोंड, ता.जि.धाराशिव) काठी आणि लोखंडी विळ्याने पत्नीवर हल्ला केला. या हल्ल्यात महिलेला डोक्यावर, चेहऱ्यावर, डोळ्यांच्या आसपास गंभीर दुखापत झाली. तिचे दात पडले, डावा हात फॅक्चर झाला, तसेच चेहऱ्यावर गंभीर जखमा झाल्या.

हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. मात्र, शेजारील शेतकऱ्यांनी जखमी महिलेला तातडीने रुग्णालयात दाखल केले. फिर्याद व गुन्हा नोंदणी: जखमी महिलेच्या मुलाने, सचिन नरसिंग चव्हाण यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ढोकी पोलीस ठाण्यात नरसिंग चव्हाण याच्या विरोधात भारतीय दंड विधानाच्या कलम ३०७ (हत्या करण्याचा प्रयत्न), ३२६, ५०४ आणि ५०६ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला.

सरकार पक्षातर्फे एकूण ११ साक्षीदार तपासण्यात आले. अतिरिक्त शासकीय अभियोक्ता सचिन एस. सूर्यवंशी यांनी साक्षी-पुरावे सादर करत आरोपीविरुद्ध दोष सिद्ध केला.

सत्र न्यायालयाने नरसिंग चव्हाण याला १० वर्षांची सक्तमजुरी आणि ५० हजार रुपयांचा दंड (कलम ३०७ अंतर्गत), तसेच कलम ५०४ व ५०६ अंतर्गत प्रत्येकी २,५०० रुपयांचा दंड ठोठावला. या प्रकरणात महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल एस. व्ही. दसवंत आणि पोलीस कॉन्स्टेबल एस. एन. शेळके यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. सरकार पक्षाचा युक्तिवाद यशस्वी ठरला. अतिरिक्त सरकारी वकील सचिन एस.सूर्यवंशी यांनी या प्रकरणात साक्षी-पुरावे प्रभावीपणे सादर करून आरोपीविरुद्ध ठोस भूमिका मांडली. न्यायालयाने साक्षी-पुरावे ग्राह्य धरत आरोपीला शिक्षेस दोषी ठरवत शिक्षा सुनावली.

## ३५ वर्षापासून बंद असलेला गोमुख तीर्थकुंडातील नैसर्गिक झरा पुन्हा सुरु

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ जानेवारी -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीच्या मंदिर आणि शहर विकास कामे चालू असताना ३५ वर्षापासून बंद असलेला गोमुख तीर्थकुंडातील नैसर्गिक झरा पुन्हा नव्याने चालू झाला आहे.



तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने सध्या तुळजाभवानी मंदीर आणि परिसरातील विविध विकासकामे सुरू आहेत. त्यापैकीच एक असलेल्या श्री गोमुख तीर्थकुंडाचे काम सुरू असून श्री गोमुख तीर्थकुंडाला पुरातन रूप देण्यात येत आहे. तीर्थकुंडाचे काम सुरू असताना १९८८ पासून बंद असलेला नैसर्गिक झरा पुन्हा नव्याने सुरू झाला आहे. ३५ वर्षापासून हा झरा बंद होता.

पाण्यातील क्षारामुळे झऱ्याचा नैसर्गीक मार्ग बंद झाला होता तसेच झऱ्याच्या मार्गात १९८६ सालची नाणी आढळून आली आहेत. झऱ्याच्या मार्गातील क्षार आणि आसपासचा थर काढण्यात आला आहे तसेच झऱ्याच्या मार्गातील जुनी नाणी काढण्यात आल्यानंतर ३५ वर्षापासून बंद असलेला झरा पुन्हा एकदा नव्याने सुरू झाला आहे. त्यामुळे श्री तुळजाभवानी देवींच्या भक्तामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

## पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ जानेवारी -**



७६ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी २०२५ रोजी पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या शुभहस्ते मुख्य ध्वजारोहण सकाळी ९ .१५ वाजता धाराशिव येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदान क्र.१ येथे करण्यात येणार आहे.

कार्यक्रमासाठी प्रशासनाने सर्व तयारी केली आहे. या कार्यक्रमाला नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबसे यांनी केले आहे.




**धाराशिव :** २५ जानेवारी या राष्ट्रीय मतदार दिवसानिमिताने आज २४ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी उपस्थितांना राष्ट्रीय मतदार दिवसाची प्रतिज्ञा दिली. यावेळी प्रभारी अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव. निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव. उपजिल्हाधिकारी संतोष भोर. जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे तसेच विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हळदी कुंकू, बालआनंद, माता-पालक मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**मंगरुळ, दि.२४ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळा मंगरूळ येथे २२ जानेवारी रोजी बालआनंद मेळावा व माता पालक यांच्यासाठी हळदी कुंक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

विद्यार्थ्यांनी घरी बनवून आणलेले खाद्यपदार्थ, शेतात पिकवलेल्या भाज्या, सौंदर्यप्रसाधने व स्टेशनरी साहित्याची हजारो रुपयांची विक्री झाली.

यावेळी उपस्थित महिला मातांचा मकर संक्रांतीनिमित्त हळदी कुंकू लावून शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. त्यांच्या विविध स्पर्धाही घेण्यात आल्या.

या कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच विजयालक्ष्मी डोंगरे व उपस्थित माता पालक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष सर्व सदस्य तसेच शाळेतील माता पालक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक उंबरकर यांनी, सूत्रसंचालन खाडे तर आभार वाघमोडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील श्रीमती मोरे, कोळसुरे, शिवकर, शिनगारे, बागवान, सुरवसे, इंगळे यांनी परिश्रम घेतले.



## विटंबना करणाऱ्यावर कारवाईची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ जानेवारी -**

भालकी येथे झालेल्या जगज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या पुतळ्याच्या विटंबनाच्या निषेधार्थ दि. २४ जानेवारी रोजी नळदुर्ग येथे नळदुर्ग शहर वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने पोलिस ठाण्यावर मुकमोर्चा काढुन विटंबना करण्याऱ्या माथेफिरुंवर कडक कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या मोर्चामध्ये माजी नगरसेवक संजय बताले, बसवराज धरणे, दत्तात्रय कोरे, विनायक अहंकारी, मल्लीनाथ माळगे, काशिनाथ स्वामी, सुभाष कोरे, बंडप्पा कसेकर, संतोष वाले, संतोष पाटील, सामाजिक कार्यकर्ते संजय विठ्ठल जाधव, रविराज कलशेट्टी, राजेंद्र तोग्गी, शिवाजी मुळे, राजकुमार खद्दे, राचप्पा जिडगे, शिवशंकर स्वामी, रोहीत शंकरशेट्टी, गणेश मुळे, उमाकांत गोगावे, मल्लिनाथ शिरगुरे, चंदर सगरे, ऋतुराज मठपती, ओंकार शिरगुरे, प्रशांत शहाणे, रोहीत वाले, शिवय्या स्वामी, संजय रड्डे, शिवानंद माळगे, यांच्यासह वीरशैव लिंगायत समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## पालक सचिव अंशू सिन्हा यांची सावरगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ जानेवारी -**

जिल्ह्याच्या पालक सचिव अंशू सिन्हा यांनी आज २३ जानेवारी रोजी तुळजापूर तालुक्यातील सावरगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष, उपमुख्य कार्यकारी अधिकारी शाम गोडभरले, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.कोरे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अन्सारी तसेच प्रा.आ.केंद्र सावरगाव येथील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी वृंद उपस्थित होते.



सिन्हा यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रात दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवाची पाहणी केली. यावेळी त्यांनी बाह्यरुग्ण विभाग,आंतर रुग्ण विभाग, प्रसुती गृह, शस्त्रक्रियागृह,प्रयोगशाळा विभाग,नेत्ररोग विभाग,असंसर्गजन्य रोग विभाग, लसकिरण विभाग, औषधी भांडार, अभिलेखा कक्ष इत्यादीची पाहणी केली. प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णास देण्यात येत असलेल्या सेवाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.काही सुधारणा करण्याबाबतही सुचना केल्या. पालक सचिवांच्या भेटीप्रसंगी जिल्हा आयुष अधिकारी डॉ.गजानन परळीकर, आयुष जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक विकास पवार आदी उपस्थित होते

## महिलांचे सक्षमीकरण करणारी ‘मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना’

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना ही महाराष्ट्र राज्य सरकारने महिलांच्या सक्षमीकरणासाठी सुरु केलेली एक महत्त्वपूर्ण योजना आहे.या योजनेचा मुख्य उद्देश राज्यातील महिलांना आर्थिक सहाय्य देणे,त्यांना शिक्षण व इतर सामाजिक क्षेत्रांमध्ये अधिक सक्रिय करणे आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करणे हा आहे.मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना २०१९ मध्ये लागू करण्यात आली,आणि तिच्या माध्यमातून महिलांना शालेय शिक्षण,उच्च शिक्षण,विवाह आणि अन्य काही जीवनमूल्यांमध्ये सहाय्य मिळविण्याची संधी प्रदान केली जात आहे.

या योजनेचा उद्देश महिला बालकांची स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.खासकरून, ज्या मुली गरीब कुटुंबातून येतात आणि त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अशक्य असते,अशा मुलींना शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत करण्याचा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.या योजनेच्या माध्यमातून, शालेय शिक्षण,विज्ञान,तंत्रज्ञान,कला आणि इतर क्षेत्रांमध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. त्याचप्रमाणे,विवाहाची वयाची सीमा पूर्ण करणाऱ्या मुलींना सहाय्य मिळविणे आणि त्यांच्या जीवनात स्थिरता आणणे यासाठी विविध प्रकारच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.



मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेची सर्वात महत्वाची बाब म्हणजे त्याचे अंमलबजावणी करत असताना त्यात सामाजिक समतेचा विचार केला जातो. या योजनेत आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गाच्या मुलींना प्राथमिकता दिली जाते. यामध्ये त्यांना त्यांच्या शिक्षणाच्या खर्चासाठी शिष्यवृत्ती आणि सहकार्य प्रदान केले जाते, ज्यामुळे मुलीला शिक्षणाच्या बाबतीत कधीही आडकाठी येणार नाही.

या योजनेला महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रभावीपणे लागू करण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील महिलांना या योजनेचा विशेष फायदा झाला आहे.योजनेच्या माध्यमातून महिला विकासाच्या क्षेत्रात एक नविन दृष्टिकोन येऊ शकला आहे आणि समाजातील लिंग समतेला चालना मिळाली आहे.

तथापि,या योजनेच्या अंमलबजावणीच्या बाबतीत काही अडचणी आल्या आहेत. काही भागांमध्ये माहितीचा अभाव आहे, आणि योजनेचा लाभ अनेक महिलांपर्यंत पोहोचत नाही.यामुळे प्रशासनाने या योजनेच्या प्रचारासाठी अधिक कार्यक्षमता आणि लक्ष द्यायला हवं.

एकंदरीत,मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना महाराष्ट्रातील महिलांसाठी एक मोठा आणि प्रभावी उपक्रम आहे.यामुळे महिलांचे जीवन अधिक सशक्त आणि सुरक्षित होईल अशी आशा आहे.समाजातील प्रत्येक स्त्रीला समान संधी देण्याचे उद्दीष्ट या योजनेने गाठले आहे,जे महिलांच्या सामाजिक,आर्थिक आणि सांस्कृतिक समृद्धीच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वांतत्र्यासाठी त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भुमिका मजबुत करण्यासाठी १ जुलै २०२४ पासून सूरू करण्यात आलेली आहे.या योजनेंतर्गत १५०० रुपये प्रति महिना प्रमाणे आजतागायत ३ टप्प्यामध्ये लाभार्थी महिलांना लाभ देण्यात आला आहे.जिल्हयात ४ लक्ष ३ हजार ६०० महिला लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.

**- संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय, धाराशिव**

## अभाविप मिशन साहसी कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ जानेवारी -**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद उमरगा शाखेच्या वतीने स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त युवक सप्ताह आयोजन केले होते. शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक व पर्यावरण क्षेत्रात अविरतपणे काम करणारी विद्यार्थी संघटना आहे.

यानिमित्त उमरगा शाखेच्या वतीने आदर्श महाविद्यालय उमरगा येथे मिशन साहसी आयाम ंतर्गत आत्मरक्षा प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. यात विद्यार्थिनींना स्वसंरक्षण प्रशिक्षणाचे धडे देण्यात आले.

यावेळी अभाविप देवगिरी प्रदेश मंत्री वैभवी ढिवरे, प्रमुख अतिथी शरण पाटील, प्राचार्य डॉ. दिलीप गरुड,शहर मंत्री अमृता मुगळे, कार्यक्रम प्रमुख गौरवी कटके आदी कार्यकर्ते व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोयाबीन खरेदी मुदतवाढीसाठी आग्रह, राज्य सरकार सकारात्मक

### केंद्र सरकारकडे होणार पाठपुरावा : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ जानेवारी -**

आत्तापर्यंत नोंदणी केलेल्या एकूण शेतकरी बांधवांपैकी केवळ २१ टक्के शेतकऱ्यांच्या सोयाबीन खरेदीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. राहिलेल्या ७९ टक्के शेतकऱ्यांचे ३१/०१/२०२५ इतक्या कमी कालावधीत खरेदी करणे निव्वळ अशक्य आहे. त्यामुळे सोयाबीन खरेदीला पुन्हा एकदा मुदतवाढ मिळावी यासाठी आपण राज्य सरकारकडे आग्रह केला आहे. राज्यसरकारही याबाबत सकारात्मक असून केंद्र सरकारकडे पाठपुरावा करत असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.



सुरुवातीला आर्द्रता आणि त्यानंतर बारदाण्याच्या तुटवड्यामुळे अनेक शेतकरी बांधवांना हमीभाव खरेदी केंद्रांवर सोयाबीन घालता आलेले नाही. नोंदणीकृत शेतकऱ्यांची एकूण संख्या आणि बाजारात भाव मिळत नसल्याने हमीभाव खरेदी केंद्राकडे वाढलेला शेतकऱ्यांचा कल पाहता, अधिकाधिक सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव योजनेचा लाभ मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी सोयाबीन खरेदीला मुदतवाढ मिळावी यासाठी आपण पाठपुरावा करत होतो व केंद्र सरकारने ३१ जानेवारी पर्यंत मुदतवाढ दिली असली तरी नोंदणी मोठ्या प्रमाणात झाल्याने मुदतीत सर्व नोंदणीकृत मालाची खरेदी करणे अशक्य वाटत असल्याचे आ.पाटील यांनी म्हटले आहे.

धाराशिव जिल्हा आणि परिसरात खरीप हंगामातील नगदी पीक म्हणून सोयाबीनला बहुतांश शेतकऱ्यांची पसंती आहे. त्यामुळे यंदाच्या खरिप हंगामात ४ लाख ६२ हजार ८७२ हेक्टरवर सोयाबीनचा पेरा करण्यात आला होता. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या सोयाबीनला रास्त हमीभाव मिळावा, यासाठी जिल्ह्यात २१ हमीभाव खरेदी केंद्र सुरु करण्यात आले आहेत. सुरुवातीला हवामानातील बदलामुळे अपेक्षित आर्द्रता नसल्याने शेतकरी बांधवांना हमीभाव केंद्रावर सोयाबीन घालण्यासाठी विलंब झाला.

मागील आठवडाभरापासून बहुतांश खरेदी केंद्रांना बारदाण्याची चणचण भासत होती. परिणामी काही केंद्रांवरील खरेदी प्रक्रिया यामुळे ठप्प पडली होती. पाठपुराव्यानंतर बारदाना उपलब्ध झाला आणि खरेदी पूर्ववत सुरू झाली. सोयाबीनला सध्या खुल्या बाजारपेठेत अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी बांधव यंदा मोठ्या संख्येने शासकीय खरेदीकडे वळले आहेत.

जिल्ह्यात ३५ हजार ४०३ शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रांकडे नोंदणी केलेली आहे. त्यापैकी १८ हजार २०९ शेतकऱ्यांना खरेदी केंद्राकडून मेसेज पाठवण्यात आले आहेत. आणि त्यातील ७ हजार ६३९ शेतकऱ्यांच्या १ लाख ९७ हजार १९४ क्विंटल सोयाबीन खरेदीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. नोंदणी केलेल्या संख्येच्या तुलनेत खरेदी झालेली संख्या केवळ २१ टक्क्यांच्या घरात आहे. त्यामुळे उर्वरित कालावधीत राहिलेल्या नोंदणीकृत शेतकरी बांधवांच्या सोयाबीन ३१ जानेवारीपर्यंत सोयाबीन खरेदी प्रक्रिया निव्वळ अशक्य आहे. त्यामुळे खरेदीला पुन्हा एकदा मुदतवाढ मिळावी याकरिता आपण राज्य आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करीत असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

## कृत्रिम रेतन सेवा पुरविणाऱ्या पशुसेवकांना नोंदणी करणे बंधनकारक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ जानेवारी -.**

पशुपालकांना दर्जेदार सेवा मिळावी आणि प्रजनन कार्यक्रम अधिक प्रभावी व्हावा यावर भर देण्यात आला आहे.कृत्रिम रेतन (एआय) तंत्रज्ञ म्हणून नोंदणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या अर्हता,अनुभव व प्रशिक्षण हे भारतीय पशुवैद्यक परिषदेने मान्यता दिलेल्या विद्यापीठातून पशुवैद्यकशास्त्रातील पदवी,भारत सरकारच्या मैत्रीच्या ग्रामीण बहुपयोगी कृत्रित रेतन तंत्रज्ञानचे प्रशिक्षण घेतलेले असावे. पशुसखी म्हणून काम करण्यास तयार असणारी स्त्री ही इयत्ता दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

त्याच्याशी समकक्ष असणारी परीक्षा उत्तीर्ण केली आहे आणि महाराष्ट्र राज्यातील नोंदणीकृत कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्थेमधून कृत्रिम रेतन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे.

जिल्हा पशुसंवर्धन क्षेत्रातील किमान एक वर्षाचा अनुभव आहे किंवा तिने कृत्रिम रेतनाचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे, अशी पशुसखी ही कृत्रिम रेतन (एआय) तंत्रज्ञ म्हणून नोंदणी करण्यासाठी पात्र राहील. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, धाराशिव यांचेकडे तातडीने आपली नोंदणी अवश्यक आहे.

## पालकमंत्री प्रताप सरनाईक २५ व २६ जानेवारी रोजी जिल्ह्यात

### जिल्हा नियोजन समिती बैठक व तुळजापूर देवस्थान विकास आराखड्याच्या सादरीकरणाला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ जानेवारी -**



परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक हे २५ व २६ जानेवारी रोजी दोन दिवस जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत.त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे.२५ जानेवारी रोजी पालकमंत्री श्री.सरनाईक हे मुंबई येथून सकाळी ११ वाजता खाजगी विमानाने धाराशिवकडे प्रयाण करतील. दुपारी १२.४५ वाजता धाराशिव विमानतळ येथे आगमन व दुपारी १२.४५ वाजता विमानतळ येथून शासकीय वाहनाने तुळजापूरकडे प्रयाण करतील.दुपारी १.१५ वाजता तुळजापूर येथे आगमन.दुपारी २.१५ वाजतापर्यंत आई तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतील.दुपारी २.१५ वाजता तुळजापूर येथून धाराशिवकडे प्रयाण करतील.

दुपारी २.३० ते ४.४५ वाजतापर्यंत शासकीय विश्राम गृह शिंगोली येथे आगमन व राखीव. दुपारी ४.४५ वाजता शासकीय विश्रामगृह शिंगोली येथून एसटी बस आगार धाराशिवकडे प्रयाण. सायंकाळी ५ ते ६ वाजता दरम्यान एसटी बस आगार धाराशिव येथे भेट व आढावा बैठक. सायंकाळी ६ वाजता पालकमंत्री कार्यालय येथे पत्रकार परिषद घेतील.

सायंकाळी ६.३० ते रात्री ८ वाजतापर्यंत पालकमंत्री कार्यालय येथे शिवसेना व मित्र पक्षातील पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या भेटीसाठी राखीव व सोयीनुसार शासकीय विश्रामगृह धाराशिव येथे आगमन व मुक्काम.

रविवार २६ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता शासकीय विश्रामगृह शिंगोली येथून पोलीस परेड मैदान पोलीस मुख्यालय धाराशिवकडे प्रयाण.सकाळी ९.१५ ते ९.५० वाजतापर्यंत प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रध्वजवंदना समारंभास उपस्थिती राहतील. सकाळी ९.५० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आयोजित तिरंगा रॅलीच्या स्वागताला उपस्थित राहतील.

सकाळी १०.१५ ते दुपारी १२ वाजतापर्यंत जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे आयोजित जिल्हा नियोजन समिती बैठक व तुळजापूर देवस्थान विकास आराखड्याच्या सादरीकरणाला उपस्थित राहतील. दुपारी १२ ते १२.३० वाजतापर्यंत पालकमंत्री कार्यालय येथे पत्रकार परिषद घेतील. दुपारी १२.३० ते २ वाजतापर्यंत पालकमंत्री कार्यालय येथे अभ्यागतासाठी राखीव.दुपारी २.१० वाजता शासकीय विश्रामगृह शिंगोलीकडे प्रयाण व राखीव.दुपारी २.४५ वाजता शासकीय विश्रामगृह धाराशिव (शिंगोली) येथून धाराशिव विमानतळाकडे प्रयाण.दुपारी ३ वाजता धाराशिव विमानतळ येथून खाजगी विमानाने मुंबईकडे प्रयाण करतील.



## बावी आश्रमशाळेत नेताजी बोस , बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ जानेवारी -**

विद्यानगर बावी येथील वसंत प्राथमिक जवाहर माध्यमिक आश्रम शाळा व जवाहर कनिष्ठ महाविद्यालय विद्यानगर बावी येथे नेताजी सुभाष चंद्र बोस व हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य दयानंद मनोहर राठोड प्रमुख अतिथी पर्यवेक्षक सकाळे बी.एस. देशमुख ऐ.आर. यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात झाली. महापुरुषांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.विनोद राठोड यांनी केले तर पर्यवेक्षक साकळे बी.एस. यांनी आपल्या मनोगतामध्ये दोन्ही महापुरुषाबद्दल सखोल माहिती सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी जाधव एन.बी.यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## एकलव्य विद्या संकुलातील विद्यार्थ्यांचे श्री सिध्दीविनायक ग्रीटेकच्या गुळ पावडर कारखान्यास भेट

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ जानेवारी -**

फक्त पुस्तकापुरते शिक्षण न देता पुस्तकाबाहेरील जग विद्यार्थ्यांना दाखवण्याच्या दृष्टीने एकलव्य विद्या संकुलात पार पडत असलेल्या उपक्रमांतर्गत एकलव्य प्राथमिक शाळेतील इयत्ता सातवी मध्ये शिकत असलेल्या ६१ विद्यार्थ्यांचे देवकुरुळी परिसरात अतिशय समृद्धतेने बहरत असणाऱ्या श्री सिध्दीविनायक ग्रीटेक च्या गुळ पावडर निर्मिती कारखान्यास भेट दिली या भेटीत ४२ मुले १९ मुली आणि पाच शिक्षक कर्मचारी सहभागी झाले होते.

भेटीच्या सुरुवातीस श्री.दिनेश कुलकर्णी यांनी कारखाना निर्मितीचा उद्देश सांगितला, तसेच फॅक्टरीमध्ये ऊस आणल्यापासून ते प्रत्यक्ष उत्पादने तयार होईपर्यंत कोणकोणत्या टप्प्यातून जातो कोणत्या टप्प्यावर उसावर कोणती क्रिया होते याची अत्यंत चांगल्या पद्धतीने माहिती विद्यार्थ्यांना दिले.



त्यानंतर प्रत्यक्ष भेटीदरम्यान उसाची गव्हाण हार्वेस्टरद्वारे कापलेल्या ऊसाला उतरून घेण्याची नवीन पद्धत तसेच शुगर ज्युस वर कोण कोणत्या रसायनांचा कशाप्रकारे परिणाम होतो याचे प्रत्यक्ष त्या ठिकाणी नेऊन माहिती दिली त्यानंतर स्टेनलेस स्टीलचा वापर सेंट्रीफ्यूज मशीनच्या वापराने गुळ पावडर आणि मोलॅसेस कसे वेगळे होते हे पाहिले. प्रत्यक्ष तयार झालेल्या ताजी गुळ पावडर खाण्याचाही विद्यार्थ्यांनी आनंद लुटला. तदनंतर पाणी पुनर्वापर यंत्रना उकळत्या पाण्याला थंड करण्याची पद्धत आणि सर्वात महत्त्वाचे विद्युत निर्मिती कशी होते याची विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष त्या ठिकाणी उपस्थित राहून माहिती घेतली. शेवटी श्री सिध्दीविनायक ग्रीटेक च्या ऑफिस समोर त्यांच्या असलेल्या शंकांचे निरसन करण्यात आले ही क्षेत्र भेट यशस्वी होण्यासाठी श्री सिध्दीविनायक परिवाराचे संस्थापक श्री.दत्ताभाऊ कुलकर्णी प्रत्यक्ष फॅक्टरी मधील मॅनेजमेंट केमिस्ट आणि इतर सर्व कर्मचाऱ्यांचे अतिशय मोलाचे सहकार्य झाले. मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान शिक्षक भडंगे डीपी, शेंडगे, घुगे, देवकर आणि सुजाताताई गणवीर यांनी ही क्षेत्र भेट यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

## विज्ञानामध्ये उपकरणाचे महत्व अनन्यसाधारण : डॉ.प्रशांत दिक्षित





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ जानेवारी -**

आजचे युग हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे असून या तंत्रज्ञानामध्ये उपकरणाचे महत्व अनन्यसाधारण आहे. या उपकरणामुळे आपले जीवन अधिक सुखकारक होते. विद्यार्थ्यांना अश्या उपकरणाची माहिती असणे आवश्यक असून या उपकरणाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांनी नवनवीन संशोधन करावे असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र धाराशिव चे संचालक प्रा.डॉ.प्रशांत दिक्षित यांनी मांडले.

येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात आयोजित इन्स्ट्रुमेंटेशन टेक्निक्स इन लाइफ सायन्स या विषयावर एक दिवसीय आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. अभय शहापूरकर, संस्था सदस्य कमलाकर पाटील, प्रा.डॉ.खोब्रागडे आर.एम, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.प्रशांत चौधरी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय धाराशिव व वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने व प्रधानमंत्री उच्चस्तर शिक्षा अभियान (पीएम उषा) यांच्या सहकार्याने महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाने हि कार्यशाळा आयोजित केली होती.

या कार्यशाळेत डॉ.अभय शहापूरकर यांनी वैद्यकीय क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या उपकरणाची माहिती देऊन मानवाने या उपकरणाच्या सहाय्याने मोठ्या आजारावर मात केली असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. या कार्यशाळेचा समारोप करताना प्रा.डॉ. संजय कोरेकर यांनी अश्या प्रकारच्या कार्यशाळेची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. अश्या कार्याशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण होते व त्यांमधून नवीन शोध लागू शकतात असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना प्रा.डॉ. प्रशांत चौधरी यांनी या कार्यशाळेच्या आयोजानामागाची भूमिका स्पष्ट केली. या कार्यशाळेत डॉ.कट्टी ए.एस., डॉ.सी.एच. गोदाले,प्रा.एस.एम.मोहोळकर उपस्थित होते. या कार्यशाळेत लातूर,सोलापूर,बार्शी, धाराशिव शहरातील एकूण १६० विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. अनिल देवकर यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा.अनिता लिंगे व प्रा.अभय शिंदे यांनी मानले. या कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी प्रा.अनिता लिंगे,प्रा.अभय शिंदे,प्रा.डॉ.रोहिणी यावलकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## तेरणा कॉलेजचे रासेयो शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ जानेवारी -**

जवळे (दुमाला) येथे दि.२२ जानेवारी ते दि.२८ जानेवारी या कालावधीत संपन्न होत आहे. या सात दिवशीय निवासी शिबिरामध्ये संगणक साक्षरता,बालविवाह समस्या, कुपोषण निर्मूलन, कविसंमेलन, बालमजुरी, एड्स, योग-प्राणायाम, ग्राम स्वच्छता, नालेसफाई, वृक्षारोपण, सर्वरोग निदान आरोग्य शिबीर, श्रमदान, व्यसनमुक्ती कार्यक्रम,अंधश्रद्धा निर्मूलन, व्यक्तिमत्व विकास, महिला मेळावा, जलसंवर्धन, शोष खड्डे, गटचर्चा या विषयाच्या अनुषंगाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक घोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शिबिराच्या दुसऱ्या दिवशी दि.२३ रोजी रासेयोच्या स्वयंसेवकांनी परिसरातील स्वच्छता केली. कार्यक्रमासाठी ग्रामस्थ, प्राध्यापक-प्राध्यापिका, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, रासेयोचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ

आर्थिक विकास हा प्रत्येक समाजाच्या समृद्धीसाठी महत्त्वाचा आहे. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाला आर्थिक सहाय्य आणि प्रोत्साहन देण्यासाठी विविध सरकार योजनांची अंमलबजावणी केली जाते.महाराष्ट्र राज्य सरकारने आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ (झएऊ) या उपक्रमाच्या माध्यमातून शेतकरी, महिलां,युवक आणि इतर समाजाच्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सहकार्य करण्यासाठी अनेक योजनांची अंमलबजावणी केली आहे.त्यामध्ये एक महत्त्वाची योजना म्हणजे व्याज परतावा योजना.

**महामंडळाची स्थापना**

आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची स्थापना महाराष्ट्रातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या समाजाच्या लोकांना सहकार्य करण्यासाठी १९८५ मध्ये करण्यात आली. या महामंडळाचे उद्दिष्ट म्हणजे शेतकऱ्यांना, महिलांना,युवकांना आणि इतर दुर्बल वर्गाला आर्थिक साहाय्य पुरवणे, त्यांना व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा त्यांच्या कृषी कामांसाठी कर्ज देणे,आणि त्यावर त्यांना थोडेसे परतावा मिळवून त्यांचे जीवनमान सुधारणे.

**व्याज परतावा योजना : एक परिचय**

व्याज परतावा योजना हे एका प्रकारे सामाजिक समृद्धी साधण्यासाठी असलेले एक महत्त्वपूर्ण साधन आहे. या योजनेअंतर्गत,कर्ज घेतलेल्या व्यक्तींना दिलेल्या कर्जावर व्याजाचा एक भाग




परत केला जातो. विशेषत: महाराष्ट्रातील शेतकरी, महिलां, तरुण व्यापारी आणि लघुउद्योगाच्या क्षेत्रात काम करणाऱ्यांना या योजनेचा फायदा होतो.

व्याज परतावा योजना शेतकऱ्यांना, महिला गटांना आणि इतर आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना कर्जाच्या माध्यमातून त्यांच्या कार्यक्षेत्रात सुधारणा करण्यासाठी एक सशक्त संधी प्रदान करते. कर्ज घेणाऱ्यांना त्याच्यावरची व्याजाची रक्कम कमी होण्यामुळे त्यांना आर्थिकदृष्ट्या बऱ्याच फायदे होतात.

**योजना अंतर्गत लाभ**

१. व्याज परतावा : या योजनेचा सर्वात मोठा लाभ म्हणजे कर्जावर व्याज परत मिळवणे. कर्ज घेणाऱ्यांना अधिक व्याज भरण्याची चिंता न राहता,ते कर्ज सोप्या पद्धतीने फेडू शकतात.

२. वाढीव आर्थिक समर्थन: शेतकऱ्यांना, महिला, आणि लघुउद्योग चालवणाऱ्यांना या योजनेमुळे त्यांच्या व्यवसायाचा विस्तार करणे शक्य होईल. ते अधिक साधनसामग्री विकत घेऊ शकतात,उत्पादन क्षमता वाढवू शकतात, आणि शेती तसेच उद्योगातील उत्पन्नात वृद्धी करू शकतात.

३. वित्तीय साहाय्य : कर्ज घेणाऱ्यांना वित्तीय संस्थांमधून कर्ज मिळवणे अधिक सोपे होईल, कारण सरकार त्यांच्या कर्जावर व्याज परत करणार आहे. यामुळे कर्ज घेणाऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदे होतात.

४. आर्थिक स्थैर्य : व्याज परतावा मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना आणि इतर लाभार्थ्यांना त्यांचे आर्थिक संकट कमी होण्यास मदत मिळते.यामुळे त्यांना त्यांच्या व्यवसायात स्थैर्य साधता येते.

**योजनेअंतर्गत पात्रता**

व्याज परतावा योजनेचा लाभ मिळवण्यासाठी काही निकष आहेत. कर्ज घेणाऱ्याला किमान महाराष्ट्र राज्याचा निवासी असावा लागतो. तसेच, त्याला संबंधित क्षेत्रात कर्ज घेणं आवश्यक आहे.या योजनेचा फायदा घेण्यासाठी कर्जाची रक्कम, कर्जाच्या वापराचा उद्देश आणि इतर निकषांवर आधारित पात्रता तपासली जाते.

**कर्जाच्या वापराचे उद्दिष्ट**

१. शेती आणि कृषी संबंधित कार्य: या योजनेचा मोठा फायदा शेतकऱ्यांना होतो.शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसाठी कर्ज घेता येते,ज्यावर त्यांना व्याज परत मिळते.कर्जाच्या वापराने ते नवीन तंत्रज्ञान,मशिनरी,बियाणे इत्यादी खरेदी करू शकतात.

२. लघुउद्योग आणि स्व-रोजगार: महिलां, युवकां आणि इतर व्यवसायिकांना त्यांच्या उद्योगांसाठी कर्ज दिलं जातं.या योजनेमुळे त्यांना त्यांचे उद्योग सुरू करण्यासाठी किंवा त्यांचे व्यवसाय विस्तारण्यासाठी मदत मिळते.

३. शिक्षणासाठी कर्ज: शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुद्धा कर्ज उपलब्ध करणे,त्यावर व्याज परतावा योजना लागू करणे,ही एक सकारात्मक बाब आहे.

**योजना अंमलबजावणी आणि प्रक्रिया**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी कर्जदाराने संबंधित बँक किंवा वित्तीय संस्थेच्या माध्यमातून कर्ज घेतले पाहिजे. कर्ज घेतल्यानंतर, शेतकऱ्यांना,महिला गटांना आणि इतर सामाजिक घटकांना व्याज परतावा दिला जातो. एपीईडीसी या महामंडळाच्या नियंत्रणाखाली ही योजना कार्यरत आहे,आणि त्याच्या मार्गदर्शनाखाली त्यासाठी आवश्यक असलेले कागदपत्र आणि प्रक्रियांची पूर्तता केली जाते.

आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची व्याज परतावा योजना एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे, ज्यामुळे शेतकरी, महिला, आणि इतर मागासलेले वर्ग आर्थिक दृष्ट्या सक्षम होतात. या योजनेमुळे त्यांना कर्ज फेडण्यास मदत मिळते आणि त्यांच्या व्यवसायात किंवा शेतीपूरक व्यवसाय करण्यास प्रोत्साहन मिळत आहे.या योजनेला मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे राज्यात आर्थिक समृद्धी साधली जात आहे. महामंडळाच्या या योजनेमुळे मराठा समाजातील तसेच स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ नाही अशा समाजातील स्त्री-पुरुषांना विविध प्रकारचे उद्योग व्यवसाय सुरू करून आत्मनिर्भर करण्यास अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचा मोठा हातभार लागत आहे.

**- संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय**

## थोडक्यात

### श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयात बहरली आनंद नगरी



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२४ जानेवारी**

प्रत्येक विद्यार्थ्यांना व्यवहारीक ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत शुक्रवार दि.२४ रोजी आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग दर्शवून आनंद घेतला.

श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव या शाळेत शुक्रवार दि.२४ रोजी आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच रामेश्वर जगताप तर प्रमुख पाहुणे म्हणून बागपिंपळगाव व बेलगाव सेवा सोसायटी चेअरमन जनार्धन आप्पा चितळकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीनिवास देवकते, मधुभाऊ मुगूटराव, अभिमन्यू ठोंबरे, गणेश मुगूटराव आदींची प्रमुख उपस्थिती होती. या स्टॉलचे उद्घाटन गावचे सरपंच रामेश्वर जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी तसेच मुलांचे मनोरंजन व्हावे तसेच त्यांना व्यवहारिक ज्ञान मिळावे या उद्देशाने सदरील आनंद नगरीचे आयोजन मोठ्या थाटामाटात करण्यात आले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले, सहशिक्षक भागवत सोळुंके, अंजली माने, मुक्ताबाई मोटे, मयुर येवलेकर, नवनाथ घुगे, हरीभाऊ आघाव, वर्षा कांडेकर, योगेश म्हैसनवाड, प्रसाद कुलकर्णी, शिवाजी पवार, गोरख साकळे, बाबासाहेब कांबळे, ज्ञानेश्वर बास्टे आदींनी सहकार्य केले.

### परळी नगरपरिषदची क्रीडा क्षेत्रात झेप विभागात द्वितीय!



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२४ जानेवारी**

राज्य प्रशासनाच्या वतीने प्रत्येक वर्षी प्रशासकीय कर्मचारी यांना एक प्रोत्साहन म्हणून कर्मचारी खेळाडूंना शोधण्याचा प्रयत्न केला जातो आणि क्रीडा स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात याचाच भाग म्हणून बीड जिल्हा प्रशासन मार्फत बीड येथील जिल्हा क्रीडांगण जिल्हाधिकारी येथे कबड्डी स्पर्धा घेण्यात आल्या या मध्ये परळी नगर परिषदने प्रथम क्रमांक पटकावला होता सर्व युवा कर्मचारी खेळाडुन सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात आले होते नंतर पुढील स्पर्धे करिता संभाजी नगर विभागीय स्तरावर सुद्धा दुसरा क्रमांक पटकावला असून विभागात द्वितीय बक्षीस देण्यात आले आहे या युवा कर्मचारी खेळाडूंनी परळी नगर परिषदला विभागात द्वितीय बक्षीस मिळवून दिल्या बद्दल नगर परिषदचे मुख्याधिकारी कांबळे साहेब यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे सर्व खेळाडूंना पुढे भविष्यात ही असेच प्रोत्साहन देत रहाणार असे म्हंटले आहे तर या कबड्डी स्पर्धेत युवा कर्मचारी खेळाडू म्हणून समाधान समुद्रे ,शरणम ताटे,दशरथ जगतकर ,विजय कांबळे प्रकाश क्षीरसागर ,राहुल वैध्य कीर्तिमहान जोगदंड ,निखिल वाघमारे ,संघानंद कांबळे ,सतीश गोखले आदी होते तर यांना मार्गदर्शन नगर परिषदचे उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांनी केले आहे.

### अवकाशातील ग्रहांचे दुर्मिळ आविष्कार पाहण्याची सुवर्णसंधी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ जानेवारी**

स्वा. सावरकर महाविद्यालया तर्फे यावर्षी ही अवकाशातील ग्रहांचे दुर्मिळ आविष्कार दुर्बिणी द्वारे पाहण्याचे आयोजन केले असून २५ जानेवारी २०२५ रोजी अवकाशा मध्ये साधारण चार लाख वर्षानंतर आपल्या सूर्यमालेतील एकूण आठ ग्रह सूर्याच्या समोर एका रेषेत येणार असून यास प्लॅनेटरी परेड म्हणून ओळखले जाते २५ तारखेस सूर्यास्ता नंतर यातील काही ग्रह दिसू लागतील बुध, शुक्र, बृहस्पति,मंगळ व शनी हे ग्रह कांहीं प्रमाणात उघड्या डोळ्यांनी पाहता येतील तर दुर्बीणद्वारे ते अधिक स्पष्ट दिसतील. यातील अरुण वरूण (युरेनस नेपच्यून) हे केवळ दुर्बिणी द्वारे दिसू शकतील ग्रहांची दिशा पाहण्यासाठी स्कायम्यापचा उपयोग करता येऊ शकतो भूगोल विभागातील अवकाशी दुर्बिण व बीड मधील खगोल अभ्यासक श्री विकास मिटकर हे त्यांच्याकडे असलेल्या अवकाशीय दुर्बिणीच्या साह्याने अशा दोन दुर्बिणीच्या आधारे स्वा. सावरकर महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये सायंकाळी सात ते साडेनऊ या कालावधी दरम्यान ग्रहांचे सरेखन पाहता येईल भूगोल विभागातील विभाग प्रमुख डॉ.अशोक डोके व डॉ. गायकवाड जोगेंद्र यांनी या उपक्रमाचे आयोजन केले असून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे तसेच उपप्राचार्य डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर व डॉ.उत्तम साळवे यांनी या दुर्मिळ ग्रहांचे अविष्कार पाहण्याचे आवाहन केले आहे

## बीड शहरातील सिग्नल बंद



बीड शहरातील अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नगर नाका, बसस्थानक परिसर या भागातील सिग्नल बंद असल्यामुळे वाहतूकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे सिग्नलचे काम तातडीने करावे अशी मागणी वाहन धारक व जनतेतून होत आहे. (छाया-श्रीकांत कुलकर्णी)







# नानाजी देशमुख विद्यामंदिर बीड येथे हस्ताक्षर स्पर्धा संपन्न





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२४ जानेवारी**

आधुनिक संगणकाच्या युगात हस्ताक्षर व लेखन कला संपुष्टात येते की काय ? शाळेत वर्गातील वाढती विद्यार्थी संख्या त्यामुळे वेळेची सबब,धावपळीच्या कारणामुळे पालकांचे दुर्लक्ष व दोघांच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांचा हस्तक्षराकडे पाहण्याचा उदासीन दृष्टिकोन यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर खराब होत चालले आहे.

यासाठीच बीड शहरात सुरेख हस्ताक्षर वर्गाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांचे हस्ताक्षरात सुधारणा झाल्यामुळे त्याचा त्यांना फायदा होत आहे.

हस्ताक्षराची जागृती होण्यासाठी जागतिक हस्ताक्षर दिनाच्या निमित्ताने बीड शहरातील नावाजलेले सुरेख हस्ताक्षर वर्ग व नानाजी देशमुख विद्यामंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी सुरेख हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी इयत्ता पाचवी ते सातवीचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

त्यापैकी देवयानी कदम ७वी प्रथम,सोहम संतोष हावळे ५ वी द्वितीय,ओमकार काळे ७ वी तृतीय तर उत्तेजनार्थ मध्ये वैभवी बडे ७ वी, राजवी जाधव ७ वी,संपदा चोले ६वी गौरी शिंदे यांचे क्रमांक आले. शालेय विभागप्रमुख सुनंदा ताई कुलकर्णी, अॅड.अर्चनाताई तुंगार यांनी परीक्षण केले.वरील मान्यवराबरोबरच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ अर्चना मोराळे,सर्व स्टाफ,व सुरेख हस्ताक्षर वर्गाचे प्रमुख सुदाम पालकर यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.




# गोष्ट एका टेकडीची बालनाट्याचे राज्य नाट्य स्पर्धेत प्रभावी सादरीकरण

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२४ जानेवारी**

महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेत सुंदरेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था गुंज(बु) संचालित आयुष अकॅडमी ऑफ परफॉर्मिंग आर्टस् प्रस्तुत गोष्ट एका टेकडीची हे बालनाट्य छत्रपती संभाजीनगर येथील तापडिया नाट्य मंदिरात सादर करण्यात आले. हरिदास घुंगासे लिखित हे नाटक लहान मुलांमध्ये पर्यावरणाची जागरूकता निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवून तयार करण्यात आले आहे.नाटकात टेकड्या आणि डोंगर यांचे महत्त्व आणि त्यांच्या संवर्धनाची गरज या विषयावर भर देण्यात आला आहे.

मुलांच्या मनोरंजनासोबतच त्यांना पर्यावरणाच्या संरक्षणाची जबाबदारीही समजावून सांगण्याचा प्रयत्न या नाट्यातून करण्यात आला आहे.जालना जिल्हा घनसावंगी तालुक्यातील गुंज(बु),पिंपळगाव(कु) आणि परिसरातील कलावंत हरिदास घुंगासे संचलित आयुष कला अकॅडमीचे मार्गदर्शक प्रख्यात सिने-नाटच अभिनेता,लेखक ,दिग्दर्शकप्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध नाट्य स्पर्धेत सहभागी होत असून सांस्कृतिक चळवळ गतिमान करीत आहेत.रंगकर्मी हरिदास घुंगासे,रघुनाथ ताठे यांनी नाट्यनिर्मिती केली असून, प्रा.डॉ. सिद्धार्थ तायडे ,हरिदास घुंगासे यांनी दिग्दर्शन केले आहे. अमृता देवकर, तन्वी सोळंके, गौरव डहाळे, विराज दायमा, दर्शना डोईफोडे, ईश्वरी ताठे, कार्तिक बहिरे, आयुष घुंगासे, दत्ता व्यवहारे या बाल कलावंतांनी या नाटकात आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे.

गोष्ट एका टेकडीची' या बालनाट्याचा प्रयोग किसन भोईटे, महेंद्र वाहुळे (नेपथ्य), नंदू वाघमारे (प्रकाश योजना), सार्थक लासे आणि पवन दशरथ (संगीत) तसेच सीमा ताठे आणि मनीषा घुंगासे (रंगभूषा/वेशभूषा) यांच्या उत्कृष्ट तांत्रिक सहकार्यामुळे प्रभावी झाला. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत २१ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धा प्राथमिक फेरी तापडिया नाट्यमंदिर, निराला बाजार येथे २० आणि २१ जानेवारी २०२५ दरम्यान सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे तसेच सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. स्पर्धेमध्ये एकूण १० संघांनी सहभाग घेतला. छत्रपती संभाजीनगर शहरासह जिल्ह्यातील इतरही संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते. केंद्रसमन्वयक म्हणून रूपेशकुमार परत वाघ,करण लुंगाडे जैन व सह समन्वयक अनिल मोरे यांनी उत्कृष्ट आयोजन केले.

# स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात पथनाट्य स्पर्धा, जीवनउत्सव, पुस्तकांवरील चर्चासत्र व मुशायऱ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२४ जानेवारी**

येथील स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या महात्मा गांधी अध्ययन केंद्राच्या वतीने जागर लोकशाहीचा आपणा सर्वांचा या उपक्रमांतर्गत नागापूरकर सभागृहा समोर जीवन उत्सव, पुस्तकावरील चर्चासत्र, पथनाट्य स्पर्धेचे व राष्ट्रीय एकात्मतेवर मुशायऱ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे व मुशायऱ्याचे उद्घाटन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी केले तर चर्चासत्राचे उद्घाटन सचिव कमलाकर चौसाळकर यांनी केले.

### जागर लोकशाहीचा आपल्या सर्वांचा

लोकशाही, प्रसार माध्यम व बालविवाह विषयावर पथनाट्य स्पर्धा

या पथनाट्य स्पर्धेत शहरातील अनेक संघांनी सहभाग घेतला होता. पथनाट्य स्पर्धेचे परीक्षक म्हणून बाळासाहेब देशपांडे मुकद्दम व बिपिन घोबाळे यांनी काम केले.या प्रसंगी बर्दापूरकर मॅडम यांनी पथनाट्य स्पर्धेत सहभागी झालेल्या तीनही संघांना प्रत्येकी अकराशे रुपयांचे प्रोत्साहनपर पारितोषिके जाहीर केली . बाल- विवाहाचे दुष्परिणाम माध्यमांची एकांगी भूमिका, भारतीय संविधानाचे महत्व इ. विषयांवर पथनाट्यांचे सादरीकरण करण्यात आले.

पुस्तकावरील चर्चासत्र

महात्मा गांधी वाचन कट्टट्यामार्फत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पुस्तकावरील चर्चासत्रात सहभाग नोंदवला. कुमारी ऋतुजा शिंदे हिने राजगृहाची सावली, कुमारी मोनिका मिसाळ या विद्यार्थिनीने क्रांतिकारी तरुणांनो, संकेत पवार यांनी शिवाजी कोण होता, सारंग भगत यांनी भटक्याचे लग्न, आदित्य कासारे यांनी अस्मितांचे अंतरंग, अश्विनी तिडके यांनी बखर शिक्षणाची, अविष्कार जंगले यांनी गांधी व गैरसमज, प्रथमेश उपाडे यांनी माणूस जेव्हा जागा होतो, नेहा बोंडगे यांनी शिवाजी जन्माला आले नसते तर, कृष्णा मस्के यांनी द प्रिन्स या पुस्तकावरील परीक्षणाचे सादरीकरण केले.

जीवन उत्सव

जीवन उत्सव या अंतर्गत वेगवेगळ्या जीवनावश्यक वस्तूंचे, खाद्य पदार्थांचे स्टॉल लावण्यात आले. श्री भागवत देवकुळे धारूर यांनी स्वतः बनवलेल्या चप्पल व बुटांचे प्रदर्शन व विक्री केले. माजी विद्यार्थी श्री बाबजी यांनी इडलीचा स्टॉल लावला. अनुराग पुस्तकालय मार्फत पुस्तकांचे प्रदर्शन व विक्री करण्यात आली.

राष्ट्रीय एकात्मता मुशायरा

राष्ट्रीय एकात्मतेवरील मुशायऱ्यामध्ये विद्यार्थ्यांनी हिरिरीने सहभाग घेतला . यामध्ये शेख अलमास, सय्यद रेहान, फरहान शेख यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेतला.योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी कांहीं शेर सादर केले. डॉ. वहिदा पठाण मॅडम व उर्द विभागातील प्राध्यापकांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुढाकार घेतला . जीवन उत्सव, विद्यार्थी चर्चा सत्राचे व इतर कार्यक्रमाचे आयोजन जागर लोकशाहीचा या कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ. शैलजा बरुरे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले. पथनाट्य स्पर्धा यशस्वी करण्यासाठी नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संपदा कुलकर्णी, डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शैलजा बरुरे यांनी केले .या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. थारकर यांनी केला. सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कृष्णा मस्के यांनी केले. या कार्यक्रमाला योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रा. एन. के. गोळेगावकर, सौ.बर्दापूरकर मॅडम निलिमाताई खुरसाळे, महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.



लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# २६ जानेवारी रोजी हर घर संविधान उपक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जानेवारी -** भारतीय संविधान अमृत महोत्सवानिमित्त हर घर संविधान उपक्रम सामाजिक न्याय विभागाच्यावतीने राज्यात राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत २६ जानेवारी अर्थात प्रजासत्ताक दिनी विविध कार्यक्रमांचे आयोजन करून संविधानाचा जागर केला जाणार आहे. यामध्ये जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले आहे.

भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता, तसेच संविधानाची मूल्ये शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्यापर्यंत पोहोचावीत, यासाठी राज्यातील शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संकुले तसेच ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्था अशा सर्व ठिकाणी हर घर संविधान उपक्रम आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत शाळा, महाविद्यालयांमध्ये विविध स्पर्धा, व्याख्यान, दौड, रॅली व संविधान जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करावे.

तसेच जिल्ह्याच्या ठिकाणी भारतीय संविधानाबद्दल माहिती देणारे कार्यक्रम व संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाटप केले जाणार आहे. प्रजासत्ताक दिनी संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करण्यात येणार आहे. त्यानुसार सर्व आस्थापनांमध्ये, शाळा व महाविद्यालय, तसेच ग्रामपंचायतींमध्ये संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करण्यात यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये २६ जानेवारी रोजी होणाऱ्या ग्रामसभेत तसेच जिल्ह्यातील सर्व कार्यालये, शाळा, संविधान प्रस्ताविकेचे वाचन करावे. तसेच सर्व शाळा, महाविद्यालये, वसतिगृह, शैक्षणिक संस्थामध्ये प्रजासत्ताक दिनी संविधानाचे महत्व या विषयावर व्याख्यान, दौड व इतर स्पर्धांचे आयोजन करून प्रस्ताविकेचे वाचन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...

### जिल्ह्यात २५ जानेवारी रोजी महिला विशेष ग्रामसभेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जानेवारी -** जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये २५ जानेवारी २०२५ रोजी महिला विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमानुसार २६ जानेवारी रोजी होणाऱ्या ग्रामसभेपूर्वी ही महिला विशेष ग्रामसभा होणार आहे.

महिला विशेष ग्रामसभेमध्ये लक्ष्मी मुक्ती योजनेंतर्गत सातबारावर सहधारक म्हणून महिलेचे नाव लावणे, महिलांसाठी असलेल्या विविध विभागांच्या योजनांची माहिती देणे व अर्ज भरून घेणे, महिला केंद्रित ङ्गआईफ पर्यटन धोरण राबविणे, ग्रामीण भागातील घरांची नोंदणी पती-पत्नी यांच्या संयुक्त नावे करणे, गावातील विधवा तथा एकल महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देणे आदी विषयांवर चर्चा होईल. तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाबाबत माहिती देण्यात येणार आहे. तसेच बालविवाह रोखण्याबाबत प्रतिज्ञा घेवून विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन करणे, ग्रामस्तरावर बालसंरक्षण समितीची स्थापना करण्याबाबत या ग्रामसभेत चर्चा केली जाणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ यांनी दिली.

### हिंदुहृदयसम्राट ठाकरे व नेताजी सुभाषचंद्र बोस यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जानेवारी -** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्याही शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी पर्यवेक्षक डॉ.वैशाली पाटील,डॉ.संध्या कोल्हे,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे,प्रा. अनिलकुमिर माळी, प्रा.बळवंत सूर्यवंशी, ग्रंथपाल प्रा.किरण भिसे,डॉ.विश्वनाथ मोटे, प्रा.गोपाल अवस्थी, विनोद घार,विष्णू नाईकवाडे, मोहसीन शेख, सतीश तांदळे, किशोर जाधव,सुदाम सातपुते, नितेश दुधभाते,सुजित अपसिंगेकर, शेषराव बिराजदार,सागर इंदाणी,बालाजी पिटले,अमोल क्षीरसागर यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

### लातूरच्या बाजारात मिळाला सोयाबीनला चार हजार शंभरचा दर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जानेवारी -** बाजारात सोयाबीनची आवक वाढलेलीच असून, दर मात्र स्थिर आहेत. चार हजार शंभर रुपये सर्वसाधारण प्रतिक्विंटल दर असून, किमान ३५०० रुपये तर कमाल ४२४१ रुपये प्रति क्विंटल दर आहे. गेल्या काही दिवसांपासून बाजारात सोयाबीन पिकाची आवक मोठ्या प्रमाणात आहे.

### पालकमंत्री भोसले यांच्या हस्ते रविवारी पुतळ्यांचे अनावरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जानेवारी -** जेएसपीएम शिक्षण संस्थेच्या वतीने विवेकानंदपूरम् शैक्षणिक संकुलात उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज व स्वामी विवेकानंद यांच्या पुतळ्यांचे अनावरण तसेच इंजीनियरिंग कॉलेजच्या इमारतीचे भूमिपूजन रविवार, दि. २६ जानेवारी रोजी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रतिभा पाटील कव्हेकर, भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर यांची उपस्थिती राहणार असल्याचे संस्थेच्यावतीने कळविण्यात आले आहे.

# गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी उद्योजकांशी संवाद

## विविध सुविधा देण्यास प्रशासन कठिबद्ध : जिल्हधिकारी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जानेवारी -** मुख्यमंत्र्यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना शंभर दिवसांच्या कृती आराखड्यात दिलेल्या सात कलमी कार्यक्रमानुसार जिल्ह्यात गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत प्रयत्न केले जात आहेत. या अनुषंगाने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात उद्योजकांशी संवाद साधला. उद्योजकांना आवश्यक परवानग्या, तसेच विविध सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबध्द असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी उपजिल्हाधिकारी संगीता टकले, महाराष्ट्र आद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी अमित भामरे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रवीण खडके यांच्यासह जिल्ह्यातील उद्योजकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी ठाकूर म्हणाल्या, उद्योजकांना येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन त्यावर कार्यवाही करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने उद्योजकांशी सातत्याने संवाद साधण्याचा उपक्रम सुरू केला आहे. उपजिल्हाधिकारी टकले या उपक्रमाच्या नोडल अधिकारी आहेत. उद्योगासाठी आवश्यक विविध परवाने, वीज, रस्ते यासारख्या मुलभूत सुविधा सुलभ पध्दतीने उपलब्ध होण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. तसेच एमआयडीसी क्षेत्रातील सुविधांचे सक्षमीकरण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे जिल्हाधिकारी ठाकूर यांनी सांगितले.

उद्योगांसाठी आवश्यक परवाने घेण्यासाठी कोणकोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, याचे फलक संबंधित कार्यालयांमध्ये दर्शनी भागात लावावेत. हे परवाने देताना विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी ठाकूर यांनी यावेळी संबंधित प्रशासकीय विभागांना दिल्या.

# विवाह नोंदणी प्रमाणपत्रासाठी लाच घेणाऱ्या एकास पकडले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जानेवारी -** पत्नीचे नाव बदलण्यासाठी तक्रारदाराने विवाह नोंदणी प्रमाणपत्राची ग्रामपंचायतीच्या संगणक परिचालकाकडे मागणी केली. तेव्हा त्याने २ हजारांची लाच मागून दीड हजार रुपये स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने धाड टाकून रंगेहाथ पकडले. ही कारवाई गुरुवारी निलंगा तालुक्यातील शेळगी येथे करण्यात आली.

तक्रारदाराचे ३१ मे २०२४ रोजी लग्न झाले. तद्नंतर तक्रारदारास आपल्या पत्नीचे नाव बदलायचे होते. त्यासाठी विवाह नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक असल्याने शेळगी येथील ग्रामपंचायत कार्यालयातील संगणक परिचालक ऋषिकेश तानाजी शिंदे यांच्याकडे मागणी केली.

तेव्हा शिंदे याने विवाह नोंदणी प्रमाणपत्र तयार करून आणि ग्रामसेवकाची सही घेऊन प्रमाणपत्र देण्यासाठी २ हजार लाचेची मागणी केली. त्यापैकी ५०० रुपये २२ जानेवारी रोजी स्वीकारले. दीड हजार रुपये दिल्यानंतरच प्रमाणपत्र देतो, असे सांगितले. दरम्यान, तक्रारीवरून गुरुवारी सापळा रचण्यात आला.

तेव्हा आरोपी शिंदे याने तक्रारदाराकडे सदर प्रलंबित कामासाठी दीड हजाराच्या लाचेची मागणी करून स्वीकारण्याचे मान्य केले. ही लाचेची रक्कम घेताना त्याला अटक करण्यात आली.

# पथनाट्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी केली जनजागृती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जानेवारी -** दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व नेहरू युवा केंद्र लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मेरा युवा भारत रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत २३ जानेवारी रोजी लातूर शहरातील विविध चौकात रस्ते सुरक्षा अभियानात्मक नुक्कड नाटकद्वारे जनजागृती पर नाटकांचे सादरीकरण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांद्वारे करण्यात आले.

दारू पिऊन वाहन चालविणे, ट्रिपल सीट बसून गाड्या सुसाट पळविणे, कट मारणे, वाहतुकीचे नियम न पाळणे आदी गोष्टी मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. याकडे लक्ष वेधण्यासाठी आणि याबाबत जनजागृती करण्यासाठी दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नुक्कड नाटक बसविले. या नाटकाचे सादरीकरण लातूर शहरातील सर्व प्रमुख चौकात करण्यात आले. या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. याला नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी नेहरू युवा केंद्राच्या युवा अधिकारी साक्षी समैय्या, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विशाल वर्मा, सह कार्यक्रमाधिकारी प्रा. योगेश शर्मा, नेहरू युवा केंद्राचे प्रा.शुभम जाधव पाटील आदींसह स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘तो’ निर्यण रद्द करा: शिक्षण संस्थाचालक




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जानेवारी -** इयत्ता १०वी व १२वी परीक्षा केंद्रांसाठी केंद्र संचालक व परीक्षेशी संबंधित व्यक्तीची नियुक्ती सदर केंद्राव्यतिरिक्त इतर शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांमधून करण्याचा निर्णय रद्द करावा, अशी मागणी लातूर जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघाच्यावतीने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग यांच्याकडे निवदेनाद्वारे करण्यात आली आहे.

इयत्ता १०वी व १२वी परीक्षा केंद्रासाठी केंद्र संचालक व परीक्षेशी संबंधित व्यक्तीची नियुक्ती सदर केंद्राव्यतिरिक्त इतर शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांमधून करण्याचा निर्णय शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात आला आहे. एका परीक्षा केंद्रावरून दुसऱ्या परीक्षा केंद्रावर कर्मचाऱ्यांची आदला बदल करण्याचा हा निर्णय व्यवहार्य नाही. परीक्षेच्या दिवशी शाळेमध्ये इतर वर्ग कोणी घ्यायचे, हा प्रश्न या निर्णयावरून उपस्थित होत आहे. या निर्णयाचा इयत्ता ८वी, ९वी व ११वीच्या अध्यापनावर परिणाम होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन परीक्षा केंद्रासाठी इतर संस्थेतील कर्मचारी नियुक्तीचा निर्णय रद्द करावा, अशी मागणी लातूर जिल्हा शिक्षण संस्थाचालक संघाच्यावतीने शिक्षण मंडळाचे लातूर विभागीय अध्यक्ष सुधाकर तेलंग यांच्याकडे निवदेनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनावर अध्यक्ष रामदास पवार, उपाध्यक्ष जे. जी. सगरे, कोषाध्यक्ष प्राचार्य डी. एन. केंद्रे, सचिव बाबूराव जाधव, मुख्याध्यापक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश देशमुख यांच्या स्वाक्षरी आहेत.

# पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा लातूर जिल्हा दौरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जानेवारी -** राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले हे २५ व २६ जानेवारी २०२५ रोजी दोन दिवसांच्या लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

पालकमंत्री ना. भोसले यांचे २५ जानेवारी रोजी तुळजापूर येथून दुपारी १.३० वाजता लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व राखीव. दुपारी ३ वाजता शासकीय विश्रामगृह येथे ते सार्वजनिक बांधकाम विभागाचा आढावा घेतील. दुपारी ३.३० वाजता पदाधिकाऱ्यांच्या भेटी घेतील. सायंकाळी ५ वाजता लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे आयोजित संविधान गौरव सभा कार्यक्रमाला ते उपस्थित राहतील.

सायंकाळी ६ वाजता औसा शहराकडे प्रयाण करतील. सायंकाळी ६.३० वाजता औसा येथे विधानसभा सदस्य अभिमन्यू पवार यांच्या जन्मेजय निवासस्थानी आगमन होईल व राखीव. त्यानंतर सोयीनुसार लातूरकडे प्रयाण व शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल. प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी सकाळी ९.१५ वाजता लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित सोहळ्याला पालकमंत्री ना. भोसले उपस्थित राहतील. सकाळी १०.१० वाजता जिल्हा क्रीडा संकुल परिसरात आयोजित हिरकणी हाट २०२५ या ग्रामीण भागातील महिला बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे विक्री व प्रदर्शनाचे त्यांच्या हस्ते उद्घाटन होईल.

# शिवसेनाप्रमुखांना लातुरात अभिवादन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जानेवारी -** हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे व थोर स्वातंत्र्यसेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना जिल्हा संपर्क कार्यालयात अभिवादन करण्यात आले.

यावेळी जिल्हा संपर्कप्रमुख ॲड. बळवंत जाधव, जिल्हाप्रमुख सचिन दाने, महिला शिवसेना जिल्हाप्रमुख कल्पना बावगे, शहरप्रमुख ॲड. परवेझ पठाण, दिनेजी बोरा, विजय शिंदे, राजकुमार सुरवसे, विजयकुमार कांबळे, नितीन महाजन, शाम साबळे, राजु बागवान, संदिप जाधव, हरीभाऊ डोपे, ॲड. बालाजी सूर्यवंशी, विष्णू साबदे, रवि चव्हाण वर्षा धडे, अनिता नागिमे, संगिता शेटे, ॲड. अर्जुन जाधव इत्यादी पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# भारताचा वैभवशाली इतिहास तरुणांनी जपला पाहिजे

## प्रसिद्ध कवी भारत सातपुते यांचे प्रतिपादन




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जानेवारी -** संपूर्ण विश्वामध्ये भारताने आपली संस्कृतीची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे भारताचा वैभवशाली इतिहास महाविद्यालयीन तरुणांनी जपला पाहिजे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी आणि वक्ते भारत सातपुते यांनी केले.

महात्मा बसवेश्वर कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्यवसाय अभ्यासक्रम महाविद्यालय, लातूर द्वारा निरोप समारंभ आणि विविध गुणदर्शन कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

यावेळी विचारमंचावर अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, प्रमुख अतिथी म्हणून शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक राजेश्वर बुके, प्रा. जी. एम. धाराशिवे, प्राचार्य डॉ. संजय गवई, मुख्य समन्वयक डॉ. भास्कर रेड्डी नल्ला, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले आणि संगीत विभागाने स्वागत गीत सादर केले.

पुढे बोलताना भारत सातपुते म्हणाले की, आजच्या तरुणांनी लोकशाहीचे रक्षण केले पाहिजे. लोकशाही नावाची व्यवस्था महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात पाहावयास मिळते. माणसाने माणसाशी माणसासम वागले पाहिजे हे कृतीत उतरविणारे हे महाविद्यालय आहे. विदयार्थ्यांनी आपल्या भावी आयुष्यात उत्तरोत्तर प्रगती करावी ही प्रगती करत असताना आपल्या आई वडिलांच्या कष्टाचे स्मरण ठेवावे. मातेच्या वात्सल्यपूर्ण कवितेतून त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी प्रास्ताविकपर मनोगतात प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, सन १९७० पासून महात्मा बसवेश्वर महाविद्यालय कला, वाणिज्य, विज्ञान, व्यावसायिक अभ्यासक्रम, समाजकार्य, संगणकशास्त्र या विषयामध्ये निकालाची उज्ज्वल परंपरा निर्माण केली. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुनाणा वाव मिळवा म्हणून वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन केले होते असे सांगून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी आणि भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी जेष्ठ संचालक प्रा. जी. एम. धाराशिवे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनामध्ये आपल्या आई वडीलासोबत आपल्या गुरुजणांचाही आदर केला पाहिजे असे सांगून इयता १२वीच्या विद्यार्थ्यांना फेब./मार्च २०२५ परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोपात करताना आदिनाथ सांगवे म्हणाले की, भारताच्या उज्वल भविष्यासाठी आजची तरूण पिढी सक्षम झाली पाहिजे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच कला कौशल्यांचा विकास साधला पाहिजे, असे सांगून आपल्या महाविद्यालयाती पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला पाहिजे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी कॉपी मुक्त अभियाना अंतर्गत शपथ वाचन प्रा. वनिता पाटील यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनी केले तर आभार प्रा. रवींद्र सोनोने यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ. अश्विनी रोडे आणि प्रा. किसनाथ कुडके यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा विश्वनाथ स्वामी, प्रा. रवींद्र सोनोणे, प्रा. वैशाली जयशेटे, प्रा. शैलेश कानडे, प्रा. गुणवंत बिराजदार आदिंनी प्रयत्न केले.

# महापालिका प्रशासनाकडून गुजरातधार्जिणे धोरण सुरू ?

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२४ जानेवारी -** महाराष्ट्राची राज्यभाषा ही मराठी आहे. नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. लातूर शहरात नागरिकांची मराठी ही मातृभाषा आहे. परंतु, सध्या महापालिकेतील मोठे-मोठे टेंडर स्थानिकांना डावलून गुजरात राज्यातील गुत्तेदारांना देण्यात येत आहेत. परराज्यातील गुत्तेदारांकडून कामगार आणून अल्प मजुरीत काम करून घेतल्याने स्थानिक नागरिकांचा हक्काचा रोजगार हिरावून घेण्यात येत आहे. महापालिका प्रशासन गुजरातीधार्जिणे धोरण राबवित आहे काय, अशी शंका लातूरकर उपस्थित करीत आहेत.

सध्या लातूर शहरात घंटागाड्या गुजरात पासिंगच्या जुन्या आणल्या असून त्यावर गुजराती भाषेचा मजकूर आहे. कचरा संकलन आणि त्याबाबत जनजागृतीसाठी असाच



तो मजकूर लातूरकरांसाठी असला तरी तो गुजराती भाषेत का लिहिला आहे? या प्रश्नाचे कोडे मात्र लातूरकरांना पडले आहे. मजकूर वाचता येत नाही, समजणार कसा? मग मजकूर घंटागाडीवर का लिहिलेला असेल असाही प्रश्न पडला आहे. कचरा संकलन करणारी कंपनी गुजरातची आहे की काय? की ठेकेदार कंपनीला मराठी भाषेचे वावडे आहे, असाही प्रश्न लातूरकरांना पडला आहे.

महानगरपालिका प्रशासनाने लातूरकरांना समजेल अशा गुजराती भाषेत निवेदन देऊन गांधीगिरी पध्दतीने आंदोलन केले. महाराष्ट्रातील लातूर शहरात गुजरातीधार्जिणे अतिक्रमण लादू नये व ते सहन करू दिले जाणार नाही. येत्या आठ दिवसांत सर्व घंटागाड्यांवर मराठी भाषेत संदेश लिहावा, असे निर्देश संबंधितांना देण्यात यावेत अन्यथा घंटागाड्यांची हवा सोडो आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा प्रसिध्दी प्रमुख डी. उमाकांत यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.